
# पुनर्भेट...

## ...गोनीदांच्या साहित्यकृतींची



ॲड. आनंद रा. देशपांडे

# पुनर्भेट...

## ...गोनीदांच्या साहित्यकृतींची

लेखक

**ॲड. आनंद रा. देशपांडे**

**पुनर्भेट...**
**...गोनीदांच्या साहित्यकृतींची**

**ॲड. आनंद रा. देशपांडे**
९१/अ, मुरारजी पेठ, सुपर मार्केटजवळ
सोलापूर- ४१३ ००१.
दूरध्वनी - ०२१७-२६२१३४९
दूरभाष - ९८२३२९१६४३
ई-मेल - anandvanbhuvan@gmail.com

✧

© सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित

✧

**टाइपसेटिंग**
स्मिता टाईपसेटर्स,
११२०, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

✧

**मुखपृष्ठ**
पराग घळसासी

✧

**प्रथमावृत्ती :** २००९, अक्षरलेणं प्रकाशन
**द्वितीय आवृत्ती :** ई-बुक, ई-साहित्य प्रतिष्ठान, नोव्हेंबर २०२०

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : १७ नोव्हेंबर २०२०**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.

स्वर्गीय आप्पा व तीर्थरूप बाबासाहेब
हे आम्हा दुर्गभक्तांचे माय-बाप!
त्यांच्या संस्कारांतून ज्या युगपुरुषाचा ध्यास
जन्मभर घेतला त्या शिवप्रभूंच्या चरणी
हे लेखनपुष्प सादर सविनय समर्पित...

- आनंद

# अ नु क्र म

वाघरू / १९

रानभुली / २५

माचीवरला बुधा / ३४

पवनाकाठचा धोंडी / ४६

जैत रे जैत / ५६

गडदेचा बहिरी / ६१

त्या तिथें रुखातळी / ७०

मृण्मयी / ८०

पडघवली / ८९

तांबडफुटी / १०१

कुणा एकाची भ्रमणगाथा / १००

आम्ही भगीरथाचे पुत्र / १२०

पूर्णामायची लेकरं / ११८

पद्मा / १४०

उडोनि हंस चालला / १४९

अजून नाही जागें गोकुळ / १५८

श्री कर्णायन (चरित्र) / १६६

श्री कृष्णायन (चरित्र) / १७७

दास डोंगरी राहतो / १८८

मोगरा फुलला / १९७

वादळातील दीपस्तंभ / २०६

तुका आकाशाएवढा / २१६

बया दार उघड / २२५

हर हर महादेव / २३५

दर्याभवानी / २४५

झुंजारमाची / २५५

हे तो श्रींची इच्छा / २६५

शितू / २७४

मर्यादेयं विराजते / २८३

# प्रस्तावना

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर हे मराठीतले एक सिद्धहस्त लेखक, प्रतिभाशाली कादंबरीकार म्हणून त्यांची कीर्ती आहे. नाटक, प्रवासवर्णन, ललित, धार्मिक, कुमारवाङ्मय, बालवाङ्मय, चरित्र, आत्मचरित्र, कथा अशा विविध वाङ्मय प्रकारांमधले त्यांचे लेखनही त्यातील गुणवत्तेमुळे रसिकमान्य आहे. त्यांच्या बहुप्रसवा लेखणीवर वाचकांनी उदंड प्रेम केले. त्यांचा संपन्न जीवनानुभव, अभिजात कल्पनाशक्ती, अव्वल दर्जाची प्रतिभाशक्ती, अस्सल मराठी शब्दकळा यामुळे मराठी साहित्याच्या प्रांगणात त्यांना मोठा मान मिळाला.

१९४७ मध्ये त्यांची 'बिंदूची कथा' ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली. त्यानंतर १९८९ पर्यंत त्यांचा लेखनप्रवास अखंडितपणे चालू होता. त्यांच्या कलागुणांनी संपन्न आणि संस्कारशील साहित्यावर मराठी वाचकांच्या अनेक पिढ्या पोसल्या. आज २००९ मध्येही त्यांच्या लेखनाला सातत्याने मागणी आहे हे विशेष म्हणावे लागेल.

१ जून १९९८ ला मराठीतला हा मान्यवर लेखक स्वर्गस्थ

झाला. त्यानंतर त्यांच्यावर परोपरीनं लिहिलं गेलं. सोलापूरचे प्रसिद्ध वकील, इतिहासप्रेमी वक्ते आणि साहित्याचे रसिक वाचक आनंद देशपांडे यांनी एक वेगळाच उपक्रम केला. त्यांनी सोलापूरच्या 'तरुण भारत' या दैनिकामध्ये वर्षभर दाण्डेकरांच्या साहित्याचे स्मरण करून देणारी एक मालिकाच लिहिली. ती मालिका आता पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे. दाण्डेकरांच्या लेखकवृत्तीवर आनंदरावांचे प्रेम आहे. ते भक्तीकडे झुकणारे आहे. महाराष्ट्राच्या मातीवर गोनीदांचे असलेले मनस्वी प्रेम, इतिहासासंबंधीची आत्मियता, भटकेपणाची दाण्डेकरांची प्रवृत्ती या सर्वांबद्दल आनंद देशपांडे यांना आपुलकी आहे. ह्या लेखसंग्रहाच्या लेखनामागची ती मुख्य प्रेरणा आहे.

दाण्डेकरांनी निवडलेले विषय, त्यांनी निर्माण केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा, त्यांची खास रचनापद्धती आणि विषयाशी एकरूप होऊन अनुभव जिवंत करणारी भाषाशैली – ही सर्वगुणसंपन्न वाचकांच्या समोर आणावी, आणि या लेखमालेच्या माध्यमातून हा लेखक पुढच्या पिढ्यांच्या वाचकांसमोर यावा हा आनंद देशपांड्यांचा हेतू आहे. ते

मराठीचे अभ्यासक नाहीत, समीक्षक नाहीत; मात्र ते एक जाणकार रसिक वाचक आहेत. या संग्रहातल्या लेखांसाठी त्यांनी एक लेखनपद्धती स्वीकारली. कादंबरीचे विषयसूत्र नेमकेपणाने नोंदवले जाईल असे एक दीर्घ अवतरण ते निवडतात. त्यामधून दाण्डेकरांचे कथासूत्र, मांडणीचे कौशल्य, व्यक्तिरेखाटनाची धाटणी, भाषावैभव जाणवावे अशी त्यांची कल्पना आणि मग त्यानंतर दाण्डेकरांमधल्या लेखकाचे स्वत:ला जाणवलेले वैशिष्ट्य ते नोंदवतात.

या संग्रहातले मोजके लेख वाचले तरी हेही ध्यानात येईल की, देशपांडे यांना दाण्डेकरांच्या लेखनातील संस्कारमूल्येही फार महत्त्वाची वाटत असावीत. त्याखेरीज दाण्डेकरांचे स्वदेशप्रेम, निष्ठा, श्रद्धा, त्याग, आध्यात्मिक बैठक यांचे निर्देशही ते जागोजागी करतात. अनुभवसंपन्न असा हा लेखक 'उत्तम माणूस' म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या दर्जेदार मूल्यांबरोबर आपल्या लेखनातून पुरोगामी विचारही कसा सहजपणे पोहोचवतो याचीही नोंद देशपांडे करतात.

दाण्डेकरांसारख्या ज्येष्ठ लेखकाकडून वाचकाला किती,

काय आणि कसे मिळत जाते याचा कृतज्ञ निर्देश देशपांड्यांच्या या लेखनात आढळतो. त्यांच्या स्वत:च्या जीवनदृष्टीवरही त्यामुळे प्रकाश पडतो. मराठीतल्या आपल्याला आवडणाऱ्या एका मोठ्या लेखकाचे ऋण अशा रीतीने फेडण्याचा हा प्रयत्न स्तुत्य आहे.

अनेकदा असे होते की, 'दाण्डेकरांचे सगळे साहित्य मी वाचले आहे' असे म्हणणारे कित्येक वाचक भेटतात. वास्तविक त्यांनी दोन-चारच पुस्तके वाचलेली असतात. अशावेळी लेखकाच्या आपल्याला महत्त्वाच्या वाटलेल्या अठ्ठावीस पुस्तकांचा वाचकांना परिचय करून देणे हे काम निश्चितच मोलाचे ठरते. आनंद देशपांडे यांनी ते प्रेमाने, कर्तव्यबुद्धीने, सहज-साध्या रीतीने आणि यशस्वीपणे केले आहे, असे म्हणावेसे वाटते.

नव्या पिढ्यांच्या वाचकांना दर्जेदार लेखनाकडे नेण्याचा, त्यांना दाण्डेकरांच्या पुस्तकांमधून मिळणारी 'जगण्याची दृष्टी' देण्याचा आनंदरावांचा हा प्रयत्न नोंद घेण्याजोगा ठरावा.

**- वीणा देव**

# मनोगत

दि. १ जून १९९८ रोजी आप्पा गेले. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी एक आगळावेगळा कार्यक्रम सोलापुरात करायचे ठरले. त्याच्या पूर्वतयारीसाठी हिंडत होतो. अनेक मान्यवरांच्या गाठीभेटी घेत होतो. लक्षात असं येत होतं की, प्रत्येकाच्या वाचनाच्या प्राथमिकता ठरलेल्या आहेत. विषय ठरलेले आहेत, लेखक ठरलेले आहेत. आप्पांची ओळख ही एक तर 'मृण्मयी'कार म्हणून किंवा फार फार तर 'मोगरा फुलला'चे लेखक म्हणून. त्यावेगळं आप्पांनी विविध बोलीभाषांतून, वेगवेगळ्या विषयांवर केलेल्या अनुभवसिद्ध लेखनातून समृद्ध केलेलं व्यापक साहित्यविश्व आपणा सर्वांना अपरिचित आहे. ज्यांचं ज्यांचं मायमराठीवर, निसर्गावर, किल्ल्यांवर, मराठी आचार-विचारांवर मनापासून प्रेम आहे, त्यांना या वैविध्यपूर्ण साहित्याशी परिचित करणं आवश्यक आहे. म्हणून आप्पांच्या विविध विषयांवरील निवडक कादंबऱ्यांचा परिचय करून देणारी लेखमाला लिहायची या भूमिकेतून दै. तरुण भारत, सोलापूरमध्ये लिहिलेली ही लेखमाला 'निवडक गोनीदा'.

माझी यातील भूमिका वाटाड्याची; तुकोबांनी म्हटल्याप्रमाणे ‘फोडिले भांडार, धन्याचा हा माल, मी तो हमाल भारवाही’ अशी. या लेखांच्या वाचनाने आपल्याला या कादंबऱ्या वाचायला हव्यात; या किल्ल्यांना, या परिसरांना एकवेळ तरी भेट द्यायला हवी एवढं जरी वाटलं तरी माझा उद्देश सफल झाला असं मी समजेन. कुणा अभ्यासकाच्या अथवा समीक्षकाच्या भूमिकेतून या कादंबऱ्यांचं रसग्रहण वगैरे मी केलेलं नाही. ती माझी पात्रता नव्हे; अथवा तो माझा अधिकारही नाही.

स्व. आप्पांच्या चतुरस्त्र व भावपूर्ण लिखाणाचा प्रत्यय यावा म्हणून, त्याची चुणूक दाखविण्यासाठी म्हणून प्रत्येक लेखाची सुरुवात किंवा शेवट आप्पांच्या लिखाणाने केला आहे किंवा प्रसंगानुरूप काही ठिकाणी मधेही आप्पांचे लिखाण घेतले आहे, ते सर्व लिखाण मुद्दाम इटॅलिक (तिरक्या) टाईपमध्ये घेतले आहे.

नुसत्या लेखांवरच न थांबता स्वर्गीय आप्पांच्या अभिजात साहित्याच्या अनुषंगाने, जे शिवचरित्र आप्पांचा जीव की प्राण होतं त्यावर आधारित काही प्रकट कार्यक्रमाचं आयोजन करावं असं मनाशी योजलं मात्र, ते साकार करण्यासाठी

धावून आली असंख्य मंडळी, संस्था, साहित्यिक, कवी, वक्ते, फोटोग्राफर, दुर्गप्रेमी! या सर्वांनी मिळून सोलापुरात एक 'गोनीदा स्मृती महोत्सवच' घडवून आणला. या सर्व चळवळीला अधिष्ठान लाभलं तरुण भारत कला व्यासपीठाचं. या स्मृती महोत्सवातला एक उपक्रम म्हणून सौ. वीणाताई व विजय देव, रुचिर कुलकर्णी, मधुरा डहाणूकर हेही सोलापूरला येऊन गेले. आप्पांच्या 'पवनाकाठचा धोंडी' आणि 'मोगरा फुलला' या कादंबऱ्यांच्या अभिवाचनाच्या कार्यक्रमासाठी आलेल्या त्या सर्वांना आप्पांच्यावर, आप्पांच्या साहित्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य श्रोत्यांनी आपल्या प्रतिसादाने भारावून टाकलं.

दोन महिन्यांपूर्वी पहिल्या दुर्ग साहित्य संमेलनाच्या निमित्तानं एकत्र काम करीत असताना अचानक विजयराव देवांनी या लेखमालेचं पुस्तक करण्याची योजना मांडली. एखादी कल्पना सुचली की त्याच्या पाठीमागे हात धुऊन लागण्याचा विजयरावांचा स्वभाव. त्या लेखांची संगणकावर तयार केलेली मुद्रिते त्यांनी एकटाकी बसून तपासून हातावेगळी केली. माझ्यावरच्या प्रेमापोटी डॉ. सौ. वीणाताईंनी या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याचं

मान्य करून अतिशय कमी वेळात सुंदर प्रस्तावनाही लिहून दिली.

आता प्रश्न होता पुस्तक प्रकाशित करण्यासाठी तयार असणाऱ्या प्रकाशकांचा. या कामी धावून आले माझे स्नेही, हितचिंतक विश्वासराव काकडे, त्यांनी पुढाकार घेऊन 'अक्षरलेणं' प्रकाशनाच्या श्री. पुरुषोत्तम कुलकर्णी यांचा परिचय करून दिला. परिचय झाल्यावर लक्षात आलं की, ते माझ्या घरापासून हाकेच्या अंतरावर राहतात. पण एकमेकांपर्यंत पोहोचायला आम्हाला अकरा वर्षं लागली. पण पुस्तक करण्याचं मात्र पुरुषोत्तमरावांनी अकरा मिनिटांत मान्य केलं.

हे पुस्तक प्रेक्षणीय करण्यासाठी ज्याने यातील नितांत सुंदर रेखाचित्रे काढून दिली तो माझा हृदयस्थ मित्र पराग घळसासी; त्याच्या बोटाच्या जादूतून हे पुस्तक जिवंत झाले आहे.

१९९८ साली ही लेखमाला लिहायला मला प्रवृत्त करणारे दै. तरुण भारत, सोलापूरचे तत्कालीन संपादक श्री. विवेकराव घळसासी, तरुण भारतचा सेवकवर्ग या सगळ्यांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नाही, म्हणून या सर्वांविषयी

मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

ज्या काळात, ज्या वातावरणात, ज्या परिस्थितीत आप्पा या साऱ्या ठिकाणी हिंडले, वावरले ती ठिकाणं, ते किल्ले, ते वातावरण, ती परिस्थिती झपाट्यानं बदलते आहे. माणसांची माणुसकी ओहोटते आहे, भावनाशून्य व्यवहाराला भरती येत आहे, तीर्थक्षेत्रांची 'पर्यटन स्थळं' होत आहेत आणि किल्ल्यांची 'तीर्थ'क्षेत्रं होत आहेत. हे सारं वाढत जाऊन त्याचा कडेलोट होण्याआधी आपण हे पाहावं, अनुभवावं म्हणून ही धडपड. ती जाणून घेऊन आपण हे सारं पाहत असता, जर आपल्याला काही विपरित अनुभव आले तर तो दोष बदललेल्या परिस्थितीचा आहे, त्या ठिकाणांचा नाही हे आपण ध्यानी घ्यावं.

आजच्या बदललेल्या वातावरणात या साऱ्या कादंबऱ्या, चरित्रे यांचं साहित्यिक मूल्य नि:संयश मोठं आहे, पण त्यापेक्षाही या साहित्यकृतीचं संस्कारमूल्य फार महत्त्वाचं आहे. दूरदर्शनवर जे दाखवतील ते डोळे उघडे ठेवून आणि मेंदू बंद ठेवून पाहायच्या आजच्या काळात आपला वैभवशाली इतिहास, निसर्गसंपन्न भूगोल, उच्चतम नैतिक मूल्ये, समाधानी जीवनविषयक दृष्टिकोन वर्णन करणाऱ्या व त्या अनुषंगाने


मार्गदर्शन करणाऱ्या या कादंबऱ्या व चरित्रे म्हणजे भविष्यकाळाचे पाथेय आहे. ते तुम्हा-आम्हाला व तुमच्या-आमच्या पुढच्या पिढ्यांना उपयोगी पडो व त्यातून चारित्र्यसंपन्न व सुसंस्कारित आचारविचारांचे राष्ट्र निर्माण होवो हीच शिवप्रभूंच्या चरणाशी प्रार्थना!!

बहुत काय लिहिणे ।

आमचे अगत्य असों द्यावे हेचि विज्ञापना इति ।

**- आनंद रा. देशपांडे**

किंबहुना तुमचें केलें । धर्म किर्तन हें सिद्धि नेले ।
येथ माझें जी उरलें । पाईकपण ।।
(ज्ञानेश्वरी १८-९३)



# वाघरू

*"पुरंदराआडून नारायण चांगला हातभर वर चढला होता. पुरंदर, त्याच्या डावीकडलं धरणाचं पाणी, पैलचा रोहिडा किल्ला, त्याच्या लगतची डोंगरमाळ-सगळं जणू चित्र मांडलेलं असावं, तशागत दिसत होतं. सुवेळाच्या हातावर हात देऊन दहा-वीस सोंडा दो-बाजवांना खाली धावल्या होत्या. त्यांच्या माथ्यांच्या कोरींवरून उन्हं खालती घरंगळत होती. खालचं रान हिरवंकच्च. त्या अवघ्याला जणू कंठ फुटला होता. कुणी पाखरु ललकारत होतं. एकुटं शीळ घालत होतं. कुणी थांबून थांबून कुकारे वाजवीत होतं. कुणी त्या अवघ्या स्वरमेळाला ताल देत होतं. कुणाची विव्हल केका हे अवघं चिरून वर उठत होती. जों जों उन्हं तापत होती, तों तों हे स्वरमंडळ वरल्या तरफा झणझणवीत होतं."*

*'पायाखाली अतिशय नाजूक दहिंवर अंथरलं होतं. जणू तो कोवळ्या मोत्यांचा रुजामा पसरला असावा. तोही एकरंगी नव्हे, बहुरंगी. इवली इवली चिन्नी भिन्नी रानफुलं त्या दहिवरांआडून नवलानं आभाळ निरखीत होती. कसे त्यांचे*

*रंग, कशी त्यांची रूपं. किंबहुना चैतन्याला आलेला बहरच ते रूप धरून नाजुकवाणं हंसू हसत होता.''*

यासारखी निसर्गाची भुली घालणारी अनेक वर्णनं ज्या कादंबरीत आहेत ती आप्पांच्या लाडक्या राजगडावरची कादंबरी 'वाघरू.' एकदा लिहायचं ठरल्यानंतर सुरुवात कोणत्या कादंबरीपासून करायची हा प्रश्न माझ्यासाठी तेवढा अडचणीचा नव्हता. आप्पांच्या मनीमानसी शिवकाल आणि किल्ल्यांचं स्थान अढळ आहे. त्यातल्या त्यात राजगडाचं. तेव्हा लेखनाला सुरुवात करताना पहिला मान राजगडावर आधारित कादंबरीचा, अर्थात 'वाघरू'चा.

भोरपसल्या नसरापुराकडून पुढे गेल्यावर वेल्हे तालुक्यात असलेला हा अतिशय देखणा किल्ला. स्वतः शिवाजी राजांनी आपल्या देखरेखीखाली बांधून घेतलेला. त्याचा निसर्गसमृद्ध परिसर, त्यावर वर्षानुवर्षे, पिढ्यान् पिढ्या राहणारं बाबुदाचं कुटुंब, त्याची बायको, एकुलती एक मुलगी यसुदी, तिचा नवरा अन् बाबुदाचा जावयं 'हानुवती' यांची ही कथा. स्वातंत्र्यपूर्वकाळात गड नांदता होता, तेव्हा भगा धनगरानं आणून दिलेलं आणि बाबुदानं मोठ्या कवतिकानं पाळलेल्या

बिंबट्याचं पिलू, पुढं त्याला रानात सोडून दिल्यानंतर ते जेव्हा मोठं होऊन बाबुदाच्या गाईवर टप धरून हल्ला करतं, तेव्हा त्याची अन् हानुवतीची झालेली झुंज. अगदी जीवघेणी. त्यात हानुवतीची झालेली जीत, मध्येच त्या वाघराच्या शिकारीसाठी आलेला साहेब, हानुवतीनं केलेली रानडुकराची शिकार, त्याला घडलेला निसर्गाचा साक्षात्कार असं सारं सारं त्या राजगडाच्या साक्षीनं घडत असलेलं. त्यामुळे मधूनमधून येणारं राजगडाचं आणि त्याच्यावरच्या निसर्गाचं भुली घालणारं वर्णन. बाबुदाही अडाणी असला तरी जुन्या संस्कृतीच्या, परंपरांच्या मुळ्यांना घट्ट धरून असणारा. नव्या बदलांची जाण असूनही जीवनाचं तत्त्वज्ञान आपल्या भाषेत सांगताना...


*'अक्कल समदी मान्साच्या वाट्याला आली, प्वाटाला लागतं, तितकं खाऊन न्हाई भागायचं. डालगी, हारं, पेव, बळदं-समदं गच्च भरून ठेवा. करा साठा! मंग दुसरा कुणी बापडा ऱ्हाईना का, उपाशी! त्याला द्यायचं नाव सुदीक घ्येनार न्हाई! हिकडं पेवा-बळदांत साठवलेलं आन्न कुजून त्याला घान यायला लागल! पर त्ये कुणाला उचलून द्यायचं काही मान्साच्या मनीमान्शी उबं ऱ्हायाचं न्हाई! म्हणूनच रं,*

*भिका लागल्या! हाती कटोरा आला मान्सांच्या!'*

असं मर्मस्पर्शी भाषेत बोलणारा, जुन्या परंपरेचं जणू प्रतीक असलेला बाबुदा. त्याच्यावर करवादणारी, त्याच्या वाघरू प्रेमावरून त्याची हेटाळणी करणारी त्याची बायको, वहिनी. त्यांची एकुलती एक निर्भय, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची मुलगी 'यसुदी', तिच्यावर जीवापाड प्रेम करणारा, बाबुदाला मोठा माणूस मानणारा, त्यानं आखून दिलेल्या रेघेत वागणारा अन् शेवटी हातातल्या कुऱ्हाडीनिशी एकट्याने वाघराशी झुंज खेळणारा नेमबाज जावई 'हानुवती' यांची ही कथा. एकदा वाचून समाधान न झाल्याने पुन:पुन्हा वाचावी वाटणारी आणि आपल्याला हाताला धरून राजगडाकडे ओढत नेणारी!

याच ओढीतून, आप्पा ज्यांच्याबरोबर महाराष्ट्रभर फिरले त्या रवींद्र अभ्यंकरांबरोबर राजगडाला गेलो. बाबुदांकडेच उतरलो. गड पुरातत्त्व खात्याच्या ताब्यात गेल्यापासून हे कुटुंब गडाच्या निम्म्या वाटेवर एका झापावर राहात आहे. बाबुदाला आणि वहिनीला एव्हाना देवाघरचं बोलावणं आलेलं. हानुवती, यसुदी, त्यांची पोरं, सुना, नातवंडं असा सगळा गोतावळा स्वागताला हजर. रवीभाऊ आले म्हटल्यावर आनंद

पार राजगडाच्या बालेकिल्ल्याला भिडलेला. भरपूर गप्पा झाल्या. बाबुदाची ती जपून ठेवलेली बंदूक पाहिली. यसुदीच्या सुनेच्या हातची तांदळाची घावनं, निरसं दूध, साजुक तूप अन् तादंळाच्या गरम गरम भाकरी असा पाहुणचार घेतला. सगळ्यांच्या बोलण्यातून आप्पांच्या प्रकृतीविषयीची चिंता डोकावत होती. आठवड्याच्या बाजाराला गेल्यावर हानुवती अन् यसुदी न चुकता वीणाताईंकडे फोन करत होते. महिन्या पंधरादिवसांतून पुण्याला गेल्यावर न चुकता आप्पांना पाहून येत होते. असं सगळं कौटुंबिक जिव्हाळ्याचं नातं निर्माण झालेलं. आप्पा गेल्यावर विजयराव व वीणाताई आप्पांच्या अस्थी घेऊन गडावर गेले. दर्शनासाठी थोडावेळ अस्थी बाबुदाच्या झापावर ठेवून त्या हनुवती व यशोदेच्या हस्ते पद्मावतीच्या तळ्यात, बालेकिल्ल्यावरच्या चंद्रतळ्यात विसर्जित केल्या. जन्मभर ज्या राजगडाच्या आप्पांनी वाऱ्या केल्या, त्याच राजगडाशी, तिथल्या मातीशी आप्पा मृत्यूनंतरही असे एकरूप झाले.



# रानभुली

*‘रात्री स्वच्छ चांदणं होतं. दुसरे दिवशी गड उतरायचा होता. पहाटेसच म्हटलं की रात्री एकदा समाधीवर जाऊन दर्शन घेऊन यावं. मध्यरात्र व्हायला आली होती. हलका वारा झुडुपात शिरून सीत् सीत् आवाज घालीत होता. बाजारपेठ मागं टाकली. वाट पायाखालची होती. पूर्वेकडे अंधुक जगदीश्वराचा कळस दिसत होता. चढउताराची वाट पार करीत पलीकडच्या खडकावर पोचलो. दिसलं की उजवीकडे बामणवाड्याच्या पलीकडील घळीत म्हशी चरताहेत. त्यांच्या गळ्यांतल्या घाटरांचं खुटरुक् खुटरुक् आइकूं आलं.’’*

*डाव्या हाताला बोरीचं झाड. त्या प्रचंड खडकावर ते तेवढंच झाड. वाट त्याच्या जवळून होती. नि:शंकपणे चाललो होतो. तो झाडाखाली हसू आइकूं आलं. दचकलो. एकदम उभा राहिलो. दरडावून म्हणालो.*

*“कोण?’’*

*खरं तर दरडावून म्हणालो, हे खोटं. हादरलोच होतो. इतक्यांदा गडावर आलो. इतक्या मध्यरात्री एकटा दुकटा*

समाधीच्या दर्शनाला आलो. असं कधी विपरित घडलं नव्हतं. असं काही घडू शकतं यावर विश्वासच नव्हता. हे सर्व अर्ध्या क्षणात मनी डोकावलं अन् पुन: हसू, मनी तर नव्हे?

हांकारलो, ''मन्ये!''

हसत ती सावलीतून पुढे आली. जवळ जात म्हटलं,

''गाढवे, गद्ध्ये, ही काय म्हसरं चारायची वेळ आहे?''

खुदखुद हसत ती म्हणाली, ''निंगालाव् कुटं?''

''समाधीला- पण विचारलं काय मी?'' अजून हसू मावळलंच नव्हतं. दोन्ही हातांनी तोंड झाकीत म्हणाली, ''मंग हा काय समादीला जायचा येल हाये?'' अवाक् होऊन म्हटलं,

''आगो, पण काही रात्र? काही बेरात्र? काही भय? काही भीती?''

''कसला भेव आप्पा?''

हे तर खरंच. तिचा गडपुरुष होता, तो तिच्यावर छत्र धरून होता. त्याच्या आसऱ्यानं ती रात्रीबेरात्रीची कुठंही भटकू शकत होती. सर्वत्र तिला अभय होतं ही तिची श्रद्धा होती. दृढविश्वास होता. त्याविषयी वाद करायचं, शंका घ्यायचं काहीच कारण नव्हतं.

*गडावर तिचं अपार प्रेम, भक्ती, श्रद्धा कितीदा अनुभवलं होतं. गडासारखं प्रियतम हिला दुसरं कुणी नाही. अशीच पहाटे, दरदरत्या पावसात, दाटुरल्या थंडीत भिजत, कुडकुडत आपली गड हिंडत असायची. कितीदा तिला सूर्यास्ताच्या वेळी बाजारपेठेतल्या पडक्या भिंतीवर बसून सूर्यास्त न्याहाळताना पाहिलं आहे. पुसलं तर गालाला खळी पाडीत म्हणाली,*

*"पघा की आप्पा! नारायेन कसा ग्वाऽऽड दिसतो!" म्हणायची अन् पुनः मावळत्या सूर्याबरोबर आपणही जणू समुद्रात बुडी घ्यायची.*

तीस-पस्तीस वर्षं किल्ले हिंडता हिंडता किल्ल्यांवरच्या वास्तूंइतकीच त्या किल्ल्यांच्या परिसरात राहणारी माणसंही आप्पांची जिवलग, आप्त झाली होती. त्यांनीही ओळखलं होतं की, वारंवार गडाला भेटी देणारा हा माणूस हा इतर गड पहायला येणाऱ्या माणसांसारखा नाही. त्याचंही या गडावर, इथल्या वास्तूंवर, इथल्या निसर्गावर, आपल्यावर आणि थोरल्या महाराजांवर आपल्याइतकं प्रेम आहे. जीव आहे. त्या क्षणापासून ते नातेसंबंध जुळले ते कायमचेच. राजगडावरल्या बाबुदाची मुलगी यसुदी म्हणायची,

*“येकलं आप्पा गडावर असलं की गड कसा भरल्यावानी वाटतो”*

या अशा प्रकारच्या नात्यातूनच जन्माला आलेली कादंबरी ‘रानभुली’ रायगडवरल्या रावजी अवकिरकराच्या मुलीची, मनीची ही कथा. विशेष म्हणजे आप्पाही कादंबरीमधील एक पात्र आहेत आणि त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे आप्पा रावजींच्या कुटुंबाचा एक अविभाज्य भाग आहेत, म्हणजे होते.

प्रत्येक मराठी माणसाचं मन जिथं एकदा का होईना पण भेट देण्यासाठी आसुसलेलं असतं, निसर्गानं ज्याला आपलं सर्वस्व बहाल केलं आहे, ज्याला प्रत्यक्ष विधात्यानं घडवलं आहे, थोरल्या महाराजांनी ज्याला अभिषिक्त राजधानीचा मान दिला आणि सरतेशेवटी आपलं विहितकार्य संपल्यावर त्या महापुरुषानं जिथं चिरनिद्रा घेतली तो ‘शिवतीर्थ रायगड’. अशा रायगडावर जन्माला आलेली, त्याच्या कुशी-खांद्यावर वाढलेली मनी, मोठी झाल्यानंतर, लग्न झाल्यानंतर जेव्हा गड सोडून जायचा प्रसंग येतो तेव्हा तिच्या जिवाची झालेली घालमेल, त्याहीनंतर नवऱ्याला मुंबईत बँकेत चपराशाची नोकरी मिळाल्यावर त्याच्याबरोबर जेव्हा मुंबईच्या झोपडपट्टीत

राहायची वेळ येते तेव्हाची जीवघेणी कासावीस, हे सारं आप्पांनी प्रचंड ताकदीनं वर्णन केलं आहे. याचंही महत्त्वाचं कारण म्हणजे आप्पांनी हे सारं अनुभवलं आहे. मनीचं गडप्रेम, तिची श्रद्धा हे सारं समजणारा, त्या विश्वात वावरणारा आप्पांसारखा समानधर्मा तिला भेटलेला असतो. आप्पांच्या शब्दाखातर ती मुंबईत यायला तयार झालेली असते. पण मुंबईच्या झोपडपट्टीतील त्या नरकयातना भोगताना हे रानफूल पार कोमेजून, सुकून जातं. त्या सगळ्यातून सुटका करून घ्यायच्या नादात तिसरंच संकट उभं राहातं. केवळ वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठी जमलेली ती माणसांची गर्दी पाहून ती आप्पांना विचारते,

*''कशासाठी ऱ्हायचं हितं?''*

*''पोटासाठी! सगळा हा जो गर्दावा दिसतोय ना, पोटामागं लागून इथं गोळा झाला आहे.''*

*''असं किती लागतं पोटाला?''*

*''बरोबर आहे तुझं!'' गोळाभरच लागतं. त्याच्या पलिकडे काही कुणी पोटावर थापीत नाही, पण हेच मिळालं पाहिजे ना?*

*''आप्पा, ही दारू, हे डावावर पैका लावनं, हे कुना*

*बापड्याच्या पोटात सुरा भोकनं.''*

*''काल शिनेमा बगता येली तुम्ही सांगितला. तो हसना खोटा, तो रडना खोटा – अन् खरा काय तो सांगा बघू?''*

असा रोकडा सवाल विचारून ती आप्पांचीही मती गुंग करून टाकते. निदान तिच्या नवऱ्याच्या साहेबाकडून तरी तिची समजूत काढावी म्हणून आप्पा त्या दोघांना साहेबांच्या घरी घेऊन जातात. तिथेही ती कुणालाही दाद देत नाही असं पाहिल्यावर साहेब रागावून म्हणतात,

*''त्याला त्याची नोकरी गमवावी लागेल.''*

*''आनी?''*

*''आणि काय? दुसरी शोधीत हिंडावं लागेल. अन्नान्न दशा होईल. न मिळाली तर गावी परतावं लागेल!''*

*''माजा त म्हन्ना, की आताच गडाकडे परतावा!''*

*''अन् खावा काय?'' जणू वेडावीत साहेब बोलला. गर्वभरानं मनी म्हणाली,*

*''मी घालीन त्याला खायला! सासुरवाडीस पर ऱ्हाऊ द्यायचो न्हाई! गडावर झोपडी बांदीन. धनगराला लागते केवढी? मी सवता खपून बांदीन. त्यात नवऱ्याला थापीन. त्यात निस्तं*


*बसावं. दोन गाई पालीन. दोन म्हसरं, दूद काढीन. मीठमीरची आनीन. गडाखाली रान काढीन. नागली रोपीन. खला करीन. बोजे वागदरवाजानं वर आनीन. दलीन. रांधीन. न्हवऱ्याला गरम गरम वाढीन. नागलीची भाकरी, गाईचा दूध. सासुरवाडीला जिक्त हाय तिक्त मी गडावर उबं करीन. मना तुमी नबली समजू नका! वाघराच्या तोंडातून वासरू-जिती भाईर काढली, मना न्हवरा सांबालना काय जड न्हाई! पर तो सगला गडावर! हितं? छी!''*

*''घानीत किडे वलवल करतात तसला तो जिना''*

तुमच्या-आमच्या जीवनविषयक दृष्टिकोनांना गाठता येणार नाही अशा उंचीवरलं बोलणं मनीला साधतं ते केवळ एवढ्यामुळेच की तिचा जन्मच मुळी रायगडाच्या कुशीत झालेला. स्वतःच्या सामर्थ्यावर, परिश्रमावर ज्या युगपुरुषानं या देशात एक नवं चैतन्यदायी विश्व निर्मिलं, स्वराज्य निर्माण केलं, त्या स्वराज्याच्या अभिषिक्त राजधानीत जन्माला आलेली ती गडवेडी मनी. ती केवळ पोटासाठी मुंबईच्या झोपडपट्टीतील ते नरकवासयुक्त जीणं जगेल याची कल्पनासुद्धा करता येणं कठीण आहे.

आपलं नागरी जीवन आणि गडावरचं स्वच्छंद जगणं यांचं इतकं सुंदर वर्णन आप्पांनी रानभुलीत केलं आहे की, केवळ हे अनुभवण्यासाठी तरी एकदा का होईना रायगडला जाऊन यावं. बऱ्याच वर्षांपूर्वी रायगडाच्या एका खेपेत रावजीची गाठ पडली होती. विठ्ठलची, मनीच्या भावाची गाठ दरवेळी पडतेच. मधे एका पौर्णिमेला त्याच्या घरासमोरच्या मोठ्या कातळावर आमचा गप्पांचा फड जमला होता. केव्हातरी मनीचीही गाठ पडेल अशी आशा आहे.

एखाद्या सश्रद्ध वारकऱ्याने आळंदी-पंढरीच्या वाऱ्या कराव्या तशा आप्पांनी रायगड-राजगडाच्या वाऱ्या केल्या. न थकता. कधी एकट्याने, कधी गोतावळा बरोबर घेऊन. पावसात, थंडीत, उन्हाळ्यात. कधीही मार्गातल्या कुणी सश्रद्ध खेडवळाने वारकऱ्यांची घ्यावी तशी या गडावरल्या लोकांनी आप्पांची काळजी घेतली. आप्पांनीही त्यांना घरचं मानून आपल्या साहित्यातून त्यांना अजरामर करून टाकलं. थोरल्या महाराजांच्या काळातल्या हिरकणीइतकीच आप्पांची ही 'रानभुली मनीही' तुमच्या-आमच्या स्मृतीत जिवंत असेल, अगदी कायमची!



# माचीवरला बुधा

*‘बुधाच्या झोपडीमागं उंबर, अन् पलीकडे बुधानंच लावलेली साताठ पांढऱ्या चाफ्याची झाडं होती. त्यानं बहिरोबाच्या देवळाजवळून चाफ्याचे ढगळे तोडून आणून जमिनीत टोचून दिले होते. पाहता पाहता त्यांची झाडं झाली होती.’*

*फाल्गुन लागला अन् चाफ्याची सगळी पानं गळून पडली. त्यांच्या फांद्यांच्या टोकाला बारीक बारीक कळ्या धुमारल्या. ती टोकं तांबूस चकचकीत दिसू लागली. होता होता कळ्या फुलल्या. सगळं टेमलाईचं पठार चाफ्याच्या वासानं घमघमायला लागलं.*

*उंबराचीही पानावळ पार झडून गेली होती. पण फाल्गुन लागताच त्या झाडाच्या अंगी चैतन्य रसरसलेलं दिसू लागलं. त्याच्याच अंगी तरी का, सगळ्याच झाडांची तीच गत झाली. आवळीही. रानाची सगळीच झाडं नव्हाळली. देखणी दिसायला लागली. त्यांच्या फांद्यांच्या हातांना जणू कोवळी तांबूस नखं फुटली. त्या कोवळ्या झळाळीनं सगळं रान श्रीमंत झालं.*

*पळसाची फुलं करंज्याच्या आकाराची, तसलीच पोकळ,*

*त्यांना नाही म्हटलं तरी नाजुकसा सुगंध. ती पुढल्या अंगानं उमलायची. मग पांढुरक्या पापुद्र्यांतून केशरी पाकळ्या बाहेर यायच्या. पोपटाच्या चोची असाव्यात, अशी ती फुले दिसायची. होता होता सगळा पळस केशरी दिसू लागायचा. जणू काय विठुब्बाचे वारकरीच खांद्यावर भगव्या पताका घेऊन पंढरीला निघाले आहेत.*

जनसंपर्कापासून दूर, निसर्गाच्या कुशीत, मुंबई-पुणे रस्त्यावरच्या लोणावळ्यापासून जवळजवळ १५-१६ किलोमीटर आत सह्याद्रीच्या रांगेत असलेला राजमाचीचा किल्ला. राजगड-रायगडाखालोखाल आप्पांचं अत्यंत आवडीचं ठिकाण. एखाद्या आजोबांनी आपल्या दोन नातवंडांना आपल्या दोन मांड्यांवर बसवून घ्यावं तसे सह्याद्रीने राजमाचीचे दोन आवळेजावळे बालेकिल्ले आपल्या मांडीवर घेतलेले. श्रीवर्धन आणि मनरंजन. पन्नास सालच्या आसपासच्या आप्पांनी राजमाची पहिल्यांदा पाहिला आणि तिथल्या निसर्गानं, त्या जंगलानं, त्या कडे-कपारींनी, तिथल्या कोसळत्या पावसांनी आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्या किल्ल्याचं रूप आणि त्याच्या घेऱ्यात राहणाऱ्या माणसांनी आप्पांना अशी काही भुली घातली

की आप्पा झपाटल्यासारखे राजमाचीच्या वाऱ्या करू लागले. कमीत कमी शे-शंभर तरी वाऱ्या आप्पांनी निश्चितच केल्या असतील. 'दहा दुर्ग-दहा दिवस'सारखी भटकंतीची आश्चर्यजनक योजना आखून त्याची सुरुवात राजमाचीपासून करून दहाव्या दिवशी आप्पा बरोबरच्या सवंगड्यांना घेऊन रायगडावर पोहोचले होते. या मोहिमेतच आप्पांचं मैत्र जुळलं उढेवाडीत राहणाऱ्या खंडबा उंबऱ्याशी. हे स्नेहबंधन पुढं इतकं दृढ झालं की, खंडबाचं व्यक्तिमत्त्व, राजमाचीचा परिसर, तिथला निसर्ग आणि आप्पांची कल्पनाशक्ती यांच्या अजोड मिश्रणातून एक साहित्यकृती निर्माण झाली 'माचीवरला बुधा.'

अगदी सातवाहन कालापासूनच्या इतिहासात, म्हणजे इसवीसनाच्या अडीचशे वर्षं आधी आणि अडीचशे वर्षं नंतर अशी चांगली पाचशे वर्षे पाय रोवून उभा असलेला राजमाचीचा किल्ला. मराठेशाहीच्या काळात गड नांदता असताना गडावरचं पाणी राखायचं काम ज्या चऱ्हाटे कुटुंबाकडे होतं त्या कुटुंबातलं एक जुनं खोड 'बुधा चऱ्हाटे'. बालपण सगळं किल्ल्याच्या अंगाखांद्यावर खेळण्यात गेलेलं. तारुण्य मुंबईत गोदीत आणि भायखळा स्टेशनवर हमाली करण्यात हरवलेलं आणि आता

आयुष्याच्या संध्याकाळी दोन्ही डोळ्यांत फूल पडल्यामुळं अधू झालेला बुधा आपल्या जन्मभूमीची, तिथल्या रानावनाची, वाडवडिलांनी कसलेल्या, पण उजाड झालेल्या जमिनीची आठवण येऊन काहीएक निश्चय करून राजमाचीला परत येतो; गावात परतून तिथं त्या वाडवडिलांच्या इनामाच्या जागेत, टेमलाईच्या पठारावर गावापासून थोडं दूर एका उंबराच्या छायेत झोपडं बांधून राहायला सुरुवात करतो. गावकरी त्याच्या या जगावेगळ्या निर्णयाचं आश्चर्ययुक्त स्वागत करतात. आजपर्यंत मुंबईकडं गेलेला माणूस परत गावाकडे आलेला त्यांनी कधी पाहिलेला नसतो आणि ऐकलेलाही नसतो. त्या तसल्या बंबाळ्या रानात बुधाचं झोपडं उभं राहातं. सोबत असते चार-दोन खारी, साताठ चिमण्या आणि इतर पक्ष्यांची. बुधा मग आवर्जून त्यांच्यासाठी तांदूळ, नागलीच्या भाकरी, कधी मूठ मूठ सावा असं काहीबाही झोपडीच्या आतबाहेर पसरून ठेवतो. गप्पा मारायला कुणीतरी असावं म्हणून एक कुत्र्याचं पिलूही आणून ठेवतो. त्याच्यासाठी अन् स्वतःसाठी दुधाची सोय करावी म्हणून एक शेळी अन् तिची दोन करडं यांचीही या बुधाच्या संसारात भर पडते. झाडाझुडपांनी तर मग का

मागे राहावे? काही फुलझाडं, काही वेल, एक आवळीचं झाड असे तेही या संसारात सामील होतात. बुधा मग सगळ्यांना काहीबाही नावं ठेवतो. उंबराला-‘उंबरबाबा’, आवळीच्या झाडाला ‘आवडीबाई’, घागरीला-‘घागरताई’, चिलीमीला ‘चिलीमबाई’ हे सगळे बुधाचे त्या रानातले सखे-सोयरे होतात. त्यांचा इतका लळा त्याला लागून राहातो की मुंबईला परत चल म्हणून त्याचा मुलगा भिव्या जेव्हा बोलवायला येतो तेव्हा साफ नकार देऊन बुधा त्याला ऐकवतो.

*‘भिव्या, आरं, तू मघा म्हंगालास, का बिरान्या गावाचा गोतावळा गोळा क्येला! ल्येकरा, हाये त खरंच! पर आसं पघ, का घागरताई आन् उंबरबाबा, दोघंबी कधी धडूतं मागाया येत न्हाईत, का ज्यावाय् धिलं न्हाई म्हनून रुसत न्हाईत! उंबरबाबा आपली शितळ सावली मातर रातदीस झोपडीवर धरून हुबा हाये! असा बंदुराजा कुटं मिळंल का? आं?’*

बुधाच्या जीवनाचं हे एक अंग आहे. मुंबईत राहिल्याने, भजनी मंडळात गेल्याने, त्याची ‘न्यानशेरी’ची, हरिपाठाची, तुकारामबोआच्या गाथ्याची तोंडओळख आहे. त्यातील काही अभंग त्याला तोंडपाठ आहेत. सकाळी उठल्यावर एखादी

भूपाळी, एखादा अभंग म्हणून दिवसाची सुरुवात करावी हा त्याचा दिनक्रम आहे. तुकोबांनी सांगितलेल्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे' या वचनावर त्याचा गाढ विश्वास आहे. आज ना उद्या केव्हातरी तो सोयरा, तो वनचर आपल्याला भेटल्याशिवाय रहाणार नाही याची त्याला खात्री आहे. इथंच, या राहाळातच, या वनातच कुठेतरी तो आपल्याला भेटणार आणि अंतकाळी आपल्याला हाताला धरून घेऊन जाणार याविषयी बुधाच्या मनी शंका नाही. तो सारखा त्या रानात त्याला शोधतो आहे आणि अचानक,

*''अश्विनी पुनव होती. गेल्यावर्षीची. बोंबल्यानं बुधाला दूध प्यायला बोलावलं होतं. दूध पिऊन बुधा परतत होता. लवण ओलांडून तो पठाराची वाट चढू लागला होता. देखणं चांदणं भुईवर अंथरलं होतं. वाट किंचित सादळली होती. मऊ झाली होती. चांदणंही सुखाचं वाटत होतं. पुनवेचा चांद असा डोक्यावर यायला झाला होता. त्याचं चांदणं वरून झरत होतं. ते थांबतच नव्हतं. पाऊस पडतो, अन् वाहून जातो पण चांदणं वाहून जात नव्हतं. जणू भुई तहानली होती. ती अधाशासारखी ते चांदणं पिऊन टाकीत होती.''*

समोर ते आवळेजोवळे उभे होते. श्रीवर्धन आणि मनरंजन. दोघांनीही उन्हाची कांबरुणं काढून फेकली होती. ते दोघेही नागोडे उकिडवे बसून चांदण्याच्या छपराखाली नाहात होते. अजून कड्यावरून पाणी झरत होतं. त्या आरशात चांदणं आपलं तोंड पाहात होतं. पलीकडे दरी पसरली होती, अन् तिच्या या अंगाला डोंगर. हा दरीचा वाडगा चांदण्यानं लबलबा भरला होता. दरीच्या अलिकडे होती भात अन् साव्याची खाचरं. भाताचा प्रत्येक रोपा खाली वाकला होता. नम्र झाला होता. लोंबीतला दाणान् दाणा तांदळानं तुडुंब भरला होता. गर्भवतीसारखा तो रोपा पिवळसर दिसत होता, अन् आता पंगतीत बसून चांदणं पीत होता. दिवसा काळेभंगार दिसणारे खडक आता रूपवंत झाले होते. त्यांच्या काळेपणावर चांदिण्याची झिलई चमकत होती. चंद्र नेमका माथ्यावर आला. अन् त्या सोन्याच्या क्षणी त्या कुणीतरी बुधाला मिठी मारली. ती मिठी पडताच पहिल्याक्षणी बुधाच्या अंगाला शिरशिरी दाटली. त्याला झांजावल्यासारखं झालं. पण दुसऱ्या क्षणी त्याला असं वाटतं, की आपला जुना देह मागं राहिला आहे. आता लाभला आहे नवा, तरुण देह. त्या देहाला झाड हे पाठचा

*भाऊ वाटतंय. आता दुरावा उरला नाही. द्वैताची कोळिष्टकं झडली. अंगाअंगांत जवळीक हेलावते आहे. हे सगळंच रान दूरपणाचा बुरखा टाकून आपल्याला खेव देऊ आलं आहे. हे अन् आपण एक झालो आहोत. एकमेकांत मिसळून गेलो आहोत. अवघेंचि त्रैलोक्य आनंदाचे आतां!*

*तृप्ती तृप्ती म्हणतात ती हीच. त्या तृप्तीची वीणा झणझणू लागली. त्या लयीत हरपून बुधा बसून राहिला.*

साक्षात्काराचं हे वर्णन वाचत असताना मनोमनी खात्री पटते की, बुधाचं निमित्त करून आप्पा त्यांना राजामाचीच्या भ्रमंतीत आलेले असे अनेक साक्षात्काराचे अनुभव आपल्यासमोर मांडत आहेत आणि आपण बसल्याठायीच त्या साक्षात्काराचे साक्षीदार होत आहोत. ही सारी कादंबरी वाचत असताना आपण एका वेगळ्या विश्वात वावरत आहोत, नाना तऱ्हेचे तरल आणि सूक्ष्म अनुभव आपणास येत आहेत असा एक भाव मनामध्ये उमटत राहातो. किंबहुना आप्पांच्या साऱ्याच कादंबऱ्यांमध्ये आप्पांचं अस्तित्व शरीरामध्ये वास करून असलेल्या आत्म्यासारखं जाणवत राहातं. त्याची जाणीव होते, त्याचं अस्तित्वही सर्वत्र भरून उरतं, पण पडद्यामागच्या

दिग्दर्शकासारखं ते समोर कधीच येत नाही. आलंच तर मात्र ते वर वर्णन केलेल्या साक्षात्काराच्या अनुभवासारखं. या साऱ्या अनुभवांमधून आप्पांची आध्यात्मिक उंची जाणवत राहाते. मग तो अनुभव हानुवतीला आलेला असो की बुधाला, धोंडीला आलेला असो की नाग्याला. तो अनुभव, तो साक्षात्कार आप्पांना झालेला आहे आणि तो जसाच्या तसा आपल्यापर्यंत पोहोचवण्याचं सामर्थ्य आप्पांच्या लेखणीतून जाणवत राहातं, अगदी दिव्यदृष्टीने विश्वरूपदर्शन पाहून आपल्याला सांगणाऱ्या संजयासारखं. या वैचारिक उंचीमुळे बुधाचा मृत्यू वर्णन करतानासुद्धा आप्पा तसंच आध्यात्मिक उंचीवरला अनुभव देणारं वर्णन करतात.

*''झुंजुरकं फुटलं, ढगांच्या पडद्यातून तांबडा प्रकाश झरू लागला. ती जाणीव होताच इतके दिवस जणू घरट्यात कोंडून घातलेली पाखरं चिवचिव करीत घरट्याबाहेर पडली. बुधाच्या चिमण्या घाईघाईनं त्याच्या झोपडीकडे उडाल्या.''*

*झोपडीचं दार लावलेलं नव्हतं. बकऱ्या आघासल्यासारख्या झोपडीबाहेर पडत होत्या. चिमण्या चिवचिव करीत दारात बसल्या. पण त्यांना नेहमीप्रमाणे सावा टाकलेला दिसला*

*नाही. बुधाला जागं करावं, म्हणून त्यांनी खूप कलकलाट केला. त्या तिथल्या तिथं नाचल्या.*

*तितक्यात खारीही उंबरावरून खाली उतरून झोपडीच्या दारात आल्या. त्या दारातच थांबल्या नाहीत. झोपडीत शिरल्या. पण त्यांना नेमलेल्या खांबापाशी नागलीच्या भाकरीचे तुकडे दिसले नाहीत. मग त्या आश्चर्यानं चिरचिरत इकडेतिकडे पाहू लागल्या.*

*त्यांचं पाहून चिमण्याही आत आल्या. आत आल्यावर त्यांना दिसलं– त्या सगळ्यांनाच दिसलं की आपला मायाळू धनी शांत झोपला आहे. त्याच्या अंगाला मुंग्या लागल्या आहेत.*

वीस वर्षांपूर्वी राजमाचीला गेलो होतो. उढेवाडीतलाच मधू राजमाचीकर बरोबर होता. त्यानं आमराईपलीकडच्या पठारावर नेऊन आंब्याचं एक झाड दाखवीत म्हटलं होतं, 'आमी याला आप्पांचा आंबा म्हणतो. राजमाचीला आल्यावर आप्पा दुपारी या आंब्याच्या सावलीत झोपायचे.' यापेक्षा आप्पांच्या निसर्गप्रेमाचं, किल्ले आणि त्यावरील माणसं यांच्याविषयीच्या प्रेमाचं वेगळं असं कोणतं प्रमाणपत्र पाहिजे!

रायगड-राजगड-सिंहगड-पावनखिंड या ठिकाणांबरोबरच आप्पांच्या कुटुंबीयांनी आप्पांच्या अस्थी राजमाचीवरल्या त्या तळ्यातही विसर्जित केल्या. त्या तळ्याकाठच्या महादेव मंदिरात बसून आप्पांनी लिहिलेलं बुधाच्या मृत्यूचं वर्णन वाचलं. सगळ्यांचाच कंठ दाटून आला. अगदी राजमाचीचासुद्धा!



# पवनाकाठचा धोंडी

*‘ज्येष्ठ सरायला आला होता. आषाढाला सुरुवात होणार होती. सारं रान उन्हाळाभर तापून निघालं होतं. लहालहा करीत होतं. चालताना पोटऱ्यांना त्याची झळ जाणवायची. धरतीला भेगा पडल्या होत्या. जणू तिनं तोंडच वासलं होतं!’*

*पण झाडंझुडपं मात्र उतली मातली होती. काहींच्या अंगावर कोवळी पालवी झुलत होती. तांबूस, सोनेरी, कोवळी, लुसलुशीत. काहींचा तांबूसपणा संपून गरगरीत हिरवा साज अंगावर साजत होता. काहींच्या हिरवेपणात काळी झाक होती. माजोरीपणाची खूण, धाल्याची खूण, चेतना उताला जात असल्याची खूण.*

*धोंडीची नजर शेतावरून फिरते आहे. माळावरून धावते आहे. अभिमानानं त्याची छाती उंचावते आहे. नम्रतेनं त्याची मान खाली वाकते आहे.*

*शेतं अगदी तयार आहेत. नांगरून, कुळवून, पाळी फिरवून देखणी दिसताहेत. स्वच्छ उपवर वधूसारखी उत्सुक, पावसासाठी, जीवनासाठी. कुठं कुंद्याची पात नाही, का कुठं*

*खतांतली काडी नाही. मावळतीकडून ढग उठायला लागले आहेत. काळे काळे भले भरदार. तूर्त नुसती पळापळ चालली आहे त्यांची. पण लवकरच ते जमून बरसणार आहेत. शेकोटीभोवती गोळा झालेल्या पोरांसारखे. भजनाला बसलेल्या टाळकऱ्यांसारखे.*

*धोंडी शेताकडे कृतज्ञतेनं पाहतो आहे. या काळीनं त्याला कधीच फसवलं नाही. कधीच धोका दिला नाही. त्यानं श्रम केले, भक्तीनं, श्रद्धेनं; तिनं पीक ओतलं त्याच्या पदरात.*

*तो म्हणतो आहे, 'काळी माय! वाडवडलांचं हे चालवतोय म्होरं. माजं कायबी न्हाई याच्यात. वाडवडलांनी तुज्यात रगात वतलं. तू त्यांच्यावर परसन् झालीस. माज्याकडनं तिक्तं अजून घडलं न्हाई, पर तू घडवून घ्ये.'*

बारा मावळातल्या पवन मावळातला तुंगीचा किल्ला. तुंग म्हणजेच उंच. धोंडीचे पूर्वज या किल्ल्याचे हवालदार. या हवालदारीपोटी त्यांना इनाम मिळालेली दहा एकराची पवनेकाठची जमीन. त्याच जमिनीत मागं एकदा लढाई होऊन तेव्हाचा हवालदार तिथं गमावलेला. त्याच्या नावचा एक वीरगळ तिथं उभा केलेला. धोंडीचं या हवालदारीवर, तुंगीच्या

किल्ल्यावर, या परिसरावर, त्या दहा एकर जमिनीवर मनापासून प्रेम, श्रद्धा, भक्ती. ती कधी काळची लोप पावलेली हवालदारी धोंडी अजूनही आवडीने निभावतोय. या जगावेगळ्या नवऱ्याचं वेगळेपण माहीत असलेली, त्याच्या सुखदु:खात समरस होणारी आणि त्याच्या धाकट्या भावाला पोटच्या पोरासारखं जपणारी त्याची बायको, सारजा. या जगाशी नातं जुळवून घ्यायला उत्सुक असलेला, तारुण्याच्या मस्तीत बेहोश असलेला, धाकटा भाऊ कोंडी आणि नवऱ्याचं हे वागणं मनाला न पटताही त्याला सावरून घेणारी, समजावून सांगणारी, थोरल्या दिराचं मोठेपण उमगून त्याची भक्तियुक्त आदराने देखभाल करणारी कोंडीची बायको सरस्वती. या चौघांची ही कथा. साऱ्या गावावर या धोंडीचं प्रेम अन् धाक, दराराही तेवढाच. साऱ्या जुन्या चालीरीती, परंपरा, त्यांची जपणूक ही धोंडीची आवडती कामं. शेतात राबायला उभा राहिला म्हणजे धोंडीसारखं निसबतीनं काम करणं भल्याभल्यांनाही जमायचं नाही. त्या दहा एकराच्या काळ्या तुकड्यावर त्याचं जीवापाड प्रेम. आपलंही रक्त आपल्या वाडवडिलांसारखं त्या काळ्या मातीत सांडावं ही त्याची इच्छा. असा हा जगावेगळा धोंडी. ‘पवनाकाठचा

धोंडी' म्हणून अप्पांनी या कादंबरीच्या प्रस्तावनेत एवढंच लिहिलं,

*'बदलत्या परिस्थितीच्या पुराबरोबर वाहात जायचे नाकारणाऱ्या एका झुंजार माणसाची ही कथा. या भाग्यवान देशात असे अनेक धोंडी आजही इतस्ततः विखुरले आहेत. हे त्यांचे कौतुक. त्यांनी वेळात वेळ काढून वाचावे ही इच्छा. किंबहुना ही कथा त्यांच्यासाठीच लिहिली आहे.'*

खरोखरच आजही बारा मावळातल्या या किल्ल्यांच्या परिसरात, घेऱ्यात असे अनेक धोंडी आपल्याला आढळतील. त्या त्या किल्ल्यांच्या छायेत कष्ट उपशीत केवळ लंगुट्या लावून दिवस काढणारे, पोटासाठी मरेस्तोवर कष्ट करीत असताही आल्या- गेल्याची चौकशी करणारे, त्यांचं आदरातिथ्य करणारे, थोरल्या महाराजांच्या वेळच्या आठवणीत रंगून जाणारे, त्यांच्याबरोबर वावरलेल्या आपल्या पूर्वजांविषयी अभिमान बाळगणारे असे कितीतरी धोंडी आजही आपल्याला भेटतील. आजच्या सडक्या, कुजक्या ग्रामीण राजकारणापासून दूर; सोळाव्या, सतराव्या शतकातल्या वातावरणात रमणारी ही माणसे पाहिली की नकळत आपणही त्यांच्याबरोबर तेवढी

वर्षं मागे जातो. या सर्वांचा प्रतिनिधी हा धोंडी. धाकटा भाऊ वयात आल्यावर त्याच्यावर हा शेतीचा भार सोपवून आपण निवांत पंढरीच्या वारीला जावं असा विचार करणारा धोंडी जेव्हा त्याला समजते की, धाकटा भाऊ हा शेतीच्या व्यापात रमायला तयार नाही व चार म्हशी आणून त्यांचे दूध विकायचा धंदा करण्याचा त्याचा विचार आहे, तेव्हा खवळून तो म्हणतो,

*''आरं चांडाळा! कुठून तुला ही बुद्धी सुचली म्हनावं? तुज्या वाडवडलांनी कुनी क्येला होता का गोरसाचा इकरा? त्या गाढवाला म्हनावं, हवालदाराच्या घरान्यात कुनी क्येला हुता का दुदाचा धंदा? अरं, तू त्या हवालदाराच्या वंसाचा दिवा! समदा पवनपट्टा तुला हवालदार म्हणून मुजरा करणार! आन तू दूद इकितोस? आरं ईख का खात न्हाईस त्यापरीस? आरं मर्दा, तुज्या वाडवडलांनी शिवाजीराजाच्या वख्ताला तलवार मारली! शिवाजीराजानं परसन्न होऊन ह्यो तुंगीगड धिला. त्याचा तू हवालदार, या गडाचा - या गडाखालच्या पट्ट्याचा! तुजा आजा दिमाखानं कचेरीत बसून या पवनपट्ट्याचा न्याय करायचा. हितलं भांडान वर जायाचं न्हाई! हितल्या हितंच मिटायचं. तुजा आजा शेजारी तलवार ठेवूनशान बसायचा.*

*मी त्याच्या मांडीवर बसून त्ये समदं कवतिक पघितलं - या आपल्या डोळ्यांनी. अन् मुर्दाडा, तू कुळाचा टेंभा दूद इकनार? कुनीबी पोरासोरानं हाक घालावी, ए दूदवाल्या! हिकडं ये? आरं, आरं, आरं! थूं तुज्या जिन्यावर! या परीस हवालदाराचा वंस खंड झाला असता, तर त्ये लई बरं झालं असतं!''*

असं टोकाचं बोलूनही शेवटी सारजेच्या आग्रहाखातर कोंडीला म्हशी आणून देणारा अन् तितक्याच निग्रहाने या दूध विक्रीतला एकही पैसा घरात आलेला मला चालणार नाही असं ठणकावून सांगणारा धोंडी, कोंडीच्या भावी वधूला, सरूला जेव्हा पाहातो, तिला शेताविषयी वाटणारा जिव्हाळा त्याला जाणवतो तेव्हा तिला आपल्या आजीच्या रूपात पाहून साऱ्या शेताचं दान तिच्या पदरात घालून रिकामा होतो. या चौघांमधल्या नात्याचे एकेक पदर उलगडत कादंबरी पुढे पुढे सरकते. पुढे तर सारजेच्या मृत्यूनंतर टवाळ मित्रांच्या नादी लागून कोंडी जेव्हा धोंडीवरच हल्ला करतो तेव्हा नकळत आपल्याही डोळ्यांतून अश्रू ओघळतात. पुढे गावातल्या जनावरांवर रोग पडतो. धोंडीचा बारदानाही त्यातून सुटत नाही. कसाबसा एक बैल वाचतो. पेरणीच्या आधी नांगरट

करण्यासाठी कोंडी साऱ्या गावाला त्याच्या शेतात इर्जिक घालायचं आमंत्रण देतो तेव्हा हा जिव्हारी बसलेला घाव या मानी हवालदाराला सहन होत नाही. अन् इर्जिक घालायच्या ठरल्या दिवशी शिल्लक राहिलेल्या एकाच बैलाला घेऊन धोंडी पहाटेच शेताकडे निघून जातो. सरू त्याला शोधत शोधत शेतावर येते, तो तिला दिसतं –

*‘शिळवाटीत डोकं अडकवून एका बाजूला चालला होता म्हातारा बैल गर्जन, अन् दुसऱ्या बाजूला तुंगीगडाचा हवालदार धोंडीबा ढमाले, ज्याच्या शब्दाला हिऱ्यामोत्याचं मोल होतं, – अजूनही आहे.’*

*रुमण्याला कासरा बांधून त्याचं टोक गुंतवलं होतं गर्जनच्या मानेजवळ, अन् दुसरं धोंडीनं आपल्या कमरेला बांधलं होतं! कसा तरी भेलकांडत, उखरवाखर करीत नांगर त्या जोडीमागे धावत होता.*


*प्रत्येक पाऊल टाकताना धोंडीला जिवाची शर्थ करावी लागत होती. रक्त सगळं तोंडात उतरलं होतं. डोळे विटकरीसारखे तांबडे झाले होते. चेहऱ्याची नस न् नस फुलून गेली होती. मानेच्या शिरा ताठरल्या होत्या. सगळ्या*

*अंगावरून टपाटपा थेंब खाली धावत होते. त्यात प्रतिक्षणी झोकांड्या खाणाऱ्या नांगराचे झटके; पण त्याच्या चालीत खंड पडत नव्हता. नांगर पुढे सरला. ढेकळांच्या अंगानं धोंडीला चालावं लागत होतं. धडपडत, ठेचा खात, गुडघ्यापर्यंत पाय रक्ताळलेले होते. पण तो प्राणपणाला लावून नांगर ओढीत होता.*

*अचानक धोंडी थांबला. जणू त्याचं संबंध शरीर घुसळून निघालं, तो कसाबसा ओरडला, 'सरुताय! माय माजी -' अन् त्याला भडाभडा रक्ताची ओकारी झाली! शिळवाटीत डोकं अडकलेल्या स्थितीतच तो खाली कोसळला.*

काही वर्षांपूर्वी कादंबरी जेव्हा पहिल्यांदा वाचली तेव्हा या कादंबरीवर सिनेमा निघाल्याचं माहीत नव्हतं. त्यामुळं समजा या कादंबरीवर सिनेमा काढायचंच ठरलं असतं तर या चार भूमिका कुणी कुणी केल्या असत्या हे मी मनाशी नक्की केलं होतं. पुढं जेव्हा कळलं की लता मंगेशकरांनी यावर सिनेमा काढला होता तेव्हा मी उत्सुकतेने या चार भूमिका केलेल्या कलाकारांची नावं विचारली. माझा अंदाज तंतोतंत खरा ठरला होता.

धोंडीची भूमिका केली होती चंद्रकांत मांडरेंनी, त्यांच्या बायकोची; सारजेची सुमती गुप्ते यांनी, कोंडीची भूमिका अर्थातच सूर्यकांत मांडरेंनी आणि त्यांच्या बायकोची सरूची भूमिका केली होती जयश्री गडकरांनी. या चौघांशिवाय दुसरं कोण त्या भूमिका जगू शकलं असतं? आमच्या पिढीला काही हा चित्रपट पहायला मिळाला नाही. आजसुद्धा त्याची प्रिंट कुठे आहे कोण जाणे? पण माझ्या मनात नेहमी हा विचार येतो की, आप्पांनी जेव्हा हा चित्रपट पाहिला असेल तेव्हा त्यांना काय वाटलं असेल? समर्थांना वाटलं असेल तसंच अप्पांना वाटलं असेल का? 'स्वप्नी जे देखिले रात्री, ते तैसेचि होतसे, कळेना काय रे होते, आनंदवनभुवनी.' आप्पांच्या मनातील धोंडी चंद्रकांत मांडऱ्यांनी जसाच्या तसा उभा केला होता. आप्पांच्या तीन कादंबऱ्यांवर चित्रपट निघालेले मला माहीत आहेत. पहिली 'पवनाकाठचा धोंडी', दुसरी 'जैत रे जैत' आणि तिसरी 'देवकीनंदन गोपाला.'



# जैत रे जैत

नुकती एकटीदुकटी पाखरं बोलू लागली होती. सगळ्या रानावर धुईचं एक हलकं आवरण अंथरलं होतं. उंच झाडांचे शेंडे त्या धुईमधून वर डोकावत होते. असं जणू देवाच्या पायगती धुवट वस्त्र अंथरलं होतं. त्यावर वेळूच्या उंचावलेल्या तुऱ्याचं दर्भासन. त्यावर मांडी घालून महादेव बसला होता. कधी काळीचा. त्याचं ध्यान चाललं होतं. उन्हाळे आले, पावसाळे गेले. झाडांची पाने थरथरवीत नाचत मुरडत थंडी आली. लाजरीसारखी हळूच कोमावून नाहीशी झाली. किती चांदण्यानं नहालेल्या राती. किती गडद काळोख्या अमोशा. किती दरदरती उन्हं. असं काय काय नि काय काय झालं. महादेवानं आपलं ध्यान मोडलं नाही. कधी क्वचित् तो ढवळ्या बैलावर बसून रहाळ हिंडायला निघायचा. तेवढं सोडलं तर त्याचं आसन भंगलं नाही.

डोंगुऱ्या महादेव, त्याचं डोंगुरवाणं रूप. भलं प्रचंड. त्याच्यावर उगवतीकडलं तांबडं पडलं होतं. ते काळंसावळं रूप उजळू लागलं होतं. तळातली वाट अजून अंधारलेली

*होती. अन् त्या वाटेवरून दोघं धावत होती. नाग्या अन् चिंधी.*

मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल ओलांडून उजव्या हातास वळलो की थोडे अंतर गेल्यावर डाव्या हातास एक महादेवाच्या पिंडीसारखा डोंगर दिसतो. ऐसपैस पसरलेल्या भोवतीच्या जागेत मध्यभागी शाळुंकेसारखा एक भला उंच सुळका, चहूबाजूंनी बेलाग. आसपास किर्र झाडी. सध्या त्या भागात शासनाचं पक्षी अभयारण्य आहे. आजूबाजूच्या इतर डोंगरापेक्षा वेगळा 'अंगठा उंचावून उभा असलेला हा डोंगर म्हणजे किल्ले कर्नाळा.' कुणाचंही चटकन् लक्ष वेधून घेईल अशी ही जागा आहे. शिवकालात एक किल्ला म्हणून याचं महत्त्व तर होतंच, पण त्यानंतरही आपल्या आगळ्या वेगळ्या रूपानं यानं स्वत:चं अस्तित्व सतत जागतं ठेवलं. बाजूच्या जंगलात चहूकडे पसरलेल्या ठाकरवाड्या. पुढं सरसगड, गणपतीचं गाव पाली असा सगळा निसर्गरम्य प्रदेश. बहुधा याच ओढीनं आप्पा कर्नाळ्यास जाऊन पोहोचले असावेत आणि आप्पांनी 'जैत रे जैत'च्या प्रस्तावनेत लिहून ठेवलंय.

*'शपथपूर्वक सांगतो की, कर्नाळ्यावरचा दीडशे फूट उंचीचा*

*उभा टेंबा मी पाहिला आणि थक्कित होऊन उभा राहिलो. अवघ्या सह्याद्रीमंडळात या जातीचा कडा नाही. मग दिसली त्या कड्याभोवती चहूबाजूंनी लोंबलेली भली प्रचंड पोळी-आग्यामाशांची. त्या पोळ्यांचा मध कुणी काढू शकेल, यावर माझा विश्वास बसेना. पण मग बसला. ठाकरवाडीत ठाकरांशी गप्पा मारीत असता त्यांनी जे सांगितले, ते ऐकून आपण तर बुवा तोंडात बोट घातले! मस्तकात वारे भिरभिरू लागले. चार-सहा वर्षांत कर्नाळ्यावर चारपाचदा जाऊन आलो. अनेकदा तिथे रात्रीचा मुक्काम केला. खाली तळात वाघरू डुरकत होते. आगटीजवळ मी अन् नाग्या ठाकर शेकत होतो. शेकता शेकता नाग्याला गोष्ट सांगू लागलो. नाग्या असा काही हरिखला! ती तर त्याच्या घरचीच गोष्ट होती.*

आप्पांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, आप्पांचा सर्वसमावेशक जनसंपर्क, सर्व प्रकारच्या बोलल्या जाणाऱ्या ठिकठिकाणच्या बोली भाषांवर असलेलं आप्पांचं प्रेम. या बोलीभाषांचा आप्पांनी आपल्या साहित्यात केलेला सुयोग्य वापर, या सर्व मिश्रणातून साकारलेली आप्पांची ही कादंबरी 'जैत रे जैत.'

कर्नाळा किल्ल्याचा वरचा सरळसोट उभा ताशीव कडा


म्हणजे लिंगोबाचा डोंगर. तो अवघ्या राहाळाचा देव. त्याच्या आसऱ्यानं त्याच्या पाठी-पोटाशी इथं तिथं ठाकरवाड्या नांदत असलेल्या त्यातल्याच एका ठाकरवाडीच्या भगताचा मुलगा नाग्या अन् दुसऱ्या ठाकरवाडीतल्या लखमा ठाकराची मुलगी चिंधी यांच्या प्रेमाची अन् त्या दोघांनी मिळून लिंगोबाच्या गळ्यातील आग्यामाश्यांच्या मोहोळात राहाणाऱ्या राणीमाशीशी उगवलेल्या सूडाची ही कथा. नाग्याचा बाप एका ठाकरवाडीचा भगत. भगतगिरीबरोबरच सुतारकाम करण्याचं त्याला वेड. त्याचा पोरगा नाग्या. लहानपणापासूनच बानं कोरून तयार केलेल्या ढोलावर त्याचा जीव. नाग्याचा हात ढोलाला लागताक्षणी ढोल जणू आपसूकच दोन्ही हातांनी बोलू लागायचा. त्याच्या या वाजविण्यावर हरखून आसपासच्या ठाकरवाडीतील ठाकरं रातरातभर नाचायची. असंच त्याला एकदा ढोल वाजवताना पाहून त्याच्या प्रेमात पडलेली चिंधी. तिच्या प्रेमापेक्षा पुन्येवंत बाम्हून व्हायचं नाग्याच्या डोक्यात शिरलेलं वेड. पुढे थोरल्या भगताला नाग चावून मरण आल्यानंतर उदासवाणा झालेला नाग्या असाच एकदा फोटो गोळा करायला रानात गेला असता, एक हिरडीचं झाड तोडत असता, त्याच्या

फांदीवर बसलेलं आग्या माशीचं मोहोळ उठतं. नाग्याचं उघडं अंग पार फोडून काढतं. त्या माशा नाग्याचा एक डोळाच फोडून टाकतात. त्याच्या मागावर असलेली चिंधी नाग्याच्या या आजाराचं निमित्त करून त्याच्या घरात शिरते. पुढं दोघांचं लगीन झाल्यावर तिच्या मदतीनं तो त्याच्यावर विनाकारण हल्ला करणाऱ्या माशांना धडा शिकवायचं ठरवतो. तीही त्याच्या या जगावेगळ्या उद्योगात त्याला मनापासून दाद देते आणि एका रात्री लिंगोबाच्या डोंगरावर चढून, वर जाऊन, वरून खाली दोर सोडून नाग्या त्या दोरावरून खाली उतरून लिंगोबाच्या गळयात असलेली आग्यामाशांच्या पोळयांची माळच्या माळच कोयतीच्या घावांनी तोडून टाकतो. चिडलेल्या माशा खालच्या बाजूस दोर धरून उभ्या असलेल्या चिंधीला अक्षरशः फोडून काढतात. पोटातला नाग्याचा गर्भ सांभाळीत, नाग्या दोरावरून खाली उतरेपर्यंत ती तिथेच उभी राहाते. त्याचा सूड पुरा होतो, तोंडावरून रक्ताचे ओघळ वाहात असलेली चिंधी तिची शुद्ध हारपण्यापूर्वी नाग्याला म्हणते,

*‘अरे माज्या नाग्या! तुझा जैत झाला! तू जिंकलास.’*

अशी ही आगळीवेगळी प्रेमकहाणी ‘जैत रे जैत’.

ठाकरवाडीतील ठाकरांच्या घरापासून पोरांपर्यंत सगळ्या गोष्टीचं, सगळ्या चालीरितींचं, भांडणाचं, प्रेमाचं, नाचाचं बैजवार वर्णन करणारी ही कादंबरी. ठाकरांच्या बोलीभाषेचा आप्पांनी केलेला अभ्यासपूर्ण उपयोग आपल्याला आप्पांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा आणि अचूक स्मरणशक्तीचा प्रत्यय पानोपानी दाखवितो. आप्पांच्या अनुभवसमृद्ध साहित्यविश्वाचं एक वेगळंच दर्शन ही कादंबरी आपल्याला घडवते.



# गडदेचा बहिरी

*चतुर्दशीसच बुवा उढेवाडीस येऊन पोहोचले. माघाचा महिना. थंडी उलटून चालली होती. संध्याकाळी येरवाळीच जेवणं उरकून आठ, साडेआठच्या सुमाराला घोंगड्या अन् उशा सवें घेऊन अन्त्या, खंडबा, मुकुंदा, प्रभाकर नाईक असे साताठजण बुवांसवें बालेकिल्ल्यांमधील देवळाकडे चालले. तंवर चंद्रमा उगवून चांगला वर आला होता. अजून तो श्रीवर्धनाचा उभार चढून वर पोहोचला नव्हता. वाट पायाखालची होती. तिथं सगळ्यांनी देवळासमोरच्या अंगणात शेकोटी करून तिच्या भोंताली झोपायचं, असं ठरलं होतं.*

*रावळाशी पोचेतंवर चंद्रमा श्रीवर्धनाच्या माथ्याशी टेकला. दूरवर खंडाळ्याचे विजेचे दिवे चकाकत होते. खाली ते विजेचे दिवे, अन् आकाशात देवाघरच्या दिवल्या. थेट खंड्याळ्यापासून तो राजमाचीपर्यंत प्रचंड दरी पसरली होती. रावळाच्या समोर आणि पैल राई दाटून आली होती. रातकिडे आपापला सूर धरून वाद्यं परजीत होते. पाहता पाहता चंद्रमा श्रीवर्धनाचा माथा चढून वर पोचला. त्याचं चांदिणं तळ्यातल्या*

*झाडांच्या फांदोऱ्यातून खालती भुई कुठं, ते शोधू लागलं. नाना परींचे वनस्पतींचे गंध दरवळत होते. त्यांनी वातावरण धुंद झालं होतं.*

*अन्त्या अन् मुकुंदा राईतून तीन चार मोठमोठी टोणकं घेऊन आले. खंडबानं चकमक झाडून पालापाचोळा रावळासमोर पेटवला. त्या आगीत टोणकं ठेवून देऊन धुनी तयार केली. तिच्या भंवताली घोंगड्या अंथरल्या. सगळे शेकोटीभंवताली मांड्या घालून बसले. आता बोलले बुवा,*

*अहो मुकुंदराव! फारच चांगली जागा आहे हो! बरं झालं, की तुम्ही हे सुचवलं, आम्ही कुठंतरी ढेकूण पिसवा मारीत रात्र काढली असती.*

*'बुवा! किती रात्री आम्ही इथं काढल्या आहेत!'*

*'अहो! राजे राजमाचीला आले, असा उल्लेख आहे ना इतिहासात?'*

*'तर! कदाचित या समोरच्या दगडी घोड्यांना अन् दीपमाळांना घोड्यांचे कासरे अडकवून, त्या पुरुषानं, आपण झोपतो आहोत तिथं एखादी रात्रही काढली असेल!'*

*'असेल बुवा! एखादी भूमी मंत्रभारित असते, तशी ही*

*जागा मला मंत्रभारित वाटते!'*

लोणावळ्यासमोरचा राजमाचीचा किल्ला, त्याच्या पायथ्याशी असलेलं गाव उढेवाढी. उढेवाडीतील खंडबा उंबऱ्याचं घर हे जणू अप्पांचंच घर. राजमाचीला जाणारी वाट, तिथला परिसर, खंडबा या सगळ्याचं एकत्रित मिश्रण घेऊन जन्माला आलेली कादंबरी 'माचीवरला बुधा'. त्याच परिसरात असंच एक वेड लावणारं, निसर्गाची भुली घालणारं, थोडं जिवावरचं धाडस करायला लावणारं ठिकाण आहे. ढाक! किल्ले ढाक, तिथल्या एका कड्यावरच्या गुहेत एक बहिरोबाचं ठाणं आहे. म्हणून त्याला म्हणायचं 'गडदेचा बहिरी' किंवा ढाकचा बहिरी. या गडदेच्या बहिरीचा शहरी लोकजीवनाला परिचय करून देण्याचं श्रेय आप्पांनाच आहे. राजमाचीच्या ओढीनं अप्पा राजमाचीच्या वाऱ्या करू लागले तेव्हा तिथल्या रहिवाशांनी सांगितलेल्या माहितीवरून आप्पा बहुधा खंडबाबरोबर ढाकला जाऊन आले. आप्पा आणि आप्पांचा मित्र ही त्या गुहेत प्रवेशलेली पहिली नागर माणसं. गुहेत प्रवेशल्यावर खंडबाकडून आप्पांना तिथल्या भैरोबाची, तिथं टाक्यात असणाऱ्या भांड्यांची, तिथल्या पौर्णिमेच्या उत्सवाची नवसकऱ्यांनी येऊन फेडलेल्या नवसाची

अशी सगळी बैजवार माहिती मिळाली. एकच गोष्ट आप्पांना खटकली असावी, तिथं होणारी पशुहत्या. आवडत्या गोष्टीवर कादंबऱ्या लिहून समाजास जागृत करणारे आप्पा अशा नावडत्या गोष्टी सहन करणं शक्यच नव्हतं. याच पोटतिडीकीतून एक दीर्घकथावजा कादंबरी जन्माला आली, 'गडदेचा बहिरी'. उढेवाडीतल्या मारुतीच्या जन्माचं कीर्तन करायला आलेले भिकुजीबुवा कीर्तन झाल्यावर खंडबाला घेऊन ढाकला जातात. ती गुहा, तो देव, तिथली भांडी तिथंपर्यंत पोचण्यासाठी असलेली अवघड वाट हे सारं पाहिल्यावर तिथं नवस फेडण्यासाठी म्हणून होणारी पशुहत्या न साहवून ती कायमची थांबवण्यासाठी कंबर कसून तयार झालेले भिकुजीबुवा उद्वेगाने तिथल्या गावकऱ्यांना म्हणतात,

*'अरे, तुमच्या बुद्धीला काय चळ लागला? राजानं, दुसऱ्या कुणीही नव्हे, प्रत्यक्ष शिवाजी राजानं देवासमोर खीरभोजन करण्यासाठी तुम्हाला जे तांब्याचं भांड दिलं, त्यात तुम्ही बरबट शिजवता? काशीहून आणलेली गंगा, तिनं भरलेला तांब्या घेऊन तुम्ही पहाटेस शौचाला जाता? पांडुरंगाचा प्रसाद म्हणून आणलेली फुलांची माळ तुम्ही गाढवाच्या गळ्यात*

घालता? ज्ञानोबाचं तीर्थ तुम्ही तोंड धुवायला वापरता? पारिजातकाची फुलं तुम्ही म्हशीच्या खाली अंथरता? गीता ग्रंथाचा उपयोग तुम्ही लेकराचं ढुंगण पुसायला करता? सत्यनारायणाचा प्रसाद तुम्ही कुत्र्याला खाऊ घालता? आणि मारे वर्णन करता, की बकरे गळ्यात अडकवून इथं वर आणतात म्हणून? अन् तेही कापायला तुम्हाला मुलाणी लागतो? इतकी तुमची अनावर मांस मांसकंड खायची हौस असेल, तर बाजारातून विकत आणा आणि खुशाल घरी शिजवून खा ना तें? देवाच्या नावावर कशासाठी? अशी तुमची बुद्धी तुम्ही वाण्याकडे गहाण टाकली? ढुंगणाला धड वस्त्र नाही, बायकोच्या लुगड्याला अठरा ठिगळं जोडलेली, अन् त्याहीवर देवापुढं बोकड कापता? त्या बोकडाची आई काय तुम्हाला आशिर्वाद देत असेल?

दुसऱ्या मुक्या जीवाला पिडा देताना तुमच्या जिवाला काही खंत वाटत नाही? अरे, मनी काही दया उपजू द्या! दया म्हणजे जीवाचे पालन! ते देवासमोर बकरी कापता, देवांना नवस करता, म्हणता, की देवा, माझं पोरगं आजारी पडलं, याला वाचू दे, तुला चार पायाचं वाहीन. देवाला काय

*दोन पायाचं कडू लागतं काय? त्या जगदीश्वराला लाच देऊ पाहता? तो काय साहेबाघरचा चपराशी आहे? की हे शेरभर वांगी घे, अन् साहेबाकडून माझं एवढं काम करून दे!*

*या शरीराचा उपयोग दुसऱ्या मुक्या जीवाचा प्राण घेण्यासाठी करता? त्याचं मांस मोठ्या हौसेनं खाता? पुढल्या जन्मात हे भोगावं लागेल! त्याच्या गळ्यावर तुमची सुरी चराचरा चालते, अन् त्याच सुरीखाली तुमचं बोट सापडलं तर?*

*बरं, देवाला बकरं कबूल केलं, तर तुमचं पोरगं बरं झाल्यावर ते देवाच्या नावानं सोडून द्यावं. देव कच्चं खावो, का शिजवून खावो! पण मग तुमच्या मसाल्याच्या पुड्या वाया जातील ना? असे लबाड आहां तुम्ही लोक! नाव देवाचं अन् पोट भरणं तुमचं!*

असं नाना परीचं बोलून भिकूजीबुवा आसपासच्या गावामधून कीर्तनं करीत फिरतात. सगळ्या गावामधून पशुहत्येविरुद्ध वातावरण निर्माण करतात. त्याच्यामुळे चवताळलेला देवऋषी कुसूरच्या मारुतीच्या देवळात बुवांचं कीर्तन सुरू असतं. तिथं येऊन पोहोचतो,

*देवरुशानं डुईवर जटा वाढवल्या होत्या. त्याचे डोळे*

गांजा पिऊन तांबडेलाल झाले होते. बुवा मंदिरात पोहोचले हे पाहताच त्यानं दोन्ही भुजा आकाशांत फेकल्या अन् तो तिथल्या तिथं गुडघे टेकून घुमू लागला. तो तिथल्या तिथं खुंदळत होता. तोंडावाटे निरनिराळे आवाज तो काढीत होता. मधूनच तो एखादी किंकाळी फोडीत होता. ती दरदरून फोडलेली किंकाळी थेट मंदिरापर्यंत पोचत होती. बुवा ती आइकून म्हणत होते,

'अरे, आम्ही वीर विठ्ठलाचे गाढे, कळिकाळ पायां पडे!'

हे आइकून देवरुशी म्हणाला,

'अरे, आज आमोशा न्हाई रे! आमोशा आसती का? म्हंजे तुला इंगा दावला असता!'

बुवा म्हणाले,

'अरे, हरिचिया दासा । शुभ काळ दाही दिशा ।।'


'अमावस्या काय आणि पौर्णिमा काय! येत्या अमावस्येला इथंच कीर्तन करतो. बघतो तुझं देवरुशीपण काय करतं त्या दिवशी ते!'

देवरुशी किंचाळला,

'तुझी हागती बंद करतो! बोलती बंद करतो.'

अशा रितीनं देवरुशी अमावस्येला कुसूरला येऊन कीर्तन करायचं बुवांना आव्हान देतो. त्या आव्हानाला भीक न घालता बुवा अमावास्येला येऊन कीर्तन करून त्या देवरुशाचा सगळ्यासमक्ष पराभव करतात. त्यापुढे जाऊन त्या गडदेच्या बहिरीला कालअष्टमीला महाराष्ट्रातील सगळ्या नद्यांचं पाणी आणून अभिषेक करतात. अशी सगळी अंधश्रद्धांवर प्रहार करणारी कादंबरी. आप्पांच्या ज्ञानेश्वरीच्या, तुकारामगाथेच्या अभ्यासाचा प्रत्यय आणि गाडगेबाबांच्या सहवासात राहिल्याने अंधश्रद्धांवर कडाडून प्रहार करण्याचा निश्चय इथे पानोपानी दिसून येतो आणि भिकूजीबुवांच्या तोंडून प्रकट होतो. शेवटी एकदाची त्या बहिरोबा समोरची पशुहत्या बंद करण्यात बुवांना यश मिळतं.

माझ्या मनात एक शंका आहे, भिकूजीबुवांचं रूप घेऊन आप्पांनीच हे सगळं प्रत्यक्षात घडवलं तर नसेल?



# त्या तिथें रुखातळी

*वरंध घाटाच्या ऐन माथ्यावर मान्यांचं शिरगाव. त्याच्या खालल्लाकडं साडेचार कोसांवर भिवगड. सह्याद्रीच्या ऐन माथ्यावर. त्याच्या ऐलीकडून एक अनगड वाट कोकणात उतरते. नावाजलेली, नामांकित नव्हे. थोडकी अडचणीचीच. तशीच निकड असली तर, तरच कुणी धनगर किंवा कोकण्या मावळा त्या वाटेनं चढा-उतरायचा. एरवी ती वहिवाटीतली नव्हे.*

*म्हणजे असं की, वाटेच्या ऐन मधात सुमारे पंचवीस हात उंचीचा एक दिक्क कडा. खाली तळवटी दहा-वीस पायठण्या कोरलेल्या. तिथून कड्याचा उभार सुरू व्हायचा. तिथं एक भला जाड खांब, जेमतेम तासलेला, कड्याच्या पोटाशी उभा करून ठेवलेला. त्यावरही इथं तिथं जेमतेम पाऊल टेकण्यापुरत्या खोबणी. दो बाजूंना कड्याचा आधार घेत या खोबणी येंगाव्यात. तेव्हा कुठं कड्याच्या माथ्यावर पाऊल टेकता यायचं. अशी ही अडचण असल्यानं सड्या माणसावेगळं कधी गुरंढोरं त्या वाटेनं चढाउतरायचं नाही. हां, एका धनगरानं मात्र त्या*

अवघड पावटीनं आपलं रेडकू खांद्यावर घेऊन वर चढवलं होतं.

हे वरचं आडवट येंगून माथ्यावर पोचावं, तर लागे एक लवण. उजवीकडे धिप्पाड भिवगड. कुणा जानू भिंताड्यावाणी. चहू अंगांनी ताशीव कडा. कुठं पाखरू क्षण बसू म्हणेल त्यास जागा नाही. तळात घनदाट झाडी, डाव्या हातास लवण. त्याच्या खोलवणातून मावळतीकडे वाहत असलेला वाहाळ. बारमास वाहता. एक्या ठिकाणी कंबरभर पाण्याचा डोह. दोन्ही बाजवा झाडीनं गच्च झाकलेल्या. झाडोरा असा जहांबाज, की एवढा नारायण वर कळाकळा तापायचा, गरम गरम उन्हं सृष्टीवर शिंपीत असायचा, पण फद्याएवढं उन्हं काही तळीच्या पाचोळ्यापर्यंत उतरायचं नाही. मोठमोठे थोरथोर रुख. त्यांच्या खांद्यावरून भले जाड, मनगटासारखे कोंभाळ्याचे वेल तळापर्यंत लोंबत असायचे. हे सगळं रान सरकारी, म्हणून टिकलेलं.

लवणाच्या उजवीकडे एक टेंबा. दहा-वीस हात लांब-रुंद त्याचा माथा. त्या तेवढ्या राहाळात हे एवढंच पठार. त्या सपाटीच्या उगवतीला भला उंच, डेरेदार आंबा, बहुत वरुसांचा.

तीनशे-चारशे पाऊस तरी त्यानं झेलले असावेत. कदाचित् त्याहूनही पाच पन्नास अधिक आगळे. जणू तो त्या भंवतालीच्या झाडोऱ्याचा पेशवाच आहे. खोडाला भली सपाटी ढोल. एक माणूस सहज आत उतरू शकेल, असं तिचं तोंड. आत दोन-तीन पोती धान्य मावेल, इतकी पोकळी. ढोलीच्या वरच्या अंगास एक भलं थोर टेंबूक, तिथून वर फांद्या फुटलेल्या. चांगल्या साताठ. तळातल्या फांद्या पुढं सरूनं खालते लवलेल्या. वरच्या गगनावेरी विस्तारलेल्या. पालवी घनदाट. रुखातळी नेहमीच गार सावली. कुणा येत्या-जात्याला क्षणभर टेकायचा मोह व्हावा अशी.

शिवकाली त्या पठारावर जबरं जूझ झालेलं. त्या राहाळातला एक घरंदाज मर्दाना लढता लढता तिथं कापला गेला होता. रुखातळी त्याच्या नावाचा भला थोर वीरगळ. उभट चौकोनी, माथ्यावर सुबक कळस. तळातल्या पट्टीवर जूझ कोरलेलं. मधल्या पट्टीत त्या लढावाला अप्सरा स्वर्गात नेताहेत, वरच्या पट्टीवर तो अन् त्याची सती गेलेली बाईल, अशी दोघं शिवलिंग पूजताहेत. कोरक्या जाणकार होता. त्यानं कोरकाम सुबकं केलेलं. वीरगळाशेजारी सतीचं चिन्ह. कोरक्यानं सतीचा

*कांकणभरला हातही नीटस कोरलेला. राहाळांतल्या अवघ्या गांवढ्यांचे ते कुलदैवत.*

एखाद्या निष्णात चित्रकारानं एखाद्या ठिकाणचं देखणं निसर्गचित्र त्या ठिकाणी जाऊन काढावं आणि ते पाहताना आपल्याला, आपण ते ठिकाण प्रत्यक्ष पाहतो आहोत असा भास व्हावा तद्वत वरचं आप्पांनी केलेलं आमरुखाचं आणि त्या परिसराचं वर्णन वाचताना आपल्या डोळ्यांसमोर ते सारं दृश्यस्वरूपात उभं राहावं अशा ताकतीनं लिहिलं आहे. ही सर्व कादंबरी अशाच वर्णनात्मक घटनांनी ठासून भरलेली. वर वर्णन केलेलं आंब्याचं झाड हेच या कादंबरीतलं महत्त्वाचं पात्र. किंबहुना हा आमरुखच या कादंबरीतला नायक. त्याच्या तळाशी, त्याच्या परिसरात जे जे घडलं, घडतं त्याचं सूक्ष्म वर्णन करणारी, त्या स्थानाविषयी आपुलकी निर्माण करणारी, आप्पांच्या निसर्गप्रेमाची आणि सूक्ष्म निरीक्षणशक्तीची पानोपानी साक्ष देणारी कादंबरी 'त्या तिथें रुखातळी'.

त्या आमरुखाखालच्या वीरगळाला कुलदैवत मानणारी आसपासची गावं, बुधवाडी, कुरंगवडी, तेंडोली, भानोशी, बामणोली. त्या भानोशी गावच्या जोशांचा मुलगा गणपती.

पुण्याला एका फॅक्टरीत कामाला असलेला. तिथं त्याची गाठ पडते भडभडे नामक किल्ले भटकण्याचं आणि इतिहासाचं वेड असणाऱ्या माणसाशी. गणपतीच्या पूर्वजांना शिवाजी राजांनी चार चाहूर जमीन इनाम दिलेली. ते पत्र त्यांनी नीट जपून ठेवलेलं. त्यावर खुद्द राजाचं हस्ताक्षर. ते पाहाण्याच्या उत्सुकतेपोटी आणि भिवगड पहायच्या इच्छेनं भडभडे गणपतीबरोबर भानोशीला येतो. किल्ला पहायला जाताना दोघे आंबरुखाशी येऊन थांबतात, भडभड्याचं त्या आमरुखावर प्रेमच जडतं. तो वारंवार त्या ठिकाणी येऊन जातो. कधी एकटा, कधी गोतावळा घेऊन, कधी दिवसा, कधी रात्री. तो एवढा थोरला आमरुख, त्याच्याभोवतीचा तो वेड लावणारा परिसर या साऱ्याचं आणि भडभडे, जोशी कुटुंबाचं जे काही मेतकूट जमतं की एकदा तर ते सारे तिथं एक पौर्णिमाच त्या झाडाखाली साजरी करतात. बरोबरच्या मित्रांना आणि जमा झालेल्या साऱ्यांना अशा ठिकाणाचं, वीरगळाचं, सतीचं आणि तिच्या पतीचं महत्त्व समजावून सांगताना तो म्हणतो,

*'प्रत्येक वायूचा झोत एकेक कथा सांगत असतो. प्रत्येक किल्ल्याच्या दरवाज्याचे चिरे एकेक पवाडा गात असतात.*

*प्रत्येक रणक्षेत्रावरची माती एकेक गीत आळवीत असते. जयाचं-पराजयाचं. ती आसुदानं चिंब चिंब झालेली असते. ते जेत्याचं असतं. जिताचंही. आसुदाला जात नसते जोशी! ते असतं केवळ तांबडं लाल आसूद. शस्त्रांनी झालेल्या जखमांतून ते धरतीवर घळघळलं की ती भिजून चिंब चिंब होते. मग ते तिथंच वाळतं. माती घट्ट होते. तिचा पोत चिकट होते. मग सुरू होतात पावसधारा. टपोरे थेंब भुईवर कोसळतात. आसपासचं रक्त घेऊन जातात. ते इवलाले प्रवाह ओढ्यात, तिथून नद्यांत, तिथून सागरात. मग त्याची वाफ होते. ढग बनतात. ते किनाऱ्यावर लोटतात. पाऊस कोसळू लागतो. पहिल्या पावसात भिजण्यासाठी पोरं बाहेर धावतात. म्हणतात, 'ये रे, ये रे पावसा! तुला देतो पैसा!' त्या न दिलेल्या, कधीच न दिलेल्या पैशाच्या बदली ती पोरं कशाखाली नाहतात ठावकी आहे? रक्ताचा अंश असलेल्या पावसधारांखाली! त्यात महाभारतीय वीराचं रक्त असेल, शकांचं असेल. हुणांचं असेल. मुगलांचं असेल. मराठे योद्ध्याचं असेल! तो मर्दाना खिंड लढवीत उभा होता. तोफांचे आवाज कानी पडेपर्यंत! त्या बाजीप्रभूचं रक्तही त्या कासारी नदीवाटे सागरजळात*

*मिसळलं असेल, त्याचे अवशेष यंदा तुमच्या अंगावर कोसळत असतील. असे आपण सगळेच त्या तीर्थामध्ये स्नान करीत असतो, जोशी! इच्छा असो वा नसो!*


पुढं एके दिवशी प्रचंड वादळ होतं. भली भली झाडं उन्मळून पडतात. भडभडे आमरुखाच्या काळजीनं मिळेल ते वाहन गाठून पुढं सारं जंगल चिखल तुडवीत भानोशीला येऊन पोहोचतो. त्याची भीती खरी ठरते. तीन-चारशे वर्षांपूर्वीचा तो आमरुख. एका विजेच्या तडाख्याने त्याचा पार कोळसा झालेला असतो. त्याच्या जागी शिल्लक असते आठ दहा पाट्या राख आणि कोळसा. वीरगळ आणि सतीमाय उघड्यावर पडलेली असतात. हे सारं पाहून पटकन् खाली बसलेला भडभडे काही एक निश्चय करून उठतो. पडत्या पावसात अलिबागपासून कुडाळ देवगडापर्यंत सारं कोकण धुंडाळून तीन-चार खोबऱ्या आंब्यांची कलमं तो घेऊन येतो. भानोशीला जाऊन गणपतीच्या वडलांच्या हातून त्याच आमरुखाच्या जागी ती कलमं लावतो, हात जोडून म्हणतो..

*‘वनदेवा, आता तुजवर पुनः सावली होईल. गेल्या पिढ्यांचा वारसा आम्हापर्यंत आला. तो ढळला होता. पुनः या रोपाच्या*

*रूपानं तो आम्ही तुझ्या हाती सोपवतो आहोत. ही सावली तू राख रे वीरदेवा!'*

अशी चटका लावणारी ही कादंबरी! किती वेळा मी वाचली असेल लक्षात ठेवलं नाही. उदासवाणं, कंटाळवाणं वाटायला लागलं की मी ही कादंबरी हातात घेतो. पुन्हा पुन्हा वाचतो. दरवेळेस एक नवी प्रेरणा, निसर्गाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी ही कादंबरी मला प्रदान करते. मलाच काय, आप्पांच्याबरोबर सावलीसारख्या असणाऱ्या त्यांच्या एका शिष्याने; नाव बहुधा कुलदीप देसाई असावं, ही कादंबरी वाचली आणि त्या परिसरात भटकून ते स्थळ, तो भिवगड शोधण्यासाठी अपार भटकंती केली. न राहून त्यांनी एकदा आप्पांना विचारलं, 'आप्पा तो भिवगड आहे तरी कुठं?' आप्पांनी उत्तर दिलं, 'माझ्या कल्पनेत.' त्यांच्याबरोबर एवढी वर्षे काढलेल्या माणसालाही भूल पडावी इतकं सविस्तर, तपशीलवार वर्णन अप्पांनी त्या भिवगडाचं, त्या रानाचं, त्या आमरुखाचं, त्या परिसराचं केलेलं आहे. आप्पांची इतर किल्ल्यांवरची पुस्तकं वाचली असल्यामुळे जाणवतं की, आप्पांनी ते वर्णन करताना ढाकचा भैरोबा (बहिरी) त्याला

जाणारी वाट, रायगडाचं रूप, राजमाचीच्या आसपासचं जंगल या सगळ्यांचं एकत्रीकरण या कादंबरीत केलेलं आहे. ज्याला ज्याला निसर्गाचं वेड आहे, ज्याचं ज्याचं किल्ल्यांवर प्रेम आहे, ज्याला ज्याला इतिहासाची आवड आहे त्या प्रत्येकानं वाचलीच पाहिजे अशी ही कादंबरी.'



# मृणमयी

*'या मातीशी नातं तरी कधी जडलं? आठवत नाही. कुणी म्हणेल, की अगे, माती तर जड, तू चैतन्यमयी. तुम्हा दोघीत ही जवळीक जुळली कशी?'*

*माती जड हे त्या कुणाला कळलं कुठं? चैतन्यानं रसरसलेल्या या धरित्रीचं मर्म त्याला कुणीच उकलून दाखवलं नाही का?*

*जळाची गाठ पडायला अवकाश, की काही नसतं. तिथं पोपटी हिरवे धुमारे डोकावतात. हिची कूस चिरीत जणू दोन्ही हात जोडूनच कोंब उगवतात. नव्हत्याचं होतं होऊन जातं! रोपं तरारतात. कळ्या डोळे मिचकावतात. फुलं हसू लागतात. मग एक्या दिवशी फळ प्रसवून या धरित्रीचं जीवन धन्य होतं.*

*मनीमानसी जडलेल्या भूमीचं सांगू तरी किती किती? नाजूकसाजूक केळीचे लुसलुशीत लोंबे. कठिण कवच भेदीत मस्तकं वर उचलणारी भाताची रोपे. हे तेजमाखलं आकाश मोठ्या कौतुकानं न्याहाळणारी लाजाळूची इवली पानं.*

*गाईच्या शेणानं सारवलेली नितळ अंगणं. देखणे ओटे.*

वडापिंपळाचे पार. तुळशीवृंदावनं. पोफळीभोवती मांडलेली रेखीव आळी. पाण्याचे सदा वाहते ओले ओले गच्च पाट अशी ही शतशतरूपमयी झाली आहे.

सहस्त्रशीर्ष आणि सहस्त्रापद असलेल्या 'त्या'चं हे क्रीडारूप आहे ना? म्हणून!

असं या धरित्रीविषयी अपार अपार!

शेवटी एक दिवस शरीर पडणारच आहे. इच्छा अशी की, प्राणांनी शरीर त्यागलं की ते कुण्या आंब्याफणशीच्या तळाशी सरळ पुरून टाकावं. याचा कण नि कण इच्या समृद्धीसाठी खर्च व्हावा. पुनश्च उठावं लागू नये. जन्मावं लागू नये.

जन्मकष्टांना मी भीत नाही. 'पावेल ते निवांता साहोनी जावे' हे आता घट्ट पाठ झालं आहे. पण पुनर्जन्माचे क्षणी या व्यापकातूंन लहानुलं रूप धरीत पुन: एकदेशी व्हावं लागेल आणि त्याचा मनस्वी कंटाळा आहे! नेहमीसाठी धरित्रीरूप लेवून असावं-गंधवती पृथ्वी!

हे आपलं वेडीचं स्वप्न आहे. हे अशक्य आहे, याची मला जाण आहे.

तात्यांची मी अतिशय ऋणी आहे. धरित्रीवर निरतिशय

*प्रेम करणं त्यांनी मला शिकवलं. त्यांनी जे अपार दिलं, ते या कृश शरिरी मावू शकत नाही. ओंजळ भरभरून काव्य दिलं. मज दुबळीला तुकोबा-ज्ञानोबांच्या हाती दिलं. विरागिनी मीरेच्या ओटीत घातलं. जनीच्या चंदनी वेदनांचा परिचय करून दिला. हे अवघं पदरी नसतं, तर कशाच्या आश्रयानं उभी राहू शकले असते? या दुर्बळ शरीरानिशी निगूढ काळोखाशी झुंज दिलीच असती कशी?*

*तात्यांनी नंतर काही टाचणं करून ठेवली होती. ते नियमानं रोजनिशी लिहीत. त्यांची शब्दकळा तर मजपाशी नाही. तरी जमेल तसं हे पुरं करायचा प्रयत्न करते आहे. एका अर्थानं हे पितृऋण फेडते आहे.*

*मृण्मयी हे नाव तात्यांनी योजलं होतं. ते मी बदललं नाही. करंगळीनं पाण्यावर काढलेलं हे रेखाचित्र आहे.*

आप्पांच्या अत्यंत आवडत्या कादंबरीची, 'मृण्मयी'ची ही आप्पांनी लिहिलेली प्रस्तावना. साऱ्या कादंबरीचं सार त्यात आहे. आप्पांचा अभ्यास निरीक्षण शक्ती, आप्पांची आध्यात्मिक बैठक, आप्पांची जीवनविषयक श्रद्धा या साऱ्या मंथनातून जन्माला आलेली अलौकिक साहित्याकृती 'मृण्मयी'.

कोकणावर, तिथल्या निसर्गावर जिवापाड प्रेम करणारा, चित्रकलेत उत्तम गती असणारा, बुद्धिमान मुलगा गणू कोकणात सर्वत्र पसरलेल्या दारिद्र्यात कसेबसे दिवस काढत असलेल्या भिकोबा खऱ्यांचा मुलगा. पुढे मामाकडे राहून शिक्षण पूर्ण झाल्यावर तिथल्याच एका शाळेत मास्तर म्हणून चिकटलेला. सरस्वती नावाच्या कोंड्यांचा मांडा करून संसार चालवणाऱ्या स्त्रीशी लग्न झालेलं. पदरी एक मुडदूस होऊन गेलेली, आजारलेली तान्ही मुलगी मनू. धर्मग्रंथाचा अभ्यास करीत, इतर साहित्यकृतींशी नातं जोडत शाळेतील नोकरीच्या निमित्ताने कोकणापासून दूर वऱ्हाडात जायची वेळ येते. मनाची घालमेल करून घेत, डोळ्यातलं पाणी पापण्याआड लोटत तात्या सरस्वती अन् मनूला घेऊन वऱ्हाडात येतात. त्या लहानग्या मनूला मोठी होत असताना पाहणं, तिला ज्ञानेश्वरीच्या, भगवद्गीतेच्या, मीरेच्या भजनांच्या नादी लावणं हाच एक छंद आणि तिला घेऊन केव्हातरी परत कोकणात जाऊन सारं कोकण तिला डोळे भरून पहायला लावण्याचं स्वप्न. याच एका स्वप्नाच्या पूर्ततेसाठी धगधगत्या दुपारच्या उन्हात केलेली पायपीट आणि त्या पायात ओढवून घेतलेला मृत्यू. त्या

तात्यांच्या अकाली मृत्यूने मनूला लहानपणीच आलेलं मोठेपणं, ते सांभाळता सांभाळता आणि मायलेकींच्या चरितार्थाचा गाडा हाकता हाकता बदललेला तिचा जीवनविषयक दृष्टिकोन.

पुढे आयुष्यात आलेली एक जीवाभावाची मैत्रिण दुर्गा, तिचे यजमान. या दोघांमुळे जीवनाला मिळालेलं एक निराळं वळण, थोडसं आध्यात्मिक अंगांनी विचार करायला लावणारं आणि त्याच धुमाकुळात आलेलं जन्मभूमी कोकणचं निमंत्रण. त्या मायभूमीच्या हाकेसरशी पुढच्या कुठल्याही संकटांना तोंड द्यायचं ठरवून केवळ कोकणात जायला मिळणार या ओढीपोटी स्वीकारलेलं स्थळ. अर्धांग झालेला सासरा, अतिशय खाष्ट, आगजाळ गावभवानी सासू, आचरट आणि बाहेरख्याली नवरा या कशाचीही पर्वा न करता कोकणच्या मातीची सेवा करायला मिळणार म्हणून हे लग्नाचं दिव्य करायला तयार झालेली मनू.

लग्न होऊन सासरी आल्यावर सारे मान-अपमान, हाल-अपेष्टा, मारहाण निमूटपणे सोसत घरामागच्या नारळी, पोफळी, केळींच्या बागेत राब राब राबणारी मनू. नवऱ्याच्या अकाली मृत्यूचा तडाखा सोसूनही न डगमगता उभी राहिलेली मनू आणि हे सारं सोशिकपण तिच्यात निर्माण करण्यासाठी उपयोगी

पडलेले ज्ञानेश्वर, तुकाराम, मीरा, जनाबाईंचे अभंग, प्रत्यक्ष भेटीत गाडगेबाबांनी केलेला उपदेश.

*देवाच्या होऊन जा! त्याले काही मागू नका. तो काही देत नाही. त्याच्यापुढं हात पसरून आपणही लहान होऊ नका, त्यालेही लहान करू नका! देवाची होऊन जान्यांत मोठं सुख आहे बेटी!*

असं सारं जीवनविषयक तत्त्वज्ञान आप्पांच्या लेखणीतून प्रकट होत राहतं. परमेश्वराच्या अस्तित्वाविषयी, त्याच्या रूपाविषयी, त्याच्या लीलांविषयी, त्याच्या होणाऱ्या नानाविध स्वरूपातल्या साक्षात्कारांविषयी आप्पा इतक्या समर्थपणे लिहितात की, क्षणभर वाटून जातं की मृण्मयीचं, मनूचं रूप स्वीकारून आप्पा स्वतःच्या आयुष्यातील साक्षात्काराविषयी तर लिहीत नसतील? जी ममता, जे मार्दव, जो कनवाळूपणा, जी आर्त, जी ओढ, जो विरह ज्ञानेश्वरांनी विरहिणीच्या रूपाने लिहिला आणि ते ज्ञानेश्वरमाउली झाले, त्याविषयी आप्पांनी लिहिलं आहे,

*कसं होतं ज्ञानोबांचं! आईचं छत्र बालपणी हारपलं, पण त्यांनी गुरुदेवांच्या कृपादृष्टीलाच आपली आई मानलं. वाक्पुष्पांनी गुरुदेवांची अशी पूजा केली, की त्यांना अगदी भरभरून*

*आलं असेल. त्यांची ती दृष्टी अकलंक, शुद्ध. आईच्या दुधासारखी उदार म्हणून चहू देशी तिची प्रसिद्धी. ती आनंदाचा अविरत वर्षाव करणारी. तिच्या प्रसादरसाच्या कल्लोळांमध्ये डुंबत असावं. मग ताप पोळीत नाही. शोक जाळीत नाही. या स्नेहाळेच्या लेकरांना अवघी योग सुखं भोगता येतात.*

*ज्ञानोबांनी या गुरुकृपादृष्टीचं जे वर्णन केलं ते त्यांनी कुठं बरं अनुभवलं असेल?*


*कसं असेल त्यांचं झोपडं? आत बसल्या बसल्याच कुठूनही दिशा न्याहळता याव्यात असं. अवघ्या आळंदीनं या मायलेकरांवर खैऱ्याच्या निखाऱ्यांचा वर्षाव करावा. तो आईबापसांनी आपल्या कृश पाठीवर झेलावा. उरीपोटी लपवलेल्या या देवाघरच्या फुलांना त्याची इवलीही धग लागू देऊ नये.*

*ज्ञानोबांची काव्यस्फुर्ति स्वत: ही अवघी रूपं ल्याली. ती आपणच जगाची आई झाली. एरवी बावीसाव्या वर्षी समाधि घेणाऱ्या या तरुणाला श्रद्धावंतांनी आई कसं म्हटलं असतं?*

ज्ञानेश्वरमाउलींच्या विरहिणींचा आदर्श समोर ठेऊन तेच मातृरूप स्वीकारून त्या भूमिकेतून आप्पांनी मनू, ‘मृण्मयी’

साकारलेली आहे.

आईला आपली सर्वच लेकरं प्राणापेक्षा जास्त प्रिय असतात. पण त्यातलं एखादं थोडं जास्तच प्रिय असतं. तसंच आप्पांचं होतं. त्यांना त्यांच्या सर्वच कादंबऱ्या अतिशय आवडत. पण या मनूवर, मृण्मयीवर आप्पांचं जरा जास्तच प्रेम होतं. आप्पा गेल्यावर जे लेख प्रसिद्ध झाले त्यातल्या एका लेखात कुणीतरी लिहिलं होतं, आप्पांचं जीवनातल्या आनंदाइतकंच दु:खावरही, किंबहुना अश्रुंवरही प्रेम होतं. खरं आहे ते. अश्रुंवर प्रेम तोच माणूस करू शकतो ज्याला अश्रुचं मोल कळलेलं असतं. ज्याची नाळ समाजाच्या वेदनेशी जोडलेली असते, त्याच्या अंत:करणातील माणूस सदैव जागा असतो, त्याची परमेश्वरावर नितांत श्रद्धा असते. हे सारं अप्पांच्या व्यक्तिमत्त्वात ओतप्रोत भरलेलं होतं म्हणूनच ते एक हळव्या मनाचे, संवेदनशील साहित्यिक होते. कादंबऱ्यांचा ढीग रचत, समाजाच्या वैगुण्यांवर बोट ठेवीत पुरस्कार लाटणारे तथाकथित विचारवंत नव्हते. तो एक मातृहृदयी, संस्कारक्षम, समृद्ध, अनुभवसंपन्न दार्शनिक होता.



# पडघवली

*'खूप पिके त्या काळी. नि मग गावात कुठं चार दहा पानांचं निमित्य निघालं, की दहा पानांच्या ठिकाणी पंचवीस पान अगदी सहज होई आणि जरा मोठं कार्य असलं तर मग काय, घरोघरी चुलीला निमंत्रण. ज्याची त्याची कुळं असायचीच, शिवाय आला गेला.*

*गावात आमचं घर मुख्य. म्हणून कुणी गावचा पाहुणा आला की तो आमच्याकडे. फौजदारकी खालच्या घरी होती. तरीसुद्धा हवालदार बिवालदार यायचे ते आमच्याकडे येऊन चहा पिऊन जायचे. एरवीही गावात कुणाच्याही घरी पाहुणा आला तर तो एकदा आमच्या घरी आल्याशिवाय जायचा नाही. अगदी कुळवाड्यात जरी कुणी आलं, तरी त्यानं खोताच्या घरी तंबाखू ओढायला आलेच पाहिजे. आमच्या घरी कुणी तंबाखू ओढायचं नाही. तरी आल्यागेल्याला पावशेर तंबाखू लागायची महिन्याला.*

*असा सगळ्या गावाचा मेळ होता. त्यामुळं कुणाच्याही घरी कार्य असलं, तरी सगळी धावायची. निरोप जायचे.*

''दत्तूला म्हणावं, तुझ्या मांडवावर पडवळं झाल्यैत मोठाली. माझ्याकडे ब्राह्मण जेवायचेत रे! काढून धाड तेवढी.'' अच्या, जा पळ मेल्या, लंगडतोय्स, तर मी काय करू? हळूहळू जा. जिऊआतेला सांग. उद्या श्राद्ध आहे म्हणावं आमच्या घरी. तुमच्या घरापुरतं दूध ठेवून बाकीचं हिकडे धाडायला सांगितलाय म्हणावं आईनं.'

'बन्ये, जा शेजारी नि सांग, शुक्रवारची सवाशीण सांगितल्यै म्हणावं अंबावहिनीला तुझ्या. नि हे बघ, भाजी पाठवा म्हणावं काही असली तर.'

काल्या, खोताकरे पल, जिऊआतेला सांग, सत्यनारायेनाची पूजा करायची हाय, तवा म्हणावं, गाईचा तूप मांगलांय माझ्या बाबानं.

नि मग त्या वस्तू त्या त्या घरी पोचायच्या. नुसत्या नव्हे, त्यांच्याबरोबर कधीकधी निरोपही यायचे.

''रांडेच्याला म्हणावं, तुझ्या ढुंगणाला नाही लंगोटी, नि पाहुण्याला पितांबर कशाला नेसवताहेस? असेल तेवढ्यात करावं! बरं ने पडवळं. नि ऐकलंस का नाऱ्या, हिरव्या मिरच्याही ने. नाहीतर आयत्या वेळेला तुला पाकटवायचा.''

*अन् हे निरोप कुणी मनावरही घ्यायचा नाही. फाडफाड बोलून मोकळे व्हायचे. मनात कुणाच्या राहायचं नाही. कुठं कुसणारी घाण थांबायची नाही. म्हणून निर्मळ वाहत्या नदीसारखं होतं एकंदर सगळं गांव.''*

आप्पांचं मूळ गाव कोकणातील असल्यानं कोकणाविषयी, तिथल्या माणसांविषयी, तिथल्या निसर्गाविषयी आणि तिथल्या चालीरीतींविषयी त्यांना एक वेगळीच आपुलकी, एक वेगळीच जवळीक वाटायची. त्यामुळे आप्पांच्या बऱ्याच कादंबऱ्या या कोकणच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या आहेत. 'मृण्मयी' मधल्या एका प्रसंगात कोकणाचं वर्णन करताना आप्पांनी गाडगेबाबांच्या तोंडी एक सुरेख संवाद घातला आहे. बाबा म्हणतात,

*'कसा साजरा देश आहे कोकन! भीक मागत अवघा हिंदुस्तान भटकलो, पण कोकनासारखा देश नाई पाहिला कोठीसा! कशे माड ! कसे सुपारीचे बाग! कश्या आमराया! फनस, काजू, कोकमी. असं वाटते, का देवाची बाग आहे कोकन. पुन्हा क्षणभर थांबून बाबा उसळून बोलू लागले.*

*''पण इतला सुंदर देश केला देवानं, दरिद्र का बा लाऊन देल्लं त्याच्या मागं? सालभर ढोरावानी कष्ट करावं, तेव्हां*

*जेमतेम चार महिन्यांपुरतं पिकते! देवाचं करनं हे असंच आहे. त्याची स्त्रिष्टी निराळी आहे. त्याच्या बागेत झाडावर फूल उमलते, अन् मोठ्या आशेनी बघतं बसावं, खुड्याले जावं, तर हाती येतत् निखारे! आपुन खंत करीत राहेतो, म्हनत राहेतो, का कसं होतं, कसं झालं! देवाचा न्याव आपल्याले कळत नाही.''*

अशा निसर्गसंपन्न पार्श्वभूमीवर आधारलेली कादंबरी 'पडघवली'. आप्पांच्या काही कादंबऱ्या आत्मनिवेदनपर आहेत. त्या कथेतील, त्या कादंबरीतील एखादे पात्रच आपल्यासमोर ती कादंबरी उलगडत राहते. पडघवलीतील अंबावाहिनी हे असंच मध्यवर्ती आणि निवेदक पात्र. तिच्या निवेदनातून ही सारी कादंबरी आपल्यासमोर साकार होत राहते. अंबावहिनी पडघवलीत खोतांच्या घरी सून म्हणून येते आणि तिथून पडघवलीच्या कथेला सुरुवात होते. मूळ पडघवली नाव कशावरून पडलं? इथून ते गावातील सगळ्या घरांची, त्यामधील माणसांची, आसपासच्या परिसराचं वर्णन सांगत ती आपल्या घरापर्यंत पोहोचते. घरामागची बाग, घरातील जिऊआते, सासूबाई, मामंजी, आक्की, स्वत:चे यजमान, गणूभावजी,

दुर्गावन्सं ते अगदी कुळवाडी म्हणून काम करणाऱ्या येसदापर्यंत सर्वांच्या स्वभाववैशिष्ट्यांची वर्णनं करीत, तटस्थपणे सर्वांच्या गुणदोषांची चर्चा करीत, तिच्या पिढीपर्यंत पडघवली कशी खाती पिती सुखात नांदत होती याचं वर्णन करून अंबावहिनी निवेदनाचा एक टप्पा पूर्ण करते. पुढं एखाद्या घरात कली शिरल्यावर त्या घरातील माणसांची कशी डोकी फिरतात व ते घर कसं उद्ध्वस्त होतं, तद्वत् या नांदत्या पडघवलीत व्यंकू आणि हरीच्या रूपानं कली कसा शिरतो आणि त्यांना थोपवायची ताकद असणाऱ्या गुजाभावजींनाही न जुमानता तो कसा साऱ्या पडघवलीची वाट लावतो याचं सारं वर्णन अंबावहिनीच्या निवेदनातून घडतं राहतं. अक्षरशः 'विनाशकाले विपरीत बुद्धी' ही म्हण सार्थ करीत पडघवलीचा विनाश होत राहतो. विपरीत बुद्धी बाळगणाऱ्या पडघवलीतील माणसांकडूनच साऱ्या गावाचं रक्षण करणारा गिऱ्होबासुद्धा या पडझडीला आवरू शकत नाही. एकेक जुनी माणसं मरत राहतात. त्यांच्या रूपाने पडघवलीत वास्तव्य करणाऱ्या लक्ष्मी, सरस्वती, अन्नपूर्णा, गणपती, भोळा सांब महादेव या देवताही पडघवली त्यागतात. एकेका घरची दिवेलागण विझू लागते, बागा वाळू

लागतात. शिकून मोठी झालेली पोरं बारा वाटांनी गाव सोडून शहराकडे धावतात. एखाद्या साक्षीदाराच्या भूमिकेतून वहिनी हे सारं पाहात राहते, आपल्याला सांगत राहते. जमेल तेवढं, शक्य होईल तसं हे सावरायचा प्रयत्न करीत राहते. पुढं मग या सगळ्या कुकर्माचा प्रभाव वाढून एकदा मोठं वादळं होतं, प्रचंड पाऊस कोसळतो, घरं ढासळतात, माड कोसळतात, बागा मोडून पडतात, पऱ्ह्यांचा बांध कोसळतो, सगळीकडे पाणीच पाणी होते. जणू कल्पांतीचा प्रलयच. हे सारं उध्वस्त चित्र पाहून वैभवशाली पडघवलीत नांदलेली वहिनीही गाव सोडून जायचं ठरवते, मनावर दगड ठेवून. अगदी सामानासह नावेत बसतेसुद्धा. पण मग तिच्यासमोर पडघवलीच जणू साकार होऊन तिला विचारते, 'अगदी तू सुद्धा निघालीस मला सोडून?' अन् काही एक निश्चय मनाशी धरून वहिनी नावेतून उठते, पडघवलीत परत फिरते, जणू पुनश्च हरीओम् करायच्या इर्ष्येने आणि आप्पा कादंबरी पूर्ण करतात. जणू दुसऱ्या कादंबरीची सुरुवात मनात धरून. कदाचित् 'तांबडफुटी'. मानवी भावभावनांचं, स्वभाव वैचित्र्याचं, जीवनातील सुखाचं, दु:खाचं, रागाचं, कोडगेपणाचं, निर्लज्जपणाचं, हताशपणाचं,

लोभाचं असं विविध रंगांचं मिश्रण लेवून हे पडघवलीचं चित्र आप्पांनी इतक्या मनापासून रंगवलं आहे की, कोकणातल्या प्रत्येक माणसाला ते चित्र आपल्याच गावचं वाटतं आणि कोकणची पार्श्वभूमी वगळली, तर प्रत्येक माणसाला त्यातील एकेक व्यक्ती आपल्याच जवळपास हिंडताना जाणवते आणि क्षणभर अंतर्मुख करते, पण प्रत्यक्ष आप्पांना ही कादंबरी लिहिण्यापूर्वी काय वाटत होतं? त्यांची या मागची भूमिका काय होती? ती स्पष्ट करताना आप्पा प्रस्तावनेत लिहितात,

*'पडघवली' ही 'कादंबरी' नव्हे; ते एक नष्ट होऊ घातलेल्या खेड्याचे शब्दचित्र आहे.*

*कारखाने आणि उद्योगधंदे यांचे केंद्रीकरण झाल्यामुळे खेड्यातील नवसर्जनशील मनुष्यशक्तीचे शहरात जे विलीनीकरण होत आहे, ते भयानक आणि विचारी माणसाला चिंतित करणारे आहे. 'पडघवली' या सर्व मरगळ असलेल्या खेड्यांची प्रतिनिधी आहे.*

*देवाच्या दयेने अर्धा-अधिक भारत भटकलो आहे. विशेषत: त्यातली खेडी अगदी जवळून पाहिली आहेत. प्राचीन समाजव्यवस्था ढासळली आहे. सगळ्याच ग्रामसंस्था उद्ध्वस्त*

झाल्या आहेत. पूर्वपरंपरेने चालत आलेले व्यवसाय तिथेच सोडून माणसे नवनवीन व्यवसायांचे मनोरे आपल्या दुबळ्याशा हातांवर पेलू पाहत आहेत. हे इष्ट की अनिष्ट ते मला माहीत नाही. पण प्राचीन समाजव्यवस्थेवर हे जे वादळ कोसळले आहे त्याचा साक्षी होऊन मी व्यथित मनाने ही पडझड प्रत्यक्ष अनुभविली आहे.


यावरचा उपाय काय? ही परंपरागत समाजव्यवस्था आणि ग्रामव्यवस्था मोडून तिच्या जागी एखादी नवी व्यवस्था रूढ होणार आहे काय? ती कशी असेल? आजचे सर्व संकेत त्या व्यवस्थेत पाळले जातील की नवीन निर्माण केले जातील की ती संकेतशून्य असेल? हे असे आणि यांसारखेच दुसरे अनेक प्रश्न मला छळीत असतात. मात्र त्यांचे उत्तर मला सापडत नाही.

'पडघवली' हे शब्दचित्र अशा व्यथित मनोभूमिकेतूनच निर्माण झाले आहे. हे वाचून वाचक काय करतील? कदाचित् बरे म्हणतील, कदाचित् वाईट म्हणतील. पण, मला या स्तुतीपेक्षा अथवा निंदेपेक्षा वाचकांकडून जी अपेक्षा आहे, ती अशी-त्यांचे लक्ष आपल्या त्या जीर्णशीर्ण, कोसळू पाहणाऱ्या

*खेड्यातील घरकुलांकडे वळावे. कदाचित् अपेक्षा पुरी होईल; कदाचित् होणारही नाही.*

ज्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आप्पांनी ही कादंबरी अथवा ही प्रस्तावना लिहिली ती परिस्थिती तरी आज तशीच आहे. उलट थोडेफार उग्र स्वरूपच तिने धारण केले आहे. ती सुधारण्याकरिता केले गेलेले उपाय तर मूळ रोगापेक्षाही भयंकर आहेत. डोके दुखते म्हणून शीर धडावेगळे करण्यासारखाच तो प्रकार आहे. आज 'एम.आय.डी.सी.'ने वेढलेली चिपळूण, महाड, रत्नागिरी ही शहरे पाहिलीत म्हणजे मी काय म्हणतो ते तुमच्या लक्षात येईल. कोकणातल्या लोकांना रोजगार उपलब्ध करून द्यायच्या भूमिकेतून निर्माण झालेल्या या औद्योगिक वसाहती रासायनिक आणि हवेतील प्रदूषणाचे मूळ कारण ठरून कोकणच्या निसर्गसंपत्तीच्या जणू जीवावरच उठल्या आहेत. एखादा वीज प्रकल्प उभा करण्यासाठी जेव्हा शेकडो एकर आंब्याच्या बागा तोडल्या जाताहेत, रासायनिक कारखान्यांमुळे हवेत धुराचे प्रदूषण वाढून आंब्याचा मोहोर गळून पडतो आहे, काजूवर कीड पडते आहे तेव्हा आपण कोणत्या 'प्रगतीच्या' दिशेने पाऊल टाकतो आहोत हे एकदा

तपासून पहायला हवे. विकासाच्या नावाखाली आपण करीत असलेल्या उपाययोजनांमुळे जर कोकणच्या समृद्ध निसर्गसंपत्तीचा विनाश घडून येणार असेल, तर त्याची जबाबदारी कोणावर? आणि जर हे असेच घडत राहिले तर आप्पांच्या साहित्यातील ‘पडघवली’च्या जागी विश्वास पाटलांना आपल्याला समजेल अशी ‘झाडाझडती’च लिहावी लागेल. हे सारं सावरायला, घडवून आणायला कोणती अंबावहिनी केव्हा पदर खोचून उभी राहणार आहे कोण जाणे?



# तांबडफुटी

*'तासाभरानं माधव उठला. फार सुंदर चांदणं पडलं आहे, हे त्याच्या अचानक ध्यानी आलं. तो दारात जाऊन उभा राहिला. थेट तळापर्यंतचं सगळं टिपूर चांदण्यात नाहात होतं. माधवनं वळचणीखालची काठी शेजारी ठेवली. कुत्र्याला बाजेच्या खुराशी अडकवलं, अन् मग तो दोन्ही हात उशाशी घेऊन अंथरुणावर पडला. चंद्र अजून पोफळीच्या झांवळ्याआडच होता. पुरता मोकळ्यावर आला नव्हता. त्यानं पूर्णचंद्र असंख्य वेळा पाहिला होता. पण नुकता झावळ्यांच्या दाटीतून बाहेर पडलेला, आपल्या शीतल चांदण्यांचा सडा धरतीवर शिंपीत असलेला, मऊ तेजाचा पुंज असलेला चंद्र त्याला आज प्रथमच भावला होता. मोकळं, मेघांवेगळं आकाश रात्री नक्षत्रांनी लखलखत असतं. पण या क्षणी त्या सगळ्या नक्षत्रांनी जणू आपापलं तेच चंद्राला दिलं होतं. ते सगळं तेज एकवटून संपूर्ण चंद्र आकाशाच्या मध्यभागी प्रकाशत होता. जणू तो देवाघरचा आकाशदीपच सर्वत्र प्रकाशाची बरसात करीत होता.''*

*किती वेळ माधव अपलक दिठीनं ते रुपडं न्याहाळीत*

राहिला. अचानक त्याचं लक्ष खाली धरतीकडे वळलं. पूर्ण चंद्राच्या चांदण्यांत नाहात असलेली ती सृष्टी त्याला दिसताक्षणी तो क्षणार्ध चपापला. सौंदर्याच्या सकळकळा लेऊन ते खोरं जणू मंदसं हंसू हसत होतं. गुरेघरचा सगळा परिसर त्याच्यासमोर अद्वितीय रूप नटून उभा ठाकला.

आणि मग कालपरवा हीच जमीन नापिक म्हणून आपण निंदीत होतो, याची अतिशय खंत माधवच्या मनात दाटून आली. पूर्वजांनी हीच तर पिकविली. हिचीच कूस तर त्यांनी समृद्ध केली. माझे बाप, आजे, पणजे-असे सगळे इथंच तर घाम गाळीत खपले. त्याचाच हा गंध दरवळतो आहे. त्यांच्याच श्वासावाटे बाहेर पडलेला वायू आपलं अंग सुखावतो आहे. हीच देवदत्त भूमी त्यांनी नांगरली. ढेकळं फोडली. हिच्यातच त्यांनी भातं पेरली. माड लावले. पोफळी जोपासल्या. कलमं रोपली. ही देवाघरची, चांदण्यानं अतिशय मऊ झालेली भूमीच त्यांनी गंधफुलं वाहून पूजिली. हिच्यावरच आपले घामानं निथळत असलेले माथे टेकले! या शरीराचं जर काही सार्थक्य असेल तर ते हिची सेवा करण्यात! इजसाठी जगण्यांत. इजसाठी मरण्यात. ही देवकन्या भूमि. एकदा पिकवली. भाताचे,

*पोफळींचे, आंब्याचे, फणसांचे भार इच्यावरून वाहिले. मधला काळ गेला तो रिता होण्यासाठी, पुन्हा नव्या गर्भसंभवासाठी. मीही तेच करीन. जे माझ्या बापजाद्यांनी केलं ते. मात्र तीच ती चिथाडलेली पाटी मी गिरवणार नाही. नवा मार्ग शोधून नव्या वाटा मी पाडीन. नवे संगीसाथी मी मेळवीन. हाती आलेलं प्रत्येक साधन मी या जननी जन्मभूमीच्या भल्यासाठी वापरीन. अडथळ्यांशी मी झुंजेन. त्यास वलांडून पैल जाईन. हिचं धूसर मलिन रूप पालटून टाकण्याचा निकरयत्न मी करीन. त्याला संघशाखेवर आइकलेलं एक गीत आठवलं.*

*- आयेंगी काम कब यहाँ उठती हुई जवानियाँ! इजसाठी जर न श्रमलं, तर मग या उमलत्या तारुण्याचा उपयोग तरी काय? जन्मभूमी गे, तुझी शपथ. तू मला बळ दे. स्फूर्ती दे. साहस दे. चांदण्यांत नाहात असलेल्या तुजपुढं मी दंडवत घालीत आहे. हे तुझ्या मनातलं रहस्य आहे.*

*'आई गे, तुझी शपथ- हे मी करीनच करीन.'*

कुठल्याही राष्ट्रवादी तरुणाचं असावं तसं तांबडफुटील्या माधवचं हे मनोगत. एक्या अर्थी साऱ्या कादंबरीचं ते सारच आहे. पडघवलीमध्ये आप्पांनी शे-दोनशे वर्षांपूर्वीच खातं-

पितं कोकण रंगवून माणसांनी आपल्या विकृत मनोबुद्धीनं त्याची कशी विधूळवाट लावली याचं चित्रण केलं. ते सारं सावरायला अंबावहिनीला पदर खोचून उभं केलं. तिथूनच पुढे 'तांबडफुटी' सुरू होते. पडघवली सारखंच पडझड झालेलं कोकणातलं एक गाव गुरेघर. सांगलीत वैद्यकीय शिक्षण घ्यायला गेलेला राघोपंतांसारखा एक सद्‌गृहस्थ त्या दरम्यान आबा अभ्यंकर नावाच्या एका वादळात गुरफटतो. गुरेघरास परततो तोच मुळी काही नवे संकल्प उराशी बाळगून. कसं होतं त्यावेळचं गुरेघर?

*'गुरेघर गांवच मुळी खाडीला मिळणाऱ्या पऱ्ह्याच्या दुथडी वसलेलं. त्या पऱ्ह्याचे दोन फाटे. एका बाजूचा डोंगर चिरीत खालते धावत असलेला एक. दुसऱ्यानं दुसरीकडला डोंगर फोडून खाली उडी घेतलेली. सगळी बागाईती जमीन या दोन्ही फाट्यांच्या कांठावरली. दगडाळ, खडकाळ. तीच फोडून, बांध रचून बागांजोगी केलेली. तळात थोडकं मोकळवणं होतं. ते वगळता सगळीकडे खडका-दगडांशी झुंज चाललेली.'*

अशा गुरेघरात राघोपंत सुरू करतात आयुर्वेदाच्या वनौषधींची शेती; ब्राह्मी, आवळा, हिरडे, बेहडे, भुईरिंगणी अशा नाना

प्रकारच्या वनस्पतींची लागवड डोंगर उतारावर, भाताच्या खाचरात. जवळपासचे, नात्यातले, गावातले सगळे या प्रकाराची यथेच्छ टिंगल करतात. त्यांना न जुमानता आबा अभ्यंकरांच्या मार्गदर्शनाखाली हे सारे प्रयोग सुरू राहतात. त्यांच्याच ओळखीने राघोपंतांच्या मुलाचं, माधवचं शिक्षण पुण्यापर्यंत पोहोचून पूर्ण होतं. नवीन अनुभव घेतलेला, सामाजिक समस्यांची जाण असणारा, संघात जाण्यामुळं समाजातल्या सर्व थरांतील माणसांविषयी आपुलकी असणारा, मातृभूमीवर नितांत श्रद्धा असणारा, संघटनेचं सूत्र उमगलेला माधव गुरेघरला परत येतो. बरोबर असतो त्याचा सखा-सहोदर, विनू. लहानपणापासूनचा मित्र. दोघांचे मनसुबे रचले जात असतानाच एक अरिष्ट कोसळते. राघोपंतांचा घशाच्या कर्करोगाने मृत्यू ओढवतो. ती कष्टाने वाढवलेली बाग, नाना वनौषधींनी बहरलेला डोंगर साऱ्याची जबाबदारी माधववर येऊन पडते. ती जबाबदारी समर्थपणे पेलत गावच्या भल्यासाठी माधव एकेक नवीन प्रयोग सुरू करतो. त्याला गावातल्या चार चांगल्या माणसांची साथ मिळते. हळूहळू हे सुधारणेचं रोपटं मूळ धरू लागतं. मधल्या काळात विनूचं लग्न ठरतं. त्याची वाग्दत्त वधू पहायला

माधव व विनू एकत्रच जातात. मुलीकडच्या मंडळींचा आणि खुद्द त्या मुलीचा सुद्धा माधवलाच नवरा मुलगा समजून निर्माण झालेला गोंधळ, तिच्या मनात माधवविषयी अंकुरलेली प्रेमाची सुप्त भावना हे सारं आप्पा इतक्या सूत्रबद्ध रीतीने मांडतात की, वाचणारा त्या माधवच्या व्यक्तिरेखेत स्वतःला हरवून बसतो. पुढे त्याच मुलीशी विनूचं लग्न होतं. याठिकाणी गाव सुधारणेचा माधवचा प्रकल्प अजून पुढचा टप्पा गाठतो. विनू-सुमन या जोडप्याला प्रकृतीपुरुष मानून विनूच्या साक्षीनं अन् सुमनच्या मदतीनं माधव साऱ्या कुळवाड्याला या सुधारणेच्या गंगेत न्हाऊन काढतो. त्यांच्यासाठी शाळा बांधली जाते. गुरामागं जाणारी मुलं शाळेत येऊ लागतात. सुमन त्यांना गीता म्हणायला शिकवते, मुंबईला राहणाऱ्या चाकरमान्यांच्या आर्थिक मदतीने त्या मुलांना गणवेश, पाट्या-पेन्सिली मिळतात, नवीन टाळ-मृदुंगाच्या खरेदीतून गावातलं भजन सुधारतं, असं एकेक चित्र पालटत राहतं.

सगळा गाव माधवनं आखल्या रेघेत वागायला सुरू करणार एवढ्यात कादंबरी एक वेगळंच वळण घेते. माधवच्या बागेत शिरून त्याच्या बागेची नासधूस करणाऱ्या वानरांच्या टोळीवर

रात्रीच्या वेळेस बंदुकीचा बार टाकताना अपघाताने गोळी लागून माधवच्या हातून विनू मारला जातो. माधवनं आजपर्यंत उभं केलेलं सामाजिक कार्य, गावातील सुधारणांची प्रगती हे सारं सारं अचानक या वळणावर येऊन थांबतं. पुढे चालू होते नाट्यपूर्ण घटनांची मालिका, विनूच्या भावाने माधववर खुनाचा आरोप घेणं, पोलिसांनी माधवला ताब्यात घेऊन त्याच्यावर खटला भरणं, साक्षी-पुरावे, सुमनची असहाय्य अवस्था, या साऱ्यातून संशयाचा फायदा मिळून माधवचं निर्दोष सुटणं, तोपर्यंत गावातील सुधारणांचा गाडा त्याच वळणावर थटलेला.

असं सारं सारं तपशीलवार वर्णन करीत अन् एक आश्चर्यजनक शेवट करून आप्पा कादंबरी संपवतात. तो शेवट मात्र मी सांगणार नाही. त्यासाठी तरी तुम्ही ही कादंबरी वाचलीच पाहिजे. संघ-प्रचारक म्हणून माळव्यात काम करत असताना आलेल्या अनुभवांचा आणि आप्पांनी संघटनकार्यासाठी राबविलेल्या नवनवीन उपक्रमांचा ही कादंबरी म्हणजे चालताबोलता इतिहास आहे. ते स्वानुभवाचं सार आप्पांनी त्यांच्या आवडत्या कोकणभूमीवर ओतून, त्यात स्वतःच्या

प्रतिभेची आणि कल्पनाविस्ताराची भर घालून एक देखणी मूर्त त्यातून घडवली ‘तांबडफुटी’. आप्पांच्या व्यक्तिमत्त्वातील मार्दव, आर्जव, स्वदेशप्रेम, निष्ठा, श्रद्धा, त्याग या साऱ्या भावभावनांचं प्रकटीकरण या कादंबरीतून घडतं. जुन्या पद्धतीवर, जुन्या संस्कारांवर, जुन्या सामाजिक रचनांवर प्रेम करणारे आप्पा सामाजिक सुधारणांच्या बाबतीत किती पुरोगामी आणि सुधारक मतांचे होते याचं दर्शन या कादंबरीतून घडतं. पूजनीय डॉ. हेडगेवारांना अभिप्रेत असलेला ‘खरा स्वयंसेवक’ इथे माधवच्या रूपाने आपल्याला दिसून येतो. त्याचं ते रूप मनात साठवून, डॉक्टरांसमोर हात जोडून, मनापासून आप्पांची इच्छा जाणून घेऊन आपल्यालाही असं क्षणभर म्हणावंसं वाटतं,


*‘तुझे तेज अंगी शतांशे जरी ही,*
*उजाळून देऊ दिशा दाही दाही ।’*

परमपूजनीय डॉक्टर आणि श्रीगुरुजी यांच्या कालखंडात वारंवार एक प्रश्न संघस्वयंसेवकांच्या मनामध्ये येत असे की, किती दिवस हे संघाचे काम करायचे? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे काम थांबणार का? किती स्वयंसेवक निर्माण झाल्यानंतर

हे काम पूर्ण झाले असे समजायचे? पूजनीय गुरुजी याचे फार मार्मिक आणि वैज्ञानिक उत्तर देत. ते म्हणत,

'रसायनशास्त्रामध्ये स्फटिकीकरणाची (Crystalisation) एक प्रक्रिया आहे. ज्या रंगाचे, ज्या रूपाचे, ज्या आकाराचे, ज्या गुणधर्माचे स्फटिक तुम्हाला हवे आहेत त्या गुणधर्माचे काही निवडक स्फटिक (Ideal Crystals) तुम्हाला त्या द्रावणात घालावे लागतात व त्या प्रक्रियेच्या पूर्णत्वानंतर ते सर्व द्रावण तशा आदर्श स्फटिकांनी भरून जाते. संघाला असे आदर्श स्फटिक (Ideal Crystals) तयार करायचे आहेत. ज्यांच्या गुणधर्माने, ज्यांच्या पावित्र्याने, ज्यांच्या चारित्र्याने सारा समाज आदर्शवत होईल.'

असाच एक आदर्श स्फटिक (Ideal Crystal) आप्पांनी माधवच्या रूपाने या कादंबरीत रंगवला आहे.



# कुणा एकाची भ्रमणगाथा

*'कुठंतरी मुक्काम केला. कुणीतरी जेवायला घातलं. हे असंच चाललं आहे. निरुद्देश भ्रमण. अजिबातच निरुद्देश नव्हे, तसा उद्देशही आहे. पण तो फारच गोलमाल आहे. ठोसर आहे. मी का भटकतोय? मीच कशाला, सगळे साधक का भटकतात? चित्तशुद्धीसाठी, जे चित्त कुणीही पाहिलं नाही. त्याची शुद्धी करण्यासाठी. ज्याचं स्वरूप सृष्टीच्या प्रारंभापासून आजपर्यंत अज्ञात आहे त्याला घासण्यापुसण्यासाठी, त्याला अंघोळ घालण्यासाठी, उटणी लावून, तेल माखून, त्याचं केवढं कौतुक! त्याला सांभाळायचं. चहूं दिशांना सैरभैर पसरलेल्या कल्पित शत्रूंपासून त्याला वाचवायचं. नीट मार्गाला लावायचं. जे कधीच आपली रहस्यमय खोळ टाकून उघडं होऊन आपल्यासमोर आलं नाही, त्याच्यासाठी जे दिसतं ते अवमानायचं. हाती आहे ते दूर लोटायचं. त्याचा धिक्कार करायचा. निंदा करायची. ते गर्ह्य, तें त्याज्य.'*

*जे देखणेपणानं आकाराला येतंय्, रुजतंय्, अंकुररूपानं वर डोकावतंय्, लवलवणाऱ्या कोंभाच्या मिषानं मान उभावून*

चहूंकडे पाहतंय, पानांफुलांनी डंवरलंय्, फळांनी सजतंय्, जरूर तोपर्यंत त्या फळांची पाळणूक करतंय्. जरूर संपली की निःस्पृह मनानं त्यांचा संबंध सोडतंय्. या जगातील आवश्यकता संपली की न रडता, गागतां मुकाट्यानं उठून जिथून आलं तिकडे चालू लागतंय, नाहीसं होतंय-अज्ञातात अव्यक्तांत मिसळतंय्, अशा चिदंशाची निर्भर्त्सना करायची. त्याला मायारूप म्हणायचं, त्याच्यापासून दूर पळायचं. जे कधी समोर दिसू शकलं नाही अशा एका कुण्या चित्ताच्या शुद्धीसाठी म्हणे!

पण मी तरी काय करू? आजपर्यंत सगळे हेच करीत आले आहेत. ही रुळलेली चाकोरी सोडून बाहेर निघायचं सामर्थ्य माझ्यांत नाही. म्हणून मीही याच वाटेनं चाललोय. या मार्गानं जो अमर्याद साधकसंघ अज्ञात वस्तूच्या शोधासाठी धावतोय त्याच्याबरोबर मीही धावतोय. इतर साधक या दृश्याला शिव्या देऊ लागले म्हणजे त्यांच्या स्वरात स्वर मिसळून मीही त्याला शिव्या देतो. ते याला निंदायला लागले की मीही निंदतो. ते याची घृणा करायला लागले म्हणजे मीही याला नाक मुरडतो.

*पण अंतरात्मा साथ देत नाही! मी हे सोंग आणू लागलो की तो अस्वस्थ होतो. तो सुंदराला असुंदर म्हणू शकत नाही. सुंगधाची दुर्गंधी म्हणून बोळवण करू शकत नाही. त्याची ही कुतरओढ मी डोळे झाकून पाहतो आहे. मुद्दाम डोळे झाकून. कधी कधी ते डोळे पाणावतात. कुणी पाहत नाही, हे हेरून मी हळूच ती आसवं पुसून टाकतो.*

आप्पांच्या एका कादंबरीच्या प्रस्तावनेत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांनी लिहिलं आहे,

*'आप्पासाहेबांच्याइतका भटकणारा साहित्यिक मी तर दुसरा पाहिलेला नाही. महाराष्ट्राचा असा एकही भाग नाही की जिथं ते हिंडलेले नाहीत. जे पाहिलं, अनुभवलं अन् त्यांचं मन शहारलं, मोहरलं, ते ते त्यांनी शब्दांकित केलं. मराठी साहित्यक्षेत्रात तपाचरण आणि यात्रा करणारे असे वारकरी फारच थोडे सापडतील.'*

स्व. आप्पांनी लिहून ठेवलंय, 'अनुभवाशिवाय एक ओळही मी लिहिलेली नाही.' काय काय अनुभवलं आप्पांनी? किंबहुना मी तर असं म्हणेन की, काय सोसलं नाही आप्पांनी? ते सोसताना आप्पांची त्यामागची भूमिका काय होती? हे सारं

सोसून झाल्यावर त्यावर तटस्थपणे भाष्य करीत असताना, ते सारं लिहून काढत असताना, त्या मागच्या आयुष्याविषयी आप्पांची स्थितप्रज्ञाची भूमिका त्यांनी त्यांच्या आयुष्यातलं नर्मदा परिक्रमेचं जे पर्व, त्या पर्वावर लिहिलेल्या एका कादंबरीच्या अर्पणपत्रिकेत आणि प्रस्तावनेत स्पष्ट केली आहे. कादंबरीचं नाव, 'कुणा एकाची भ्रमणगाथा' अर्पणपत्रिकेत अप्पांनी लिहिलं,

*'युगा अठ्ठाविसांची वेदना... तिला.'*

*कुणी एक'.*

प्रस्तावनेत लिहिलं,

*'कुंतीनं देवाजवळ विपत्ति मागितली. देव म्हणाला, तथास्तु. त्या देवदत्त दानानं विश्व अंर्तबाह्य समृद्ध झालं आहे. वेदनेचा जयजयकार असो. वेदना उपलब्ध झाली नसती, तर मानवानं सुख कसं भोगलं असतं; कोण जाणे? ही कुणा एकाची भ्रमणगाथा! हा कुणी एक स्वत:च्या आणि दुसऱ्याच्या सुखदु:खांचा साक्षी होता.'*

हा 'कुणी एक' दुपारच्या रणरणत्या उन्हात, तापलेल्या धुळीत चिरल्या पायांनी नर्मदेची परिक्रमा करतो आहे. नर्मदेकाठच्या वाळवंटातून, खेड्यातून, दरडीतून, नेहमीची

पायवाट सोडून घनदाट जंगलातून असा हा कुणी एक सारखा चालतो आहे. एक लंगोटी, तीवर एक फडकं गुंडाळलेलं एवढंच वस्त्र, एक भोपळ्याचा तुंबा आणि गीताभाष्य एवढं सामान. करतल भिक्षा, तरुतल निवास. भिक्षा मागून जे मिळेल ते ब्रह्मभावानं सेवन करावं, न मिळाल्यास नर्मदेचं पाणी पिऊन पुढे चालू लागावं. वाटेत नाना प्रकारची माणसं, त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांसह भेटताहेत. वेगवेगळी खेडी, निसर्गाचे साक्षात्कार घडवणारी जंगले हे सारं पार करीत, अनुभवाचं गाठोडं सांभाळीत हा कुणी एक परिक्रमा करतो आहे.

मध्येच एका धनसंपन्न, ऐश्वर्ययुक्त गोसाव्यांच्या मठात येऊन पोहोचतो. चारीठाव सुखात असणारी ती संन्यासी माणसं या वीस-बावीस वर्षांच्या भटक्याच्या बुद्धीच्या तेजानं दिपून जाताहेत. ह्याची सेवा करीत चार दिवस याला मठात ठेऊन घेताहेत. याच्या व्यासंगाची आणि निस्पृहतेची ओढ वाटून त्या मठाचा मठाधीशच मठ सोडून याच्याबरोबर भटकायला बाहेर पडतो आहे. पुन्हा आपला प्रवास चालू.

जीर्ण झालेल्या वस्त्रासारखं, ऐन उमेदीतलं पण कोमेजून

गेलेलं शरीर मनाच्या पाठीवर टाकून हा सारखा धावतो आहे. एखाद्या चित्त्यानं आपली शिकार पाठीवर घेऊन पळावं त्यासारखं. पण हळूहळू जाणवतंय की शरीराच्या वेदना मनाला लगाम घालतायत. त्याची गती मंदावतेय. अन् मग कसातरी मार्ग कापत हा कुणी एक, एका पाठशाळेत येऊन विसावतो आहे. वेदपठण करणारी मुलं, त्यांना शिकवणारे गुरुजी आणि साक्षात् मीरेचं रूप लेवून, राधेची भक्ति अंगी मुरलेली यशोदा; यांच्या अगत्यशील आतिथ्यात हा कुणी एक विसावतो आहे. थोडी सवड मिळताच शरीरातील दबा धरून बसलेली दुखणी एकदम हल्ला करताहेत. मन त्यांच्या या हल्ल्यापुढं निष्प्रभ होतंय. घरात घेऊन आजारलेल्या या अतिथीची यशोदा देव मानून सेवा करते आहे. सेवा करता करता तिला जाणवतंय की याच्या शरीरापेक्षाही याच्या मनाला सेवेची, स्नेहाची जास्त गरज आहे. वेगवेगळ्या अनुभवांचं, दारिद्र्याचं, मारहाणीचं अपमानांचं ऊन सहन केलेलं याचं मन वाळून कोरडं झालंय, तडकलंय. याला गरज आहे स्नेहाची, स्निग्धपूर्ण सेवेची. तो ओलावा, ती माया त्या कुण्या एकाला मिळताच तो सुखावतो आहे. मनाची कवाडं सताड उघडून अनुभवांचं चित्र-विचित्र

स्वरूप तिच्यासमोर मांडतो आहे. त्या अनुभवांचा, दारिद्र्याचा दाह आठवून डोळ्यांतून अश्रू बाहेर पडताहेत. हा कुणी एक खंतावून म्हणतो आहे,

*“देवाजवळ एकच तक्रार आहे. आपत्तींना मी भीत नाही. कुंतीचं मागणं मागतो देवापाशी-विपदः सन्तु नः शश्वत् ! पण देवानं हे मऊ मन का दिलं? जे दुसऱ्यांच्या दुःखानं दुःखी होतं- अन् परदुःखानं कातर होऊन रडण्यात धन्यता मानतं! शरीर पुरुषाचं, अन् मग स्त्रीचं ही परवड देवानं का केली?”*

या प्रश्नाचं उत्तर त्याच्यापाशीही नाही अन् यशोदेपाशीही नाही. ती त्याला तिथेच पाठशाळेत राहण्याचा आग्रह करतेय. आता पुन्हा त्यांची झुंज सुरू होते आहे. या वेळेला मात्र तो एकटा एकीकडे आहे. दुसरीकडे आहे सुखाला जवळ केलेलं शरीर आणि स्नेहाला लोभावलेलं मन. एक विरुद्ध दोन अशी ही विषम झुंज आहे. यशोदेची बाजूही त्या दोघांकडे झुकलेली. याची स्थिती आणखीनच अवघड. अन् एक दिवस उठू पाहणाऱ्या प्रवाहाचं वादळ थोपून धरीत यशोदा त्याला सांगते आहे,

*“आज तुम्ही, तुम्ही निघा भय्या!” ‘कुठे?’ ‘परिक्रमेसाठी. तुम्हाला का जायला सांगितलं ते ठाऊक आहे?’ ‘कारण तुम्ही माझं पूजास्थान आहात. निघताना आशीर्वाद द्या भय्या! म्हणा, की मी शेवटपर्यंत ताठ उभी राहू शकेन.’*

स्तंभित झालेला तो कुणी एक नर्मदेच्या साक्षीनं यशोदेला हवा तो आशीर्वाद देऊन त्याच पावली चालू लागतो आहे. परिक्रमेच्या वाटेनं, ज्या वाटेनं तो कधीच परतणार नव्हता.

*‘मी चालतो आहे. उजव्या हाताला माता नर्मदा वाहत्ये आहे. डाव्या बाजूला वाटेच्या पलिकडे शेतं आहेत, गुरं चराईचं रान आहे. फताड्या पानांचे साग आहेत, खडक आहेत, आकाशाला भिडणारी अंजनाची झाडं आहेत. या सगळ्यांमधून रेंगाळणाऱ्या वाटेवरून मी भराभर पावलं टाकतो आहे. ती वाट मला लवकरच संपवायची आहे. पण का?’*


*खरंच की! हे कधीच लक्षात आलं नाही. लवकर का? सावकाश का नाही? माझ्या या भ्रमणाचा एकूण जीवनाच्याच वाटचालीचा अर्थ काय? प्रदक्षिणा उशीरानं संपली, अथवा न संपली, म्हणून काय बिघडलं? प्रश्न तर मार्मिक आहे.*

*थोडं थांबून विचार केला पाहिजे याचा. पण कुठं थांबायचं?*

*डाव्या हाताला मोहाचं हे एक झाड आहे. बसू या त्याच्याखाली. बुद्ध बोधिवृक्षाखाली बसला, ज्ञानेश्वर अजानवृक्षाखाली विसावले. आपण मोहाच्याच झाडाखाली बसू या! आपल्या वाट्याला तेच आलं. एकेकाचं भाग्य! दुसरं काय! त्याच्या सावलीत बसलो आहे. समोर नर्मदेचं अथांग पाणी पसरलं आहे. हिशोब करतोय. जीवनांतील भटकंतीचा.*

*मी -*

*कुणी एक -*



# आम्ही भगीरथाचे पुत्र

*'शिवालिक टेकड्या हे हिमालयाच्या दक्षिण उपत्यकांतील एका पर्वतमालेचं नाव. या टेकड्यांच्या उत्तरेस धवलधार नावाची हिमाच्छादित मन्दारमाला पूर्व-पश्चिम पसरली आहे. तिच्या दक्षिणेस कमी-अधिक उंचीच्या शिवालिक मालेतील दोन रांगा. रामगढ धार अन् नयनादेवी धार.'*

*या दोन्ही धारांमधून वाकडीतिकडी वळणं घेत वाहते सतलज. ती या दोन्ही धारांचा तट फोडून मैदानात उतरताना किंचित दक्षिण वाहिनी होते.*

*उन्हाळ्याचे दिवस. दक्षिणवायूनं नेहमीचं सौम्य रूप त्यागलं होतं. प्रचंड वावटळी उधळवीत मी हिमाचलाच्या शिखरांशी धडका घेत होता. या झुंजीत तो नेहमीच अयशस्वी होई. खडकाला लाट धडकून फुटावी, शतशः विदीर्ण व्हावी, तसा. मग चहूदिशांना भोवरे गरगरवीत तो इतस्ततः पसरे.*

*याही पाळीला त्याच्या क्रमात खंड पडला नव्हता. चहूदिशांना झालेल्या वायूचा एक चिरफळलेला झोत सतलजच्या प्रवाहावरून पूर्वेकडे तिब्बतच्या दिशेने वाहात होता. एवढा मनस्वी सतलजचा*

प्रवाह, पण तोही या स्रोताच्या वेगानं जागच्या जागी पांगुळल्यासारखा झाला होता. वावधुळीनं उठणारे आवर्त सतलजच्या निळ्या पाण्यावर गरगरत होते.

शंभर वर्षांपूर्वी हा सर्व प्रदेश सरळसोट वाढलेल्या झाडांनी नुसता झाकून गेला होता. नाना प्रकारचा झाडोरा तिथं दाटला होता. शिंदी चवऱ्या ढाळीत उभी होती. शीशमची काळी खोडं आकाशावेरी धावत होती. बांबूची बेटं सळसळत होती. चीडच्या फांदोऱ्यामधून वारा शिरे, तेव्हा गाईंनी शेपट्या फटकाराव्यात तसा भास होऊन एक चमत्कारिक सीत्कार उमटे.

या बांबूच्या बेड्यातून कशीबशी वाट काढीत एक नागा बैरागी सतलजच्या दक्षिण तीरावरून तिच्या उगमाकडे चालला होता. बैराग्याचा प्रवास काही फारसा सुखदायी नव्हता. सतलजच्या दरडीवरून चालणं कष्टप्रद होतं. या अडचणींची तमा न बाळगता बैरागी तसाच नेटानं पावलं उचलीत होता. जसा उग्र त्याचा निश्चय, तसाच उग्र त्याचा वेष. तो नदीतीराजवळची वाट सोडून खेड्याकडे चालू लागला. टेकाडं चढत तडक नरसिंहाच्या देवळाजवळ पोचला. तिथं सतलजकडे

तोंड वळवून तो डावं पाऊल उजव्या जांघेवर चढवून उभा राहिला, गरुडासन मांडून. अर्थ स्पष्ट होता. दुपार कडकडत होती. कुणी तरी बैराग्याच्या पुडीची व्यवस्था करायला हवी होती. याचना करणं बैराग्याच्या तंत्रात बसत नव्हतं. पण आज गावातले झाडून सगळे पुरुष पैलतीरावरील बालकनाथाच्या यात्रेला गेले होते. उरली होती बायका अन् पोरंसोरं. त्यामुळं त्या जळत्या दुपारी गरुडासन करून उभ्या ठाकलेल्या उग्र बैराग्याची चौकशी कुणीच केली नाही.

वारा बंद झाला. ऊन मस्तकावर आल्यानं चटचटत होतं. चहूबाजूंनी मृगजळाच्या लाटावर लाटा झोपावत होत्या. टेकाडं तापली होती. झाडांची हिरवी पानंही आगीनं होरपळल्यासारखी झाली होती. अन् या अग्निकांडात बैरागी गरुडासन मांडून निश्चल उभा होता.

शेवटी त्याच्या लक्षात आलं की आपली विचारपूस कोणीच करीत नाही. त्याच्या भाळीच्या आठीवर आठी चढू लागली. गरुडासन हलू लागलं. तांबूस डोळे लालभडक झाले. बांधलेल्या मुठी वळू लागल्या.

शेवटी क्रोधानं थरथरत त्यानं आसन मोडलं. डावा पाय

*खाली टेकीत त्यानं मूठभर माती उचलली. ती अंगाभोवती भिरकावीत तो ओरडला... जणू त्याच्या मनात घोंघावत असलेला प्रलयच शब्दरूप होऊन बाहेर उधळला. ''यह बुहारा गाव पानीके नीचे डूब जायगा!''*

एक अकल्पित भगीरथ प्रयत्नांवर आधारलेली कादंबरी लिहिण्यासाठी आप्पांनी केलेली ही कल्पित पण थरारक सुरुवात. निसर्गावर, मानवी भावभावनांवर, संतवाङ्मयावर, किल्ल्यावर, इतिहासावर आधारित कादंबऱ्या लिहिणारे आप्पा, एका धरणाच्या बांधकामावर आधारित कादंबरी लिहिणार ही कल्पनाही आप्पांचा स्वभाव आणि पिंड माहित असणाऱ्यांच्या दृष्टीने आश्चर्यजनक होती. कदाचित स्वतः आप्पांनी सुद्धा या रुक्ष विषयाकडे तोपर्यंत कधी साहित्यिक दृष्टिकोनातून पाहिले नसेल. म्हणूनच कदाचित त्यांनी हा विषय एक आव्हान म्हणून निवडला असावा. सन १९५८ च्या सुमारास ज्या महत्त्वाकांक्षी योजनेचे, भाकरा-नानगल धरणाचे बांधकाम सुरू होते, त्या धरणांच्या बांधकामावर आधारित आप्पांची आगळीवेगळी कादंबरी 'आम्ही भगीरथाचे पुत्र.'

सतलजच्या तीरावर वसलेलं छोटं खेडं. भाकडा. आसपासची

तशीच छोटी छोटी खेडी. या भाकड्यातलं पंडित गीतारामांचं घर. पत्नी विद्यावती, तान्हा मुलगा जीवन. जवळच दुसरं मोठं खेडं विलासपूर. तिथल्या एका धर्मपीठाच्या महंतांचं आणि रियासत रायपूरचे महाराज यांचा या गीतारामावर असलेला लोभ. त्यांच्या जीवनवर त्यांचं पुत्रवत् प्रेम. बिलासपूरचे मोठे महंत नुकतीच रामेश्वराची पायी यात्रा करून आलेले. येताना राजस्थानच्या वाळवंटात त्यांचे झालेले हाल. तेथील लोकांची त्यांनी पाहिलेली, पाण्याविना चाललेली धडपड. इकडे दरवर्षी पावसाळ्यात व उन्हाळ्यात सतलजला येणारे पूर. त्या पुराने होणारी जीवित आणि वित्तहानी. हे सारं परस्परविरुद्ध, पण एकाच देशातलं चित्र पाहून त्यांनी मनाशी केलेला काही एक निश्चय. त्या निश्चयाला मिळालेली रायपूरच्या राजासाहेबांची साथ. या सगळ्यांतून प्रकट झालेली सतलजला बांधून घालण्याची इच्छा. त्या साठवलेल्या पाण्यातून निपाण्या पंजाब, राजस्थान, हरयाणा या ठिकाणांना पाणी आणि वीज पुरवण्याची योजना. या सगळ्या वर्णनात कादंबरीचा एक टप्पा पूर्ण होतो. दुसऱ्या टप्प्यात सुरू होतं जीवनचं शिक्षण. शालेय शिक्षणातलं त्याचं उज्ज्वल यश पाहून त्याला इंजिनिअर

करण्यासाठी राजेसाहेबांनी दाखविलेली खर्चाची तयारी. शिक्षणाच्या निमित्ताने जीवनचं लाहोरचं वास्तव्य. तिथे पडलेली जोगेंद्रांसारख्या जहाल क्रांतीकारकांची गाठ. त्या दोघांचं जडलेलं जीवाभावाचं सख्य. स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळी. त्यातलं जोगेनचं स्थान, जीवनची शिक्षणावरची अढळ निष्ठा. या साऱ्यातून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन सुवर्णपदक मिळवून जीवनचं भाकड्याला परत येणं यात कादंबरीचा दुसरा टप्पा संपतो.

इथून सुरुवात होते जीवन आणि त्याच्या चार मित्रांच्या अथक परिश्रमांची कहाणी. इंग्रजी आमदानीत मिळत असलेली चांगली लठ्ठ पगाराची नोकरी सोडून केवळ सतलजला बांधून महंतजींची इच्छा पुरी करण्यासाठी झपाटलेला जीवन. अहोरात्र आपल्या चार सोबत्यांच्या जोडीने ऊन-पावसाची तमा न बाळगता तब्बल बारा वर्षे या पाच जणांनी घेतलेले श्रम. पुढे केव्हातरी बांधल्या जाणाऱ्या धरणाची यांनी तयार केलेली पूर्वपीठिका. किती उंचीची भिंत बांधावी लागेल, त्यामुळे किती पाणी साठेल, किती गावे पाण्याखाली जातील, किती वस्ती उठवावी लागेल इथपासून ते ज्यांना नुकसानभरपाई द्यावी लागेल, त्यांच्या शेतात कोणकोणती व किती झाडे


आहेत या सर्वांचे अंतर यांचा गोळा केलेला तपशील हे करत असतानाच एके संध्याकाळी जवळच्या एका खेड्यातून परतताना सतलजच्या उन्हाळी पुराने घेतलेला बोनीप्रसादचा बळी, असं सारं कादंबरीच्या तिसऱ्या टप्प्यात येतं.

सत्तेचाळीस साल उजाडलेलं. स्वातंत्र्याचं सोनेरी ऊन पसरवीत उजाडलेली पहाट. भाकड्याच्या धरणाच्या कामानं घेतलेला वेग. जीवनच्या आजपर्यंतच्या भगिरथ प्रयत्नांची दखल घेऊन सरकारनं त्याची या कामावर केलेली नियुक्ती. हे आवडीचं काम पुरं करण्यासाठी अहोरात्र झटणारा जीवन आणि त्याचे तीन साथीदार. काम नेहमीच्या संथ 'सरकारी' पद्धतीने चाललेलं. कंत्राटदारांची चलाखी, मजुरांचं दारिद्र्य, उच्चपदस्थांचा भ्रष्टाचार हे सगळं पाहून संतापलेले 'जीवनरामजी'. याच वळणावर नेमका जोगेन भाकड्याला परत येतो. त्याला दिसतात धरण पूर्ण करण्याच्या ध्येयानं झपाटलेले जीवन जीवनरामजी, पाकिस्तानातून निर्वासित म्हणून आलेले, सर्वस्व गमावलेले इंजिनियर आणि मजूर. इकडे कंत्राटदारांनी चालवलेली मजुरांची पिळवणूक, लक्षावधी रुपयांचा भ्रष्टाचार. हे सगळं पाहून त्याच्यातला क्रांतीकारक जागा होतो. तो या मजुरांना

हाताशी धरून एक संप घडवून आणतो. त्याच्या या उद्योगामुळे कामात खंड पडत असलेला पाहून उद्विग्न झालेले जीवनरामजी. तो आणि जीवनरामजी यामधला दोन वेगवेगळ्या पातळ्यांवरचा संघर्ष. याच दरम्यान पंतप्रधानांचं या प्रकल्पाला भेट देणं, ते अवाढव्य काम पाहून त्यांचं चकित होणं, जीवनरामजींच्या कामावरच्या श्रद्धेनं त्यांचं आनंदित होणं हे सारं उलगडत कादंबरी आणि धरण दोन्हीही पूर्णत्वाकडे येऊन पोहोचतात, तेव्हा आपलं मनं आप्पांनी गोळा केलेल्या माहितीचे तपशील, तिथल्या परिसरांची वर्णनं, बांधकामासाठी वापरल्या गेलेल्या तंत्रज्ञानाचे आणि साहित्याचे उल्लेख आणि या साऱ्या सत्यघटनेला आप्पांनी दिलेली कल्पनाशक्तीची जोड पाहून विस्मयानं मन भरून येतं आणि म्हणूनच काकासाहेब गाडगीळांनी या कादंबरीच्या प्रस्तावनेच्या शेवटी लिहिलं –

*पराक्रमाला केवळ रणक्षेत्रातच वाव आहे असं नव्हे, तर विधायक, रचनात्मक अशा राष्ट्रोन्नतीच्या कार्यातही वाव आहे. देशात जी निरनिराळी धरणे झाली आहेत आणि होत आहेत, ती खरोखरच आधुनिक यात्रास्थाने आहेत. त्यांच्या दर्शनाने प्रेरणा उत्पन्न होते, हेही तितकेच खरे आहे.*

जे आज या भाकडानांगल योजनेचे व तेथील कार्याचे प्रत्यक्ष दर्शन घेऊ शकत नाहीत, त्यांना यथार्थ कल्पना देणारी अशी ही कादंबरी आहे. साहित्य क्षेत्रातही कादंबरी नावीन्यपूर्ण ठरली असणार यात वाद नाही.



# पूर्णामायची लेकरं

*'पूर्णामायविषयी काय बोलावे!' नदी लहानुलीच आहे. काही गंगेगोदेएवढी नव्हे. गंगागोदाच कशाला! वर्धा अन् कांटेपूर्णाही तिच्यापेक्षा कितीतरी मोठ्या. पण म्हणून काय झाले. पंढरीचा पांडुरंग काही डोंगराएवढा उंच नाही.*

*तसे पूर्णामायचे. त्या तेवढ्याशा नदीवरच या बावनगाव वऱ्हाडाची अपरंपार श्रद्धा. ती तर या लोकांची आईच आहे!*

*या इथून जवळून निघाली. पात्रही उथळच आहे. दोन्ही कांठच्या दरडी भुरक्या मातीच्या. वऱ्हाडची माती काळी कुळकुळीत. बुक्क्यात मिसळून द्या. ओळखू यायची नाही. पण पूर्णामाय आपल्या पुराबरोबर पालापाचोळा अन् डोंगराची माती वाहून आणते. त्यामुळे तिच्या दोन्ही थड्यांवरची गावे अगदी जवळजवळ. या गावी चूळ भरावी, अन् त्या गावी टाकावी. काही गावे तर दोन्ही थड्यांवर वसली आहेत. नणंदेच्या घरी शिजलेल्या गरम गरम मुगवड्या पलीकडल्या थडीवरल्या भावजयीने जेवाव्या. नुसती पूर्णामाय ओलांडली की झाले. आयाबायांची तर पूर्णामाय मायकुशीच.*

उन्हाळ्यात हे बावनगाव वऱ्हाड भारी तापते. उन्हाचे वाफारे लहालहा करीत धावतात. चहूबाजूंना सगळं शुष्क. उन्हाच्या झळ्या डोळ्यांनाही झोंबतात. या चित्राकडे त्या दिवसात दुपारी पाहवत नाही. सगळे धगधगत असते. गुरेढोरे कुण्या झाडोऱ्याच्या आडोश्याला तोंडे लपवून बसलेली असतात. त्यांनाही उन्हाचा धुपकारा सहन होत नाही. कशीबशी मोठमोठाले सुस्कारे टाकीत काळ काढीत असतात.

मग हळुहळू आभाळात जमतात ढग. मिरगाच्या पहिल्या धारा कोसळतात. तयार करून ठेवलेल्या जमिनी पाऊस पिऊन फुगतात. खरपूस चविष्ट वास सुटतात. वापसा झाला, की सरत्या अन् तिफनीच्या नळकांडातून सरकी अन् जवारी वावरात खोलवर उतरते. आठ-दहा दिवसांत काळीचे काळेपण हारपते. चहूकडे हिरवी मलई जमिनीतून उगवते. हिरवी, पोपटी, मुलायम मलई.

कपाशी अन् ज्वारी वीत-वीत उंचावली की तीतून डवरे फिरायला लागतात. दोन्ही तासांतले उनाड गवत पार हाकलेले जाते. त्याच्याबरोबर निंदणीच्या बाया भसाभस खुरपी चालवीत कलकलाटाने वावरे जिवंत करतात. कापसाचे रोप मोठे होते.

*पिवळी, डेरेदार फुले फुलतात. त्यांच्यावर फुलपाखरे घिरट्या घालू लागतात. हळुहळू फुले कोमेजतात. बोंडे वर येतात. टपोरी, गोल बोंडे. ती भरली की त्यांना तडे पडतात. अन् त्यातून वऱ्हाडाचे वैभव दिसू लागते.*

*किती पांढरे! फार फार पांढरे. मध्ये सरकीच्या सात-आठ दाण्यांची माळ. प्रत्येक दाण्याभोवती पांढरे तंतू. मऊमऊ हाताला सुखद भासणारे. एकात एक गुंफलेले. हळुहळू कापूस बोंडातून बाहेर येतो. सगळी वावरे पांढरी दिसू लागतात.*

वातावरणनिर्मिती हा आप्पांच्या कादंबरीतला अतिशय महत्त्वाचा भाग. त्यांच्या सगळ्याच कादंबऱ्यांमधून हा भाग आप्पांनी अतिशय समर्थपणे आणि ताकदीने हाताळला आहे. ज्या भागावर, ज्या परिसरावर, ज्या माणसांवर कादंबरी लिहायची आहे त्या परिसराचा इतिहास, भूगोल, तिथला निसर्ग आणि तेथील माणसांची स्वभाववैशिष्ट्ये या चार बाजूंची आप्पा एक भक्कम चौकट तयार करतात आणि मग त्या चौकटीत आप्पांची प्रतिभा आपल्या अनुभवाच्या कुंचल्याने असे काही चित्र तयार करते की, आपण पाहतच राहतो. नुसते पाहत रहात नाही तर थक्क होऊन जातो. एकाच परिसरावर लिहिलेल्या अनेक

कादंबऱ्यांमध्ये सुद्धा आप्पांनी या चौकटी वेगवेगळ्या मांडल्या आहेत, त्यामुळे सलग चार कादंबऱ्या कोकणावरच्या वाचल्या तरी त्यामध्ये तोच तोपणा जाणवत नाही. या सर्व लिखाणामागची आप्पांची प्रेरणा जरी एक आहे असे वाटले तरी संदर्भ मात्र वेगवेगळे असतात. म्हणूनच आप्पांची प्रत्येक कादंबरी ही नित्यनूतन आणि टवटवीत वाटते. अगदी वसंतातल्या नुकत्याच फुटलेल्या कोवळ्या पालवीसारखी!

आप्पांच्या अफाट अनुभवविश्वाचा प्रत्यय आणून देणारी वऱ्हाडच्या भूमीत वसलेल्या कुठल्याही एका खेड्यात आढळणाऱ्या वातावरणावर आधारलेली ही अस्सल वऱ्हाडी कादंबरी 'पूर्णामायची लेकरं'. आप्पांनी या कादंबरीला वऱ्हाडी मायबोलीचे असे काही अलंकार घालून सजवले आहे की, अगदी पश्चिम महाराष्ट्रातल्या किंवा कोकणातल्या कुळीच्या कुळवंतिणींनी देखील हिच्याकडे पाहून मान खाली घालावी. बावनगाव वऱ्हाडातल्या परिसराचं, तिथल्या शेतीचं, पिकाचं अगदी वानरांच्या टोळ्यांचं देखील वर्णन करत करत आप्पा आपल्याला बेलोऱ्याच्या बयिराम ढोमन्याच्या घराच्या ओट्यावर केव्हा नेऊन बसवतात ते आपल्याला कळतच नाही. आपली

चाहून लागून बयिरामची माय आलोकाबुढी आपल्या नातवाला हाक मारते, ‘बाबू मोकिंदा! त्याहिले पानी आणून देईजो.’ आपण ते गाव, त्या गावाशेजारून वाहणारी पूर्णामाय, येताना भेटलेली माणसं यांचा विचार करतो आहोत तो आपल्या लक्षात येते की, आपल्या बयिरामभौचा संसारसुद्धा अगदी आपल्या चारचौघांसारखाच आहे. बयिरामभौ त्याची बायको मनकरना, थोरला मुलगा रुपराव, धाकटा मोकिंदा अन् बयिरामची आंधळी आई आलोकाबुढी. या आलोकाबुढीच्याच वयाच्या गावातील इतर काही बुढ्या, एक नमुनेदार म्हातारा गोमाजीबुवा, एक बेरकी ब्राह्मण पांडेबुवा, एक वस्ताद मारवाडी दुल्लभचंद, एक त्या भागातील महंत नंगेबाबा या सगळ्या इरसाल पात्रांभोवती कादंबरी फिरत राहते.

यातला बयिराम भोळा वारकरी. मृदुंग वाजवीत भजने म्हणणारा. दिवस दिवस आपल्या ठोकापिटीच्या वावरात श्रमून, पैसे मिळवून, बाजारला जाऊन एक सुंदर छकडा किंवा धमणी घेऊन मिरवत मिरवत गावात येण्याची स्वप्ने पाहणारा कष्टाळू शेतकरी. थोरला मुलगा रुपराव त्याचं सगळं लक्ष तालमीत, धाकटा मोकिंदा उनाडक्या करणारा, घरचं सगळं

आवरून सारखी झोपणारी बायको मनकरना. मायच्या भाषेत कुंभकरना, आणि आंधळी झालेली माय आलोकाबुढी असा सगळा बारदाना. आपण एकटेच रानात कष्ट करतो, आपली कोणीच काळजी करीत नाही असे वाटून दु:खी झालेला बयिरामभौ एके रात्री मोकिंदाला घेऊन आपल्या वावराकडे निघतो. त्याच्याकडे आपलं गाऱ्हाणं सांगताना तो म्हणतो,

*"मंग? तू तर तुझ्या बाच्या मदतीले कधी येतच नाही! रातदीस उनाडत राह्यतं! थो बह्याना रुपां! थे तर पारं कामातून गेला. दुसरा तू! तुले तुहे फुलपाखरं, वान्नरे, गोट्या, पोट्याहिसंगं मारामाऱ्या, भांडनं, याच्यासमोर काही सुचन्, तव्हा का नाही! तुही माय कुंभकर्ना, मोठी माय फुटकी, आन् तू असा! बा इकडे वावरात खपू खपू मरून राह्यला, त तिकडे कोनाचं ध्यानच नाही!"*

*"पाह्यं बर! वावरांत बैलासारखं खपावं लागते! रात म्हनूं नोय, दीस म्हनूं नोय. उन्हापावसांत तापावं अन् भिजावं. तव्हा तुम्हाले खायाले भेटते! आता थंडीचे दीस आहेत. मले घोंगडी पांघरून झोपता येत नाही काय म्हनाव्? पर वावरात राखन कऱ्याले जाव लागते! मी ना गेलो, तर तुले पोयी*

*कशी भेटन् खायाले?''*

*''घरात कोनाले माही कायजी नाही! सगये आपल्या आपल्या तानीत मस्ताने आहेत. मी खातो, का पितो, का उपाशी राह्यतो! घरी येऊन जेवायाले मागावं तर तुही माय कोठी तरी पल्लू तोंडावर घेऊन घोरंदार झोपलेली असते. बुढी त बंबाया नगराची रानीच आहे! भवती शेणापती, परधान, दिवानजी असा बुढ्याहिचा मेया जमवून ती तपकिरीच्या डब्या रिकाम्या करीत राह्यते!''*

*''मी जरा जसा खातापिता गडीच हाओ बांधलेला! कंधी कंधी जीव थकून जाते. लेका, माहाही जीव नशीन् काय म्हनावं? आसं वाटते, का घरी जावं. आन म्हनावं, बाबू मोकिंदा, पानी आनजो गड्या प्यायले! आन् जराशेक कमरीवर पाय देजो. पर मोकिंदा त गेलेला आसते बोहाऱ्या वान्नेराहिच्या मागं! माही कंबर ठसठस करते त करो! अशे तं तुम्ही मानसंऽ व्हा घरातले!''*

असं त्या मुलाबरोबर बोलत बोलत वावरात पोचून थोडा वेळा राखण करून मध्यरात्री मोकिंदाला खांद्यावर घेऊन परत येताना बयिरामला आमराईपाशी भेटते एक भूत. जीव खाऊन


पळत सुटलेल्या बयिरामला खांद्यावरचा मोकिंदा कधी पडला याचं भानच रहात नाही. लक्षात येताच परत वळून भोकाड पसरलेल्या मोकिंदाला परत खांद्यावर घेऊन बयिराम धावतपळत घर गाठतो. पुढं मग मोकिंदाचं आजारपण, त्याच्यावरचे उतारे, त्याच्यासाठी कर्ज, त्याला वैतागून घरातून निघून गेलेला बयिराम, ही संधी साधून पांडेबोवाला हाताशी धरून बयिरामाचं ठोकापिटीचं वावर घशात घालू पाहणारा दुल्लभचंद. या सगळ्या वातावरणाने सावरलेला रुपराव, दुल्लभचंदाची माणसं वावरात वख्खर धरायला येताच त्यांच्यावर एकटाच तुटून पडतो. वावराचं ठोकापिटी नाव खरं होतं. दुल्लभचंद त्याच्या माणसांसह पळून जातो. सगळा गाव रुपरावच्या पराक्रमावर खूष, तर आलोकाबुढी रुपरावने अधर्माने आचरण करून दुल्लभचंदाला अद्दल घडवल्याबद्दल नाराज, असा सगळा तिढा. तेवढ्यात बयिरामचा पत्ता लागतो. रुपराव गावच्या दो-चौजणांना घेऊन जाऊन बयिरामला परत आणतो. तो बुढी रागावून घरातून निघून दुसऱ्याकडे राह्यला गेलेली. शेवटी सगळी कालवा निरपून काढावा म्हणून बयिरामानं केलेला सत्यनारायण. त्या निमित्तानं सगळ्या गावानं वर्गणी

काढून केलेलं गावजेवण आणि नेमक्या वेळेला रुपरावानं मोकिंदाच्या मदतीने अलोकाबुढीला पुन्हा घरी आणणं. अशी सगळी नाना स्वभावांची माणसं नव्हे, लेकरं गोळा करून लिहिलेली कादंबरी, ‘पूर्णामायची लेकरं.’

या लिखाणामागची भूमिका सांगताना आप्पांनी प्रस्तावनेत लिहिलं आहे,

*‘विदर्भाची आठवण होताक्षणी मनासमोर उभी ठाकते जगन्माता रुक्मिणी, त्यानंतर आठवतो महाकवी कालिदासाचा यक्ष.’*

*‘वऱ्हाड हे मायबाईचे माहेर. एका विरही जीवाचे विश्रांतीस्थान. सहजच तिथल्या जानपद भाषेत माहेरचा गोडवा अन् विरहाची व्याकुळता हे दोन्ही भाव एकवटलेले आहेत. अतिशय लाघवी, मृदू, थोडी हेल काढून बोलली जाणारी वऱ्हाडी हे मायबोली मराठीचे एक भूषण आहे.*



# पद्मा

*'सम्राट जयदेवाकडे वळले. एखाद्या पाषाणप्रतिमेप्रमाणे जयदेव पद्मेचं शरीर मांडीवर घेऊन बसला होता. त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि सद्गदित होऊन म्हणाले, ''प्रिय सुहृद, मी काय बोलून तुमचे समाधान करू? चला आता! पद्मादेवींचा अंत्यसंस्कार आमच्या दहनभूमीवर होईल! उठा!''*

*जयदेव वेड्यासारखा बोलला, ''उठू? का?''*

*''मृत देहास कुठवर धरून ठेवणार?''*

*''कोण मृत झाले आहे? ती पद्मा? नाही? ही तर केवळ झोपली आहे! परवाच तर रात्री ही माझ्या कुशीत शिरून मला म्हणाली की, आता लवकरच आपले बाळ जन्मास येणार आहे! ही कशी मरेल? सम्राट आपण असे अभद्र काय बोलता?''*

*तर मग पद्मा गर्भवती होती! सम्राटांच्या नेत्रात पटकन् पाणी उभे राहिले. तोच पद्माचे प्रेत उचलून जयदेव उभा राहिला आणि उन्मत्तासारखा बाहेर पळत सुटला!*

*शेवटी जयदेव जगन्नाथाच्या मंदिराकडे वळून मंदिरात पोचला. तिथे गेल्यावर त्याने आपल्या प्रिय सखीचे ते शव गाभाऱ्याच्या दारात ठेवले आणि तिला हाका मारीत तो तिच्या शेजारी बसला.*

*एकदम जयदेव उठला. तो म्हणाला, ''अरे! सखी, आता तुझ्या कृतक् कोपाचे कारण कळले!''*

*''परवा आठ दिवसांपूर्वी तू मला म्हणाली होतीस, की मी तुमचे भजन ऐकू इच्छिते! मला तसे डोहाळे होताहेत! त्याकरता रुसलीस होय?''*

*''सखी ऐक माझे भजन!''*

*जयदेव उन्मत्त होऊन गाऊ लागला. 'चन्दनचर्चित नीलकलेवर पीत वसन वनमाली!'*

*केलिचलन्मणि कुण्डल मण्डित गण्डयुगः स्मितशाली!!*

*तो गात होता. त्याचा स्वर कंपित होऊन सभामंडपाच्या भिंतीची मर्यादा सोडून पलिकडे जाऊ लागला. त्या स्वरात पाषाणाला पाझर फोडणारी आर्तता होती. त्या स्वरात वज्रातून पाणी ठिबकविणारा करुण रस साठवलेला होता.*

*गाता गाता त्याच्या नेत्रातून आसवे वाहू लागली.*

*'तव करकमलवरे नखमद्‌भुतशृंगं!'*

*दलित हिरण्यकशिपुतनुभृंगं!*

*केशव धृत नरहरिरुप जय जगदीश हरे!!*

गाता गाता त्याचा स्वर इतका चढला की, लोकांना वाटले आता हा स्वर फुटणार! त्यातली आर्तता लोकांची मने व्यापून राहिली.

जयदेव थांबला. तो रडू लागला. पद्मेजवळ जाऊन तो म्हणाला, ''पद्मे! सखी! आता गाववत नाही! शक्ती संपत चालली! कालपासून भुकेला आहे गं! मृगया लवकर संपवून तुझ्या भेटीच्या लालसेने धावत धावत आलो! आता गाववत नाही! स्वर तोकडा पडला! सखी! उठ गं! भजनात अंतराय निर्माण होतो! पद्‌मे ग!''

आणि अकस्मात लोकांनी पाहिले की –

पद्‌मेच्या शरीरात प्राण संचारू लागला! ती श्वासोच्छ्‌वास करू लागली! एका निमिधार्षात ती उठून बसली आणि जयदेव म्हणत असलेले गीत ती आपल्या अत्यद्‌भुत स्वरांत गाऊ लागली! 'तव करकमलवरे नखमद्‌भुतशृंगं दलित हिरण्यकशिपुतनुभृंगं'

*लोक आनंदाने उन्मत्त झाले! ते गर्जना करू लागले.*

*"जय जयदेव, जय पद्‌मादेवी!"*

*महंत पुढे झाले. त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहात होते! त्यांनी एका कुशीत जयदेवाला घातले, दुसऱ्या कुशीत पद्‌मेला.*

ते म्हणाले,

*"धन्य जयदेव! धन्य पद्‌मा!*

*जोपर्यंत जगन्नाथमूर्ती आहे, तोपर्यंत तुमचे नाव लोक विसरणार नाहीत!"*

*पुन: एकदा लोक गर्जले, "जय जयदेव! जय पद्मादेवी!"*

स्वर्गीय आप्पांच्या चतुरस्त्र लिखाणाचा प्रत्यय आणून देणारी ही एक अद्‌भुत कादंबरी 'पद्मा'. 'गीतगोविंद' कार जयदेव आणि त्यांची सुविद्य पत्नी पद्मादेवी यांच्या एकमेकांवरील आणि त्या दोघांच्या श्रीकृष्णावरील प्रेमाचे अर्थपूर्ण दर्शन घडविणारी कादंबरी 'पद्मा'. एक गरीब, पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मण कुटुंबातला विद्वान, पंडित, सश्रद्ध व हळुवार कवीमनाचा मुलगा जयदेव व एका संपन्न ऐश्वर्ययुक्त घरात वाढलेली, पण विरागी वृत्तीची, धनकांचनाचा लोभ नसलेली, सश्रद्ध आणि मोठ्या मनाची मुलगी, पद्माची ही कथा. स्वत:च्या

विद्वत्तेच्या जोरावर मिळू शकत असलेले सारे मानसन्मान, समृद्धी, ऐश्वर्य बाजूला सारून पाठशाळेत विद्यार्थ्यांना शिकवण्यात रमलेला जयदेव, स्वतःच्या सौंदर्याचा यत्किंचितही अभिमान न बाळगता, स्वतःच्या पूर्वायुष्यातील वैभवाविषयी जरासाही अहंकार मनात न येऊ देता पतीच्या लोकोत्तर कार्यात स्वतःला झोकून देणारी, पाठशाळेत पडेल ते काम करण्यात धन्यता मानणारी पद्मा, या जगावेगळ्या पतिपत्नीच्या चिरंतन प्रेमाची ही कहाणी. सश्रद्ध, भक्तीयुक्त अंतःकरणाने श्रीकृष्णाची भजने गाणे हाच या दोघांचा विरंगुळा. जगावेगळे पति-पत्नी म्हणण्याचं कारण असं की, भौतिकसुखोपभोग, अप्पलपोटेपणा, परिग्रह आणि नास्तिकता ही आजकालच्या संसाराची चतुःसूत्री. अशा स्थितीत, वैराग्य, अध्यात्म, अल्पसंतुष्टता आणि सामाजिक समस्यांची जाण या चतुःसूत्रींवर आधारून जीवन जगणारं जयदेव आणि पद्माचं दाम्पत्यजीवन हे खरोखर जगावेगळं. 'व्यवहाराची' कास धरून स्वतःच्या नवऱ्याच्या दुर्गुणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून नास्तिकतेच्या पायावर स्वतःच्या संसाराची 'अर्थपूर्ण उभारणी करू इच्छिणाऱ्या स्त्रिया व शारीरिक सौंदर्याची भुरळ पडून, कोत्या मनाच्या

बायकांशी धनाच्या लालसेने विवाह करणारे पुरुष ही आजच्या प्रगत संस्कृतीची प्रतीके.' या पार्श्वभूमीवर किंबहुना या वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या संपन्न इतिहासातलं जयदेव-पद्माचं हे जोडपं म्हणूनच जगावेगळं. दूरदर्शनला देव मानून सिनेमातल्या नटनट्यांना देवदूत मानणाऱ्या आजच्या पिढीकडून कोणत्या प्रेमाची आणि आदर्शाची अपेक्षा बाळगणार? 'त्याग' हा भारतीय परंपरेतील प्रेमाचा आधार आणि 'भोग' हा पाश्चिमात्य परंपरेतील प्रेमाचा उत्कर्षबिंदू.

*'प्रेम ना ये-दाविता, ना सांगता, ना बोलता! अनुभव चित्ता चित्त जाणे!'*

असे सांगणारे आमचे कवी आणि दिवसाकाठी पन्नासवेळा 'आय लव्ह यू' म्हणून एकमेकांच्या कानात ओरडणारे पाश्चिमात्य, हा मेळ कसा बसावा? म्हणून आमच्या प्रेमाचं 'दर्शन' घ्यावंसं वाटतं आणि त्यांच्या प्रेमाचं, 'प्रदर्शन' होतं. पण प्रदर्शनालाच सर्वस्व मानणाऱ्या आजच्या 'सुशिक्षित' पण 'असंस्कृत' पिढीकडून कोणत्या प्रेमाची अपेक्षा बाळगणार? एकमेकांच्या वैयक्तिक अहंकाराचा होम करून, एकमेकांच्या उत्कर्षासाठी झटणारी, एकमेकांच्या सहाय्याने साऱ्या समाजाचा विचार


करून आपल्या मनाच्या मोठेपणाच्या कक्षा माणसांपर्यंत नव्हे, तर पशुपक्ष्यांपर्यंत वाढवत नेणारी आमची विवाह परंपरा, पण अर्धवट शिक्षणाने, कर्तृत्वशून्य अहंकाराने, स्त्रीमुक्तीच्या वेडगळ कल्पनांनी किंवा पुरुषप्रधान संस्कृतीच्या खुळचट रुढींनी या विचारपूर्वक निर्माण केलेल्या विवाह परंपरेची मुळातली चौकटच उखडून टाकल्याने आजकाल विवाह हा एक प्रदर्शनीय, दिखाऊ सोहळा ठरल्याने दिवसेंदिवस तो टाकाऊ ठरत गेल्यास नवल ते काय?

तात्कालिक गरज भागविण्यासाठी केलेल्या तडजोडी, भावनेच्या भरात घेतलेले निर्णय, दूरदृष्टीचा अभाव, वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी जोडीदारांचा घेतलेला आधार, त्यासाठी केलेली त्याची किंवा तिची शारीरिक, मानसिक अथवा आर्थिक पिळवणूक, महत्त्वाकांक्षांच्या पूर्तीनंतर जोडीदाराचे श्रेय विसरण्याचा कृतघ्नपणा, एकमेकांच्या व्यवसायवृद्धीसाठी एक व्यावसायिक दृष्टिकोन मनात बाळगून एकमेकांच्या मुलामुलींचे लावलेले विवाह, स्वत:विषयी अथवा स्वत:च्या घरच्यांविषयी फाजील अभिमान मनात बाळगून त्याने अथवा तिने केलेले जोडीदाराचे अथवा त्यांच्या घरच्यांचे अपमान

आणखी असे बरेच काही ही आजच्या विवाह संस्थेची वैशिष्ट्ये. या पार्श्वभूमीवर आमच्या इतिहासातील ‘जयदेव-पद्मा’, ‘माधव-रमा’ ही उदाहरणे हा एक कल्पनाविलास नसून तो या देशाचा इतिहास आहे, ती या देशाची परंपरा आहे हे आवर्जून सांगण्यासाठीच तर स्व. गोनीदांनी ही कादंबरी लिहिली असेल काय? अक्षय, उदात्त, चिरंतन प्रेमाचा साक्षात्कार नव्या पिढीला घडवण्यासाठीच आप्पांनी हा घाट घातला असणार.

या संदर्भात एका साहित्यिकाने केलेली एक नोंद आठवते. ‘मोठ्या मनाच्या माणसाला जर मोठ्या मनाची पत्नी मिळाली नाही तर ते नुकसान त्याच्या एकट्याचे नसून साऱ्या समाजाचे असते.’ आणि हे शब्दशः खरे आहे.

या पार्श्वभूमीवर जयदेव-पद्मा, नल-दमयंती, हरिश्चंद्र-तारामती, माधव-रमा, शिवाजी महाराज-सईबाईसाहेब ही सारी उदाहरणे केवळ अद्वितीयच नव्हे तर अनुकरणीय म्हणावी लागतील.



# उडोनि हंस चालला

*'मधुर स्मृतीत बुडून गेलेला बाहुक अचानक भानावर आला. अर्धे काषायवस्त्र परिधान केलेली एक शोकमूर्ति वियोगिनी मंद पावलांनी कक्षात येत असलेली त्याने पाहिली. त्याचे सर्वांग थरारले. तो ठाईच खिळल्यासारखा उभा राहिला-जणू मंत्राने भारलेला. त्याच्या डोळ्यांत अश्रूंनी इतकी गर्दी केली की, त्याच्या समोरचे दृश्य अंधुक झाले. त्याला ऐकू येऊ लागले केवळ शब्द. जे जणू खोल गुहेमधून येत आहेत -'*

*"हे भद्र पुरुष! ज्याने घोर अरण्यात आपल्या मांडीवर मस्तक ठेवून शयन केलेल्या आपल्या निरपराध प्रिय भार्येचा निष्ठुरपणे त्याग केला आहे-असा महाधर्मज्ञ वीर आपण कुठे पाहिला आहात काय?"*

*"कसं ते अरण्य?" जिथे चहूबाजूंनी किर्र शब्द जणू गिळायलाच येतो आहे -*

*"जिथे प्रतिक्षणी भयानक श्वापदांचे भय आहे. जिथे वायूही मुक्त मनाने पाऊल घालू शकत नाही. अशा ठिकाणी श्रांत झालेली भार्या - नाना आपत्तींनी गांजलेली तीन चार दिवस*

अन्न न मिळाल्याने गळून गेलेली - अशाही स्थितीत त्या हतभागिनीचा ज्या धैर्यशील पुरुषाने त्याग केला - तो आपण कुठे पाहिलात काय?'' आसवे पुशीत नल म्हणाला, ''पुरे दमयंती! अपराधी तुझ्यासमोर उभा आहे!''

''मात्र तो पूर्वीचा नव्हे, तर नाना कष्ट भोगून, नाना यातना सहन करून ज्याने शरीरात शिरलेला कलि जिंकला आहे –

आणि जो केवळ तुला भेटण्यासाठी - एखाद्या वेड्यासारखा केवळ एका दिवसात अयोध्या ते कुंडिनपूर एवढे प्रचंड अंतर पळाचाही विसावा न घेता तोडून आला आणि हे पाहण्यासाठी की आपल्या दुसऱ्या स्वयंवरात दमयंती कुणाच्या गळ्यात आपली वरमाला घालते!''

ते शब्द ऐकताच दमयंती भूमीवर कोसळणार होती. पण तिने मोठ्या प्रयत्नांनी स्वत:ला सावरले. मग ती मंद स्वरात म्हणाली, ''देव, आपण अयोध्येत आहात असे जेव्हा मी ऐकले, तेव्हा आपल्या अश्वसंचालन कौशल्यावर विश्वास असल्यामुळेच आपल्याला इथे आणण्यासाठी ते कृतक साहस योजले होते.'' एरवी ''प्रत्यक्ष स्वर्गीच्या देवतांना अव्हेरून मी

*तेव्हा आपल्या गळ्यात वरमाला घातली नव्हती काय?'' मग अचानक तिचा स्वर स्थिर झाला. निश्चयी शब्दांत ती म्हणाली ''ते काही का असेना, माझ्या पतीदेवांना पाहायची माझी मनोकामना, जी मी त्या तसल्या निबिड वनातून वेडीपिशी होऊन भटकत असताही उराशी बाळगली होती - ती माझी एकमेव इच्छा आता पूर्ण झाली आहे.''*

*''आता मला सुखेनैव मृत्यू येवो!''*

*''जर माझ्या मनात आपणावाचून कुण्याही परपुरुषाची कामना - छी! असा ओंगळ विचार!''*

*''पण तो आता बोलून टाकलाच पाहिजे! तर ते किल्मिष जर माझ्या अंतरी उभे राहिले असेल तर मग - ''*

*''हा सर्वसंचारी वायू याच क्षणी माझे प्राण हरण करो!'' त्या निर्धारवतीने हे शब्द म्हटले आणि आपले शरीर धरणीवर अक्षरश: टाकून दिले. तत्क्षणी सुगंधी वायू वाहू लागला. कक्षेबाहेर असलेल्या पुष्पवेलींवरून पुष्पांचा वर्षाव झाला. सगळी शुभचिन्हे प्रकट झाली.*

*बाहुकरूपी नल धावत पुढे गेला आणि त्याने त्या आपल्या वियोगिनी प्रियेला उचलून छातीशी धरीत म्हटले,*

*“दमयंती, अगे दमयंती! मी तुझा प्रियकर नल आलो आहे!”*

दुष्यंत-शकुंतला, अर्जुन-सुभद्रा, हरिश्चंद्र-तारामती यासारख्या भारताच्या उज्ज्वल इतिहासातील पराक्रमी वीर आणि पतीव्रता साध्वी यांच्या अनेक जोडप्यांपैकी एका जोडप्याची नल-दमयंतीची ही कथा.

निपुत्रिक असल्याने विदर्भाचा सम्राट असूनही दुःखी असलेला राजा भीमक. महर्षि दमनांच्या आशीर्वादाने त्याला झालेली कन्यारत्नाची प्राप्ती. स्वर्गीय अप्सरांनाही जिच्या सौंदर्याचा हेवा वाटावा अशी ती रूपवती, गुणवती कन्या दमयंती. तिच्या सौंदर्याचा सर्वदूर पसरलेला सुगंध पाहून तिच्या प्रेमात पडलेला निषधाधिपती नल.

एका राजहंसाकरवी त्याने दमयंतीस पाठवलेला प्रेमाचा संदेश. तो संदेश मिळताच नलाच्या सौंदर्याची, पराक्रमाची आणि प्रजावात्सल्याची कीर्ती ऐकून त्याच्यावर अनुरक्त झालेली दमयंती. पुढे भीमकाने दमयंतीचे स्वयंवर रचल्यावर स्वयंवराला निघालेला असताना दमयंतीच्या अभिलाषेने स्वयंवराला निघालेले इंद्र, अग्नि, वरुण व यम जेव्हा नलाला पाहून त्याच्याकरवी

दमयंतीला संदेश पाठवतात तो प्रसंग. ऐन स्वयंवराच्या वेळेला या चारही देवांनी दमयंतीची घेतलेली सत्त्वपरीक्षा, आपल्या श्रद्धेच्या आणि नलावरील अतूट प्रेमाच्या जोरावर दमयंतीने त्या परीक्षेत उत्तीर्ण होणे, चारही देवांनी प्रसन्न होऊन नलाला दिलेले विविध वर या जोडप्याला दिलेला आशीर्वाद, स्वयंवरासाठी निघालेले पण पोहोचण्यास उशीर झाल्याने दमयंतीची प्राप्ती न करून घेऊ शकलेले कलि आणि द्वापर, काहीही करून नलाला आचारभ्रष्ट करून त्याच्या आणि दमयंतीच्या संसारसुखात विष कालविण्याची प्रतिज्ञा घेतलेला कलि, त्याला त्याच्या प्रयत्नात आलेले यश. नलाच्या भावाकडून, पुष्कराकडून नलाला द्यूत खेळण्यासाठी आमंत्रित करून द्यूतात नलाला हरवून त्याला निष्कांचन करण्यात यशस्वी झालेला कलि. नल-दमयंतीच्या दुर्दैवाने सुरू झालेले दशावतार. निषधाधिपती नलाचे व विदर्भ राजकन्या दमयंतीचे एका वस्त्रावर, उघड्या आकाशाखाली रात्र काढणे. दुसऱ्या दिवशी राज्य सोडून घोर वनात निघून जाणे. भूक सहन न होऊन पक्षी धरण्यासाठी अंथरलेले अंगावरचे एकमेव वस्त्र पक्ष्यांनी घेऊन उडून जाणे. या सर्व प्रकारांना कंटाळून तशा घोर

वनात आत्यंतिक निराशेपोटी नलाने केलेला दमयंतीचा त्याग. दमयंतीने नलाच्या शोधासाठी केलेले प्रयत्न, सोसलेले अपमान, नलाने अयोध्येच्या राजाकडे अश्वपरीक्षक म्हणून केलेली नोकरी आणि शेवटी दमयंतीने नलाचा घेतलेला शोध आणि त्या दोघांचे पुनर्मिलन असा सारा रोमांचक आणि करुणेने भरलेला घटनापट डोळ्यांसमोरून उलगडून दाखविणारी ही अद्‌भुत कादंबरी 'उडोनि हंस चालला.'

आपल्या साऱ्या पौराणिक आणि ऐतिहासिक कथांभोवती अद्‌भुत आणि चमत्काराचे वलय असल्यामुळे या साऱ्या कथा आपल्याला काल्पनिक वाटतात व केवळ त्यामुळेच आपण त्यांच्याकडे गांभिर्याने पाहत नाही. क्षणभर हे जरी गृहित धरले की, या कथा काल्पनिक आहेत तरी या कथांमध्ये असलेली उच्च साहित्यिक मूल्ये, त्यांची लोकोत्तर वाङ्‌मयीन पातळी, इतकी वर्षे जनमानसावर अधिराज्य गाजविण्याची त्यांची क्षमता, त्यांच्या रचनेतील प्रासादिकता, माधुर्य, रसनिष्पत्ती हे काही दुर्लक्ष करण्यासारखे नाही. उलट त्यातील विविध व्यक्तिरेखांच्या भावभावनांचे मिश्रण, त्यांचे प्रकटीकरण, साऱ्या समाजापुढे एक आदर्श ठेवण्याचा त्यांचा अट्टाहास म्हणजेच

त्यामधून होणारे सामाजिक संस्कार हा एक अभ्यासाचा विषय आहे.

काळाच्या ओघात आणि ऐतिहासिक संशोधनाच्या उजेडात या साऱ्या कथा, ही पुराणे ही काल्पनिक नसून सत्य आहेत, ती या देशाचा लिखित स्वरूपातला वाङ्मयीन इतिहास आहे, या साऱ्या गोष्टी स्पष्ट आणि सिद्ध होत आहेत.

इतिहासाची एक फार सुंदर व प्राचीन व्याख्या आहे.

*'धर्मार्थकाममोक्षांणा उपदेश समन्वितं ।*


*पुर्ववृत्तं कथायुक्तं, इतिहासं प्रवक्षते ।।'*

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे मानवी जीवनातले चार पुरुषार्थ, सारं मानवी जीवन या पुरुषार्थांभोवती घोटाळणारं. या चारही पुरुषार्थांविषयीचा उपदेश ज्यामध्ये असतो व जो पूर्ववृत्त कथन करणारा व कथायुक्त असतो त्यास इतिहास म्हणावे अशी ही व्याख्या.

खरे तर या व्याख्येच्या कसोटीवर आपली सारी पुराणे घासून पाहिली तर ती पुरेपूर कसाला तर उतरतीलच पण त्यांची रचनाच या व्याख्येबरहुकूम झाल्याचे आपल्या लक्षात येईल. अशा स्थितीत आमच्या देशाला इतिहासलेखनाची

परंपराच नव्हती असे म्हणणे किती वेडेपणाचे आहे.

एका राज्याचा अधिपती असूनही नलाला व एका राज्याची राजकन्या व एका राजाची राणी असूनही दमयंतीला सोसावे लागलेले हाल, अपेष्टा, मानहानी, अपमान हे सारं आपल्या कल्पनेपलीकडचं आहे. एवढं सोसूनही त्या दोघांचं एकमेकांवरचं अभंग राहिलेलं प्रेम, एकमेकांच्या शोधासाठी आणि प्राप्तीसाठी त्यांनी घेतलेले कष्ट हे केवळ आप्पाच वर्णन करू जाणे. जीवनातील सारी दु:खं, सारी करुणा ज्यांनी स्वत: अनुभवली, भोगली त्या आप्पांशिवाय हे सारं लिहिण्याची ताकद कुणा लेखकात असणं शक्य आहे? हरिश्चंद्रासारखी, नलासारखी, जयदेवसारखी असंख्य नररत्ने ज्या आमच्या दिव्य परंपरेत जन्मली व स्वत:च्या कर्तृत्वाचा एक आदर्श जगासमोर ठेवून गेली त्या परंपरेला व त्या परंपरेचे पाईक म्हणवून घेण्यात व तिचे साक्षेपी वर्णन करण्यात धन्यता मानणाऱ्या स्वर्गीय आप्पांना त्रिवार वंदना!!



# अजून नाही जागे गोकुळ

*"किती जन्मवेरी वाटचाल करावी लागली!"*

*"कसा कंटाळवाणा अथक प्रवास!"*

*"कुठे सावली नाही, कुणी सोबत नाही, संगी साथी नाही. कुठे थांबू म्हटले तर ते शक्य नाही. चालले पाहिजे, पाऊल उचलले पाहिजे!"*

*'जन्म-मरणांचे दारवंटे ओलांडले पाहिजेत. संवत्सरांची पाने उलटली पाहिजेत. ऋतुचक्राच्या भोवंडीतून गरागरा फिरले पाहिजे. मास आणि पक्षाची आवर्तने उलगडली पाहिजेत.' 'कामक्रोधांचे चपेटे सोसले पाहिजेत. लोभममतांच्या दरडी ओलांडल्या पाहिजेत. अहंकार-दंभांचे मुखवटे ल्याले पाहिजे. मायाप्रवाहातून भिजून ओले झाले पाहिजे.'*

*'गर्भकोशात राहायच्या यातना साहिल्या पाहिजेत. मरणकाळींच्या वेदना वाहिल्या पाहिजेत. स्नेहसंबंधाचे पाश पसरले पाहिजेत. अपमानांचे भार विसरले पाहिजेत!"*

*'अरे, हे सगळे करावे लागले, श्रीहरि! यातला एकही वसौटा चुकला नाही या हिशोबातला प्रत्येक दाम वळता*

*करून घेतलास! तू असा कृपण की, काहीच सूट दिली नाहीस!'*

*'शेवटी शरीर दिलेस ते तीन ठिकाणी वाकडे! काय तुझ्याजवळ शरीराचा दुष्काळ पडला होता?'*

*'पण तू आपले ते खरे केलेस! भला तू कवडीचुंबक! पुरते घेतल्याशिवाय काही दिले नाहीस!'*

*'सारा जन्म छळून घेतलेस आणि आता लाडीगोडी लावायला आलास!'*

*'पण मी सावध झाल्ये आहे! सहजगत्या फसायची नाही!'*

*'तू पक्का खेळीया, नाना खेळ खेळण्यात प्रवीण.'*

*'पण मी भुलायची नाही.'*

*'हाती सापडलास, आता सोडायची नाही.'*

*'शरीराचे काय कौतुक? अशी लक्ष शरीरे तुजवरून ओवाळून टाकावीत! हे सगळ्यांनी घृणा केलेले, निंदिलेले, हेटाळलेले, चेष्टा केलेले शरीर ते मला नको!'*

*'मला हवे आनंदमय शरीर! चैतन्यमय देह हवा आहे मला!'*

*'तो मी तुजकडून हट्ट करून मागून घेईन!'*

*‘आणि मग साती स्वर्गाची दारे उघडून पैल चालून जाईन.’*

*‘जिथे जरा नाही, मरण नाही, बंधन नाही, कर्म नाही, अकर्म नाही’ अशा त्या सत्स्वरूपात मी विहरत राहीन.*

*‘मानससरोवरी हंस विहरतात तशी!’*

*‘महासागरात मीन क्रीडा करतात तशी!’*

*‘गगनमंडली’ गरुड झेपावतात तशी!*

*‘हे तीन ठिकाणी वाकडे शरीर इथेच टाकून आता अशी मी गगनाकार होईन!*

*‘श्रीरंगा, खूप घेतले आहेस! आता त्याचा मोबदला म्हणून एवढे हे दिलेच पाहिजेस! त्याशिवाय तुला दुसरी गति नाही रे श्रीहरी!’*

‘व्यथा, अनादि कालापासूनची. तिला’ अशी छोटीशीच पण अर्थपूर्ण अर्पणपत्रिका लिहून आप्पांनी महाभारतातील एका दुर्लक्षित व्यक्तिमत्त्वावर, कुब्जेवर लिहिलेली ही कादंबरी ‘अजून नाही जागे गोकुळ’.

कीर्तीच्या शिखरावर असलेली मधुरा नगरी. वैभवाने आणि समृद्धीने नहात असलेली. वयोवृद्ध राजा उग्रसेन. त्याचा दुराचरणी पुत्र कंस. उग्रसेनाच्या अकलंक वैभवाला लागलेला

एक कलंक. त्याने कपटाने उग्रसेनाला बंदिवासात टाकून हस्तगत केलेली सत्ता. उग्रसेनाच्या सगळ्या समर्थकांना एकेक करून कत्तल करीत आपला मार्ग निष्कंटक करीत चाललेला कंस. एकामागे एक शिरकाण करीत कंस कालिंदीच्या घरात पोचला. कालिंदी, मालिनीची कन्या, महाराज उग्रसेनांची दासीपुत्री. तिचं मूळचं कालिंदी हे नाव केव्हाच विस्मरणात गेलेलं. तिच्या वाकड्या शरीरामुळं आणि कुरुप रूपामुळं सारी मथुरा नगरी तिला कुब्जा म्हणून ओळखत असलेली. कुब्जेच्या डोळ्यांदेखत कंसानं तिच्या आईचं मालिनीचं शीर धडावेगळं केलं. दुसऱ्या दिवसापासून कुब्जा आपल्या आईच्या कामावर रुजू झाली. तिचं काम होतं, ज्या कंसानं तिच्या डोळ्यांदेखत तिच्या आईचा शिरच्छेद केला त्या कंसासाठी रोज चंदन उगाळून द्यायचं. कुब्जेच्या दुर्दैवी आयुष्यातील तो कसोटीचा कालखंड होता. कंसाचे अत्याचार दिवसेंदिवस वाढतच होते. येणारा प्रत्येक नवा दिवस कुब्जेसाठी नवी व्यथा घेऊन जन्माला येत होता. ही अत्याचारी राजवटीची काळरात्र केव्हातरी संपेल एवढ्या एकाच आशेवर कुब्जा आपल्या वाकड्या शरीराचे ओझे वागवीत, मथुरावासियांची

चेष्टा, अवहेलना, अपमान सहन करीत दिवस पुढे ढकलीत होती. आणि एक दिवस गुणकाने कंसाच्या माळ्याने, तिला नारदांची भविष्यवाणी येऊन सांगितली. कंसाच्या राजवटीचा अंत होणार आणि तो देवकीच्या पुत्राच्या हातून, हे कळताच कुब्जेच्या जीवनाला एक नवा उद्देश मिळाला. एक नवी दिशा मिळाली. त्या क्षणापासून ती त्या देवकीपुत्राच्या स्वागतासाठी सज्ज झाली. कंसाने देवकीला टाकलेल्या बंदिवासातील इमारतीभोवती ती ऊन-पाऊस कशाचीही पर्वा न करता अविरत चकरा मारू लागली. पहिल्या सात वेळेस तिला ऐकायला मिळाल्या फक्त कंसाने मारलेल्या देवकीच्या पुत्रांच्या किंकाळ्या. जन्माष्टमीच्या रात्री मात्र कोसळणाऱ्या पावसात झालेल्या कृष्णजन्माची आणि त्या चिमुकल्या जीवाच्या गोकुळ प्रयाणाची साक्षीदार होती कुब्जा. पुढे कंसाने गोकुळावर पाठवलेल्या पुतनेशी तर चक्क ती एखादे युद्धच खेळली. तिच्याकडे दूध घालायला येणाऱ्या गोकुळातल्या गौळणींकडून तिला गोकुळातील त्याच्या बाळलीला कळत असत. केव्हातरी त्याला एकदा डोळे भरून पहावे अशी तिची इच्छा होती. अशीच एकदा धीर करून पौर्णिमेच्या रात्री भांडीर वटाखाली चालणाऱ्या

रासक्रीडेत भाग घेऊन कृष्णाला एकदा डोळे भरून पहावे म्हणून कंसाच्या पत्नीचे, अस्तिचे दागिने उसने आणून ते आपल्या शरीरावर लेवून कुब्जा गोकुळात जाऊन पोहोचली. परंतु कृष्ण येण्याआधीच तिथे जमा झालेल्या गौळणींनी तिला अवदसा समजून मरेस्तोवर मारले आणि तिची नजर कृष्णावर पडू नये म्हणून यमुनेच्या काठी हाकलून दिले. असह्य वेदनांनी कण्हत असलेली कुब्जा यमुनेकाठी पडून होती. तिने अवघ्यांना क्षमा करीत हा देह यमुनेत अर्पण करायचे ठरवले. त्या निश्चयाने ती पाय ओढीत नदीजवळ गेली, पाण्यात शिरली तो तिच्या कानावर पडली श्रीकृष्णाची मुरली. तो घननीळ तेवढ्या रात्री यमुनेच्या पलिकडे बसून तिच्यासाठी; हो केवळ तिच्याचसाठी मुरली वाजवत होता. मुरलीतून उठणारा प्रत्येक स्वर तिच्या साऱ्या वेदना शमवीत होता. एक नवी तृप्ती साऱ्या अंगाअंगातून अनुभवास येत होती. आधिभौतिक तृप्ती, आधिदैविक तृप्ती, आध्यात्मिक तृप्ती. बस्स, कुब्जेने ठरवले. तो जर केवळ आपल्यासाठी एवढ्या रात्री धाऊन आला तर आता आपणही त्याची वाट पहायची आणि एक दिवस तो गोकुळ त्यागून मथुरेत आला. धनुर्यागाच्या निमित्ताने कंसाचे

आव्हान स्वीकारून साऱ्या मथुरावासीयांचे स्वागत स्वीकारत तो कुब्जेच्या दरवाजात येऊन म्हणाला,


*'मी आलो आहे.' कुब्जा चंदन उगाळीत होती. श्रीहरीने तिच्यासमोर बसून तिच्याकडून सर्वांगाला चंदन लावून घेतले. तो निघताच कुब्जा त्याला म्हणाली, "या जर्जर शरीरात येऊन जेवढे मिळायचे, तेवढे सारे मिळाले आहे." देह संपवायची भाषा करणाऱ्या कुब्जेला श्रीहरी म्हणाला, "थोडी थांबशील?" "किती" कुब्जेने विचारले. "अन्यायाचे माप उलंडले असे ऐकेपर्यंत?" कृष्ण म्हणाला. "तुझी आज्ञा," कुब्जा उत्तरली.*

*धावत धावत येऊन गुणकाने कंसवधाची बातमी कुब्जेला सांगितली. खुंटीला हात देऊन ताटकळत उभ्या असलेल्या कुब्जेने ती बातमी ऐकली आणि ती निष्प्राण होऊन गुणकाच्या अंगावर कोसळली.*

निरलस सेवाभाव, एखाद्या ध्येयापोटी जीव जाईतोपर्यंत कष्ट उपसण्याची मानसिक तयारी, जीवनातल्या अंतिम सत्यावर असलेली अविचल निष्ठा आणि प्रतिकूल परिस्थितीतही अंतरात्म्याच्या आवाहनानुसार सात्त्विक वर्तणुकीची कास न

सोडता केलेले अथक परिश्रम ही कुब्जेच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये. काही सन्माननीय अपवाद सोडता साधारणतः कुब्जेसारखा शारीरिक व्यंग असलेला माणूस आजकाल लोकांच्या दयेवर भीक मागून जगताना, समाजाच्या सहानुभूतीची अपेक्षा करताना आढळण्याची शक्यता जास्त. पण याउलट कंसासारख्या दुरात्म्याच्या घरी सेवा करूनही श्रीकृष्ण परमात्म्यावर नितांत श्रद्धा, भक्ती असणारी, त्याच्या मथुरेत येण्याची वाट पाहणारी, त्याच्या जन्मवेळेपासून स्वतःच्या मृत्यूपर्यंत आपले भावविश्व त्याच्या अस्तित्वाला समर्पित करणारी अलौकिक कुब्जा केवळ आप्पांच्या प्रयत्नामुळेच तुम्हा-आम्हाला समजू शकली.

स्व. आप्पांनी या तीन ठिकाणी वाकड्या आणि कुरूप कुब्जेला आध्यात्मिक विचारांचे आणि श्रद्धा, भक्तींचे अलंकार घालून असे काही सजवले आहे की कुणीही तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात पडावं आणि तिच्यासारखं सर्वस्व श्रीहरीला अर्पण करून कृष्णमय होऊन जावं.



# श्री कर्णायन

*'कुरुक्षेत्राच्या पूर्वभागातील एका विस्तीर्ण वटवृक्षाखालील एक शिबीर. एकांत. शांत.'*

*तिथे कर्ण राहिला आहे. आपल्या योद्धयांसह. सगळ्या कुरुक्षेत्राचा भाग उभय सेनांनी व्यापला आहे. रथांच्या चहू दिशास धावण्यामुळे आकाशावेरी धूळ उडत्ये आहे. तिच्याआडून नाना ध्वज डोकावताहेत. अनेक वर्णांचे आणि आकारांचे.*

*त्या धुळीतून शंखनाद, रणभेरीचे दडदड आवाज, शिंगे आणि कर्णे यांचे तुमूल घोष वारंवार आकाश भेदीत वर उठताहेत. वीर परस्परांना आव्हाने देत आहेत. त्यांचे ध्वनी विरत विरत अस्पष्ट होऊन इथपर्यंत पोचताहेत. या कोलाहलाने भिऊन जाऊन कुरुक्षेत्रातल्या झुडुपांमधून दडून राहिलेले ससे आणि हरीण कर्णाच्या शिबीराचा आश्रय घेत आहेत. पण त्यांच्यावर हात उचलावा असे देखील कर्णाच्या मनी उमटत नाही. त्याचे मन रिते आहे, आकाशासारखे. वीरांची आव्हाने ऐकून ते उत्तेजित होत नाही. शंखध्वनी ऐकून ते उत्तेजित होत नाही.*

धनुष्यांचे टणत्कार ऐकून ते थरथरत नाही.

रिते केवळ रिते -

कर्णाभोवती इतका अवर्ण्य गोंधळ झाला आहे की, त्यामधून त्याला पलिकडचे दिसत नाही.

राधेय कर्ण

कौंतेय

दुर्वासांचा मानसपुत्र

सूर्याचे अपत्य

भीमार्जुनांचा ज्येष्ठ भ्राता

दुर्योधनाचा सखा

पण्डुकुलभूषण

कौरवांचा हितैषी

अर्जुनाचा वध करण्यासाठी शपथबद्ध

आणि त्याचा थोरला भाऊ

काळोख्या रात्री जन्म

जन्मगत स्वर्णमय कवचकुंडले

अश्व नदीत जन्मताक्षणी केलेला तो अद्‌भुत प्रवास

मकर मत्स्यांच्या संगतीने

*कुण्याही क्षणी एखाद्या जलचराच्या उदरी सामावण्याची शक्यता...*

*छे! छे! इतक्या विविध भूमिका आपण एकट्याने वठविल्या आहेत यावर करर्णाचा विश्वासच बसत नाही. त्याला साधे, सरळ जीवन हवे आहे. इतर चार मानवांसारखे. रांगेच्या प्रवाहासारखे स्थिर. तरंगशून्य. निरलंकृत.*

*उर्ण वस्त्रांतल्या सरळ धाग्यासारखे. या निरामय जीवनासाठी तो सारे सारे त्यागायला तयार आहे.*

*निकराने मिळविलेली अस्त्रविद्या. कुण्या एका अर्जुनाच्या वधाचे संकल्प. कुण्या एका दुर्योधनाचे मैत्र, कधीकाळी केलेली कुण्या एका पांचालीची कामना.*

*नको, यातले काहीच नको.*

*एक लहानशी कुटी*\
*स्नानासाठी एक स्वच्छ जलाशय*\
*ध्यानधारणेसाठी शांत एकांत*\
*त्या जलाशयाच्या काठी एखाद् दुसरे*\
*पाणबदक चालेल.*\
*एखादा हंसही*

*एकटा दुकटा मोर कधीमधी तिथे डोकावला, तर तोही सरता होईल आणि मग तिथे*

*आदित्याचे -*

*कर्णाचा पिता?*

*नव्हे, त्याच्याशी 'तपस्वी कर्णाचा लवलेश संबंध नाही!'*

*जो या जगताचा आत्मा आहे - सहस्त्ररश्मि सूर्य*

*स्थिरचराचा प्राण -*

*त्याचे ध्यान -*

*चित्तकाग्र*

*आणि शेवटी -*

*ज्या कैवल्याच्या प्राप्तीसाठी योगी वर्षानुवर्षे श्रमत असतात, जन्ममृत्यूंच्या भोवंडी गरागरा फिरत असतात, गर्भवासाची अमित दुःखे सोशिकपणे सहन करीत असतात, ते कैवल्य? न मिळाले तरी चालेल!*

*कारण कर्णाच्या मानसपित्याने, दुर्वासाने तर त्याचीही कामना केली नाही! तो बिचारा सगळ्यांच्या निंदेचा विषय होता, पण आपणाकडून होईल तितके जगताचे कल्याण करीत चहू दिशांना वणवण भटकत राहिला अनिकेत वायूसारखा.*

*कर्णाला हे जगतासाठी श्रमणेही नको आहे, तो स्वतःच्या नानाविध समस्यांनी आणि आवर्तांनी अगदी गांजून गेला आहे. त्याला हवी आहे निखळ शांतता....*

महारथी कर्णाच्या उपेक्षित आयुष्यावर प्रकाश टाकणारी, त्याहीपेक्षा कुंतीच्या असहाय्य आणि दुर्दैवी आयुष्याचा पट वाचकांसमोर मांडणारी आप्पांचे पौराणिक लेखन 'श्री कर्णायन'. आजपर्यंत ज्या ज्या ललित लेखकांनी कर्णाविषयी काही ना काही लिहिलं त्या सर्वांनी कर्णाचे दोष झाकून किंवा त्याच्या दुर्गुणांचं उदात्तीकरण करून त्याची बाजू मांडली. त्याला अर्जुनापेक्षा मोठा ठरवण्याचा प्रयत्न केला. परंतु एक माणूस म्हणून, एक विकारवश व्यक्ती म्हणून त्रयस्थ आणि तटस्थ दृष्टिकोनातून कर्णाच्या आयुष्याचा कुणीच विचार केला नाही. नेमक्या याच दृष्टिकोनातून आप्पांनी कर्णाच्या आयुष्याचा विचार करून अत्यंत तटस्थ दृष्टिकोनातून हे लेखन केले आहे. यातला कर्ण आपल्या हातून घडणाऱ्या पापांची कबुली देतो. प्रसंगी त्याचे प्रायश्चित्त करण्याचीही तयारी ठेवतो. कर्णाचा आणि श्रीकृष्णाचा संवाद, कर्णाचा आणि कुंतीचा संवाद, कर्णाचा आणि भीष्माचा संवाद हे या कादंबरीतले आप्पांच्या

प्रतिभेची आणि अभ्यासाची उंची दाखविणारे प्रसंग. महाभारतीय युद्धाच्या प्रसंगी भीष्मांना दुरुत्तरे करून रण सोडून जाणारा कर्ण, ते शरपंजरी पडले आहेत हे कळल्यावर जाऊन त्यांची क्षमा मागतो व म्हणतो,

*'तात, कर्णाचे काय यशस्वी झाले? सगळेच त्याचे असफल, जन्म नकोसा, अस्तित्व नकोसे, आशा असफल, पौरुष अयशस्वी, पराक्रम फलशून्य!' श्रीकृष्ण आणि कर्णाच्या युद्धापूर्वी झालेल्या भेटीत कर्ण श्रीकृष्णाला म्हणतो, 'श्रीकृष्णा, माझे आयुष्य खण्डित चंद्रबिंबासारखे! माझे काय पुरे झाले? कोणता संकल्प सिद्धीस गेला?'*

*''अरे, सूर्य माझा जन्मदाता! कुंती माझी माता! दुर्वास माझा मानसपिता! महाराज पंडू माझा धर्मपिता! त्या मला काय कमी होते? काहीच तर नाही!''*

*''पण हे आयुष्य केवळ द्वेष करण्यातच नष्ट व्हायला आले.''*

अशा प्रकारे आपल्या व्यक्तिमत्त्वाचे खरेखुरे आकलन झालेला, बुद्धिमान, स्पष्टवक्ता कर्ण आपल्याला या कादंबरीत ठायी ठायी दिसतो. त्याला त्याच्या अंगभूत गुणांपेक्षा मोठा

करण्याचा, त्यासाठी अर्जुनाला लहान करण्याचा किंवा श्रीकृष्णाला अर्जुनाऐवजी कर्ण जास्त प्रिय होता असे दाखविण्याचा कोणताही प्रयत्न आप्पांनी केलेला नाही. म्हणूनच हे सारे लिखाण वस्तुनिष्ठ आणि इतिहासाशी सुसंगत वाटते. केवळ दुर्योधनाशी मैत्री केल्यामुळे किंवा कायम त्याच्या उपकारात राहिल्यामुळे, शेवटपर्यंत त्याच्याशी एकनिष्ठ राहून, त्याच्यापायी मृत्यू स्वीकारणारा कर्ण आयुष्यात चांगल्या संगतीची किती आवश्यकता असते आणि दुर्जनांच्या मिंधेपणाची शेवटी काय फळे भोगावी लागतात, याचेही एक उदाहरण आपल्यासमोर ठेवून आपल्याला एक धोक्याचा कंदील दाखवून जातो. अंगात कितीही पराक्रम, शौर्य असले तरी ती व्यक्ती जर दुर्जनांची आश्रित असेल तर त्या व्यक्तीचे ते सारेच गुण निरुपयोगी ठरतात व त्या व्यक्तींचा अंतही त्या दुर्जनांसारखाच होतो.


धनुर्यागाच्या वेळेस दुर्योधनाने दूरदृष्टीने केलेल्या मैत्रीमुळे व उपकारामुळे दबून जाऊन जन्मभर त्याच्या पापी उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी प्रत्येक वेळा प्राणाची बाजी लावून लढणारा व पराभूत होणारा कर्ण, आपला होत असलेला पराभव केवळ

दुर्गुणी व्यक्तीच्या समर्थनासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे होतो आहे हे कधी मान्यच करीत नाही.

प्रत्यक्ष श्रीकृष्ण सुद्धा जेव्हा महाभारतीय युद्धाआधी त्याची समजूत काढायला जातो तेव्हा त्यालाही मैत्रीची तत्त्वे समजावून मला दुर्योधनाच्या मैत्रीखातर मरण पत्करणे कसे अनिवार्य आहे हेच तो श्रीकृष्णाला समजावून सांगतो. चक्रव्यूहात लहानग्या अभिमन्यूला अधर्माने घेरून मारण्यामध्ये कर्णही सहभागी असतोच. पूर्वी केलेल्या दुर्वर्तनाच्या शापामुळे ऐन युद्धाच्या वेळी स्वत:च्या रथाचे चक्र जेव्हा मातीत रुतते तेव्हा मात्र तो अर्जुनाला आणि श्रीकृष्णाला धर्माच्या गोष्टी सांगू लागतो. तेव्हा मग श्रीकृष्णाने त्याच्या पापाचा पाढा वाचून त्याला विचारले, ‘तेव्हा कुठे गेला होता राधासुता तुझा धर्म?’

मला तर कर्ण हा कलियुगातल्या संधिसाधू आणि अप्पलपोटेपणाच्या बुरख्याआड केवळ स्वत:चे हित पाहणाऱ्या राजकारणी लोकांच्या हाताखालचा तसाच संधिसाधू वाटतो. त्याच्या आयुष्यात त्याला जो पश्चात्ताप झाला नाही किंवा झाला असेल तर तो त्याने व्यक्त केला नाही तो पश्चात्ताप इथे केवळ आप्पांच्या लेखणीमुळे त्याला व्यक्त करता आला

असावा असे वाटते. अन्यथा कर्ण आणि दुर्योधन ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटतात.



# श्रीकृष्णायन

*‘मग श्रीकृष्ण उठून उभा राहिला. त्याने आपल्या शेल्यात खोचून ठेवलेला पावा काढला. तो ओठांशी धरून त्यास फुंक मारली आणि आपली बोटे त्याच्या स्वरछिद्रांवरून फिरविण्यास आरंभ केला.’*

*काय आश्चर्य! त्या पाव्यातून अतिशय मधुर अशा स्वरलहरी निघू लागल्या. साक्षात् नादब्रह्म तिथे अवतरले. सर्व गोपकुमार चकित नेत्रांनी श्रीकृष्णाच्या मुखकमलाकडे पाहात राहिले. रानभर पसरलेली गाई-वासरे शेपट्या वर करून उधळत त्या ठिकाणी आली. गाई-वासरांचेच काय, वन्य पशुदेखील त्या मुरलीनादाने मोहित होऊन श्रीकृष्णाभोवती एकत्र झाले. व्याघ्र आपले दुष्टपण विसरले. नागांनी नागपण टाकून दिले. मुंगसे नागांशी असलेले आपले शत्रुत्व एकीकडे सारून त्यांच्या शेजारी बसली. लांडगे आपला हिंस्त्र भाव कुठे हरपला ते न कळता, वासरांच्या गळ्यात गळे घालून बसून राहिले!*

*जी गंत पशूंची, तीच गत पक्ष्यांची. ससाणे आणि पोपट, कावळे आणि कोकिळा, चिमण्या आणि मोर ही सर्व पाखरे*

श्रीकृष्ण ज्या झाडाखाली मुरली वाजवीत होता, त्या झाडावर मोहित झाल्याप्रमाणे खिळून राहिली.

जेव्हा श्रीकृष्ण मुरली वाजवीत यमुनेकडे निघाला तेव्हा तर यमुनेतले जलचर प्राणीसुद्धा तो मुरलीवादनाचा अपूर्व सोहळा ऐकण्यासाठी यमुनेकाठी गोळा झाले.

श्रीकृष्ण येऊन कदंबातळी उभा राहिला. त्याच्या भोवताली हे सर्व पशुपक्षी समाधी लागल्याप्रमाणे बसून राहिले. कोणी हालेना, कोणी डोलेना. अवघ्यांचे जीवभाव हारपले. एवढेच नव्हे तर यमुनाजलसुद्धा स्थिर झाल्यासारखे भासू लागले. चराचराची जणू ब्रह्मानंदी टाळीच लागली.

त्याने पुन्हा एकदा आपली मुरली हाती घेऊन ओठाशी धरली आणि तिच्यात फुंक मारली. तो मुरलीनाद ऐकताक्षणी सगळी गाईगुरे धावत श्रीकृष्णाजवळ आली. मग श्रीकृष्ण पुढे चालू लागला. त्याच्यामागे बलराम आणि मंत्रमुग्ध झालेले इतर गोपाल, गोपांच्या मागे त्यांच्या गाई आणि वासरे. मुरलीनादाने मोहित होऊन सगळी देहभान विसरून श्रीकृष्णामागे चालली आहेत. केवळ पावलांचाच आवाज, नकोसा असूनही टळू न शकणारा. पुन्हा एकदा यमुनातटाकीची धूळ आकाशात

वर उडते आहे. श्रीकृष्ण हळूहळू दोबाजूस उभ्या असलेल्या दरडीमधून, अनंतात विलीन होत असलेल्या छायांमधून गोकुळाकडे चालला आहे. रातकिड्यांनी नुकतीच परजलेली आपापली स्वरशस्त्रे मुरलीच्या नादाने मोहित होऊन पुन्हा म्यान करून ठेवली आहेत. पक्ष्यांचे आवाज थांबले आहेत. वायूचे हलणे, झाडाचे डोलणे, सगळे स्तब्ध, शांत, ब्रह्मानंदात तल्लीन झालेले.

श्रीकृष्ण वृंदावनात प्रवेश करतो आहे. संध्या छायांमध्ये आसुसलेल्या दृष्टींनी, आपापल्या लेकरांची वाट पहात असलेल्या गोपी दाराजवळ येऊन थांबल्या आहेत. व्रजाच्या प्रवेशद्वारातून श्रीकृष्ण आत प्रवेश करीत आहे. त्याच्या मुरलीचा नाद त्याच्याबरोबरच घराघरांतून शिरून सगळं व्रज आलोकित करून टाकीत आहे.

अतिशय आश्चर्यचकित झालेली नंद, यशोदा आणि रोहिणी दारात येऊन थांबली आहेत. या जातीचे मुरलीवादन त्यांनी ऐकले नव्हते. कधीच ऐकले नव्हते. आपल्या पुत्राचे ते अद्‌भुत कौतुक पाहून यशोदेच्या डोळ्यांत जलधारा माईना झाल्या आहेत. तिच्या छातीवरील पदर आसवांनी भिजून

*गेला आहे. नंदाचे डोळेही आनंदाश्रूंनी भरून आले आहेत.*

*श्रीकृष्ण लाघवी हसू हसत हळूहळू आपल्या वाड्यापर्यंत येतो. त्याच्यामागे खांद्यावर काठ्या आणि घोंगड्या असलेले गोपाल. त्यांच्यामागे वासरे आणि गाई. सगळ्यांची मने श्रीकृष्णाकार झालेली. या क्षणी तरी त्या चराचराला दुसरे आलंबन नाही, दुसरे ध्येय नाही, दुसरे लक्ष्य नाही.*

*हळूच श्रीकृष्ण मुरली थांबवितो. तो यशोदेच्या कुशीत शिरून तिचा होऊन जातो. यशोदा त्याला घट्ट मिठी मारते. घट्ट. मायलेकरातले द्वैत हरपले. यशोदा श्रीकृष्णाकार होऊन जाते.*

*श्रीकृष्णाच्या मुरलीचा ध्वनी अंतराळात विरताच अगदी शांतपणे गाईवासरे आणि गोप आपापल्या घरी जातात. त्या सायंकाळी गोकुळावर पसरलेल्या गूढतेचे आवरण विस्कटत नाही.*

पूर्णावतार श्रीकृष्णाचे चरित्र हा या देशातील प्रत्येक प्रतिभावंताचा आवडीचा विषय आहे. कथाकार, कादंबरीकार, चित्रकार, कवी, आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी पुरुष, योगी इथपासून ते भारतातील सर्वसामान्य माणसांच्या तो आवडीचा

आणि अभिमानाचा विषय आहे. कुणाला श्रीकृष्णाच्या रूपाची भूल पडली आहे. कुणी त्याच्या गोकुळलीलांच्या प्रेमात पडला आहे. कुणी त्याच्या मुरलीवादनाने मोहित झाला आहे. कुणाला त्याची भगवत्‌गीता प्रेरणा देते आहे. अशा तऱ्हेने श्रीकृष्ण हा या देशाचा आत्मा बनून राहिला आहे. प्रत्येकाने आपापल्या ताकतीनुसार हे चरित्र समजावून घेण्याचा आणि समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मनोहर कवीश्वरांनी तर..

*'माना मानव वा परमेश्वर, मी स्वामी पतितांचा !*

*भोगी म्हणूनि उपहासा, मी योगी कर्माचा !!'*

अशी खुद्द श्रीकृष्णाच्या तोंडीच त्याची स्वत:ची ओळख करून दिली.

अशा स्थितीत स्व.गो.नी. दांडेकरांसारख्या स्वभावत:च धार्मिक व सश्रद्ध व्यक्तीला या कृष्णचरित्राने भारले नसल्यास नवलच. या भारलेपणातून श्रीकृष्णाचे चरित्र आप्पांच्या लेखणीतून उतरले 'श्रीकृष्णायन.' जितकं वैविध्यपूर्ण श्रीकृष्णाचं जीवन तितकं वैशिष्ट्यपूर्ण आप्पांचं लेखन. वेगवेगळ्या व्यक्तींशी, वेगवेगळ्या स्तरावर, वेगवेगळ्या नात्यांतून श्रीकृष्णाचे स्नेहसंबंध निर्माण झालेले. त्या प्रत्येक व्यक्तीला, त्या प्रत्येक नात्याला

या चरित्रात समर्पक स्थान मिळवून देणं खरोखर अवघड पण आप्पांनी हेही आपल्या प्रतिभेच्या जोरावर यशस्वीरित्या पार पाडलेलं काम. त्यातल्या त्यात श्रीकृष्ण-द्रौपदीचं नातं तर आगळंवेगळंच. त्या नात्याचं स्मरण करून देणारा प्रसंग तर या कादंबरीत आप्पांच्या लेखणीतून असा काही उतरलाय की तो इथे जसाच्या तसा द्यायचा मोह आवरत नाही. श्रीकृष्ण द्रौपदीच्या पहिल्या भेटीत कृष्ण तिला विचारतो,

*''कोण आहे मी?''*

*''माझा जन्मोजन्मीचा पाठीराखा भाऊ!''*

श्रीकृष्णाला अतिशय हर्ष झाला. तो परम संतोषाने बोलला,

*'होय कृष्णे! तू मला बरोबर ओळखलेस. ही ओळख पटणं फार कठिण असते. पटता पटत नाही. नात्यांची बंधने आड उभी राहतात. ती दोघांभवती दूरत्वाची कवचं निर्माण करतात. आतेभाऊ, मामेभाऊ, चुलता, सासरा, सासू, जाऊ, नणंद अशी नानापरीची बंधने. मग त्या संबंधामुळे एकमेकांमध्ये एक मानीव नाते तयार होते. जन्मभर स्वतःच निर्माण केलेले ते बुजगावणे जोपाशीत, आचारांचे नियम सांभाळीत वागावे लागते.'*

*पण ही सगळी बंधने तोडून, ही सगळी कृत्रिम नाती पायदळी तुडवून तू एकदम माझ्याजवळ आली आहेस. कसलाही संकोच पाळला नाहीस. कसलीही मर्यादा मानली नाहीस. तुझ्या माझ्यातला जो खरा परिचय आहे, तो तू बोलून दाखविला आहेस. मी तो स्वीकारतो. ''ज्या ज्या वेळी तुला असे वाटेल की, हे दुःख असहनीय आहे, ही विपत्ती अनुल्लंघनीय आहे, त्या त्या वेळी हाक घालीत जा!''*

*''मग तू कुठेही अस, कितीही जवळ. कितीही दूर. कुठल्याही अवस्थेत तुझी हाक माझ्या कानी येताच तुझे संरक्षण करण्यासाठी मी धावून येईन!''*

अशा अनेक हृदयस्पर्शी संवादांनी हे लेखन ओतप्रोत भरले आहे. एक गोष्ट तर स्पष्ट आहे की श्रीकृष्णासारख्या पूर्णपुरुषाचे विस्तीर्ण चरित्र एका छोट्या पुस्तकाच्या लेखनमर्यादेत बांधून घालणे हे केवळ अशक्यप्राय काम आहे. यातील एकेका प्रसंगावर कादंबरी लिहावी इतके श्रीकृष्णचरित्र सर्वार्थाने मोठे आहे. मथुरेत आल्यानंतर श्रीकृष्ण कुब्जेच्या घरी जाऊन आला तेवढ्या एका प्रसंगावर आप्पांनी 'अजून नाही जागे गोकुळ' हे चरित्र लिहिलेही. अशा स्थितीत सारे श्रीकृष्णचरित्र

छोट्या अवकाशात बसवताना आप्पांची उडालेली तारांबळ इथे जागोजागी लक्षात येते. स्वत:च्या प्रतिभेला, अभ्यासाला वारंवार आवर घालून आप्पांना हे लेखन वेगवेगळ्या घटनांच्या शृंखला जोडल्यासारखे लिहावे लागले आहे. तरीही त्यातले माधुर्य, रसनिष्पत्ती, भक्ती कुठेही किंचितही कमी झालेली नाही. ही पण त्या श्रीकृष्णाचीच लीला, दुसरे काय!

सहस्रावधी वर्षे होऊन गेली तरी श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनी आजही भारतीयांवर किंबहुना साऱ्या विश्वावर पसरलेली आहे. त्या पूर्णावतार परमात्म्याविषयी असलेले प्रवादही तेवढेच. पण त्या सर्व शंकाकुशंकांना, प्रवादांना, आरोपांना, आक्षेपांना उत्तर देणारा एक प्रसंग महाभारतात आहे. महाभारतीय युद्धानंतर अश्वत्थामा आणि अर्जुन यांच्यात झालेल्या युद्धामध्ये अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्राने अभिमन्यूची पत्नी उत्तरेचा गर्भ मृत जन्माला येतो त्यावेळेस त्याठिकाणी उपस्थित असलेला श्रीकृष्ण हातात अभिमंत्रित जल घेऊन प्रतिज्ञा करतो,

*प्रतिजज्ञे च दाशार्हस्तस्य जीवितमच्युत: ।*
*अब्रवीच्च विशुद्धात्मा । सर्वं विश्रावयंजगत् ।।*
*नोक्तपूर्वं मया मिथ्या स्वैरेष्वपि कदाचन ।*

*न च युद्धात परावृत्तस्तथा संजीवतामय् ॥*
*यथा सत्यं च धर्मश्च मयि नित्यं प्रतिष्ठितौ ।*
*तथा मृतः शिशुरयं जीवताद्‌भिमन्युजः ॥*
*यथा कंसश्च केशी च धर्मेण निहतौ मया ।*
*तेन सत्येन बालोऽ यं पुनः संजीवतामयम् ॥*
*इत्युक्तो वासुदेवेन स बालो भरतर्षभ ॥*
*शनैः शनैः महाराज प्रास्पन्दत सचेतनः ।*


कृष्ण म्हणाले,

‘‘मी थट्टेतही कधी खोटे बोललो नसेन, युद्धात पाठ दाखवून परत फिरलो नसेन तर हे बालक जिवंत होवो. धर्म आणि विशुद्ध चारित्र्याने संपन्न पुरुष हेच केवळ मला प्रिय असतील तर माझ्या लाडक्या अभिमन्यूचा हा पुत्र जिवंत होवो. सरळपणाचा, सज्जनतेचाच सदैव विजय व्हावा, त्याला विरोधी होईल असे थोडेही वर्तन माझ्याकडून घडू नये याची दक्षता सातत्याने मी आयुष्यभर घेतली हे जर खरे असेल तर हा पोर जिवंत होवो. सत्य आणि धर्म यांनी माझा किंवा मी त्यांचा एक क्षणभरही त्याग केला नसेन तर हे अर्भक जिवंत होवो. कंस, केशि आणि त्यांच्यासारखे अनेक दुष्ट यांचा वध

मी धर्मानेच, धर्मासाठीच केला आहे. यातील सत्याचे जे पुण्य आहे, त्या बळाने पांडवांचा हा वंशाकुर जिवंत होवो.'' अशी घोषणा करून श्रीकृष्णाने हातातील जल त्या बालकावर शिंपडले आणि त्या बालकातील चैतन्य जागृत झाले.

आता यावर भाष्य करायची गरजच नाही. फक्त एवढेच म्हणायचे,

कृष्णं वंदे जगद्‌गुरुं ।



# दास डोंगरी राहतो

*'एक स्वछंद बैरागी उत्तरखंडाची यात्रा करायला निघाला होता. तपःपूत, विरक्त, मुक्त, बंधनशून्य, निग्रही मन, रामरंगी रंगलेला. जनांच्या कळवळ्याने ओलावलेला. करुणेने पाझरणारा, प्रसंगी कठोर होणारा.*

*गेली बारा वरुषे क्षेत्रसंन्यास घेतला होता. नाशिक-टाकळी सोडून पाऊल बाहेर घातले नव्हते. जणू पुरश्चरणाशी स्वतःला जखडून घेतले होते. त्या काळामध्ये कित्येक दुःखी, भ्रांत मने, उद्ध्वस्त झालेली माणसे भेटली. त्यांच्या दुःखाच्या आणि सोसलेल्याच्या परोक्ष कथा आइकल्या.*

*आता अपरोक्षपणे त्या वेदना अनुभवायाच्या होत्या. साक्षीत्वाने ठाई ठाई हिंडून त्यांना सगळा उत्तर भारत तीर्थक्षेत्राच्या दर्शनाचा लाहो तर होताच; पण त्याहून अधिक निकड होती देशस्थितीच्या निरीक्षणाची.*

*कसा देश, केवढा मोठा, किती भाषा, कशी अरण्ये, कशा नद्या, कशी हवामाने, कसे पाऊस, कसे उन्हाळे, कसे हिवाळे? यावेळी कशी माणसे, कसे त्याचे आचार, कसे*

विचार, कशा रीतीभाती, कसे बोलणे, कसे वागणे, यास काय झाले आहे. त्राय काय म्हणून राहिली नाही?

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।

स्वं स्वं चरित्र शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ।।

ही घोषणा ज्या देशींच्या पूर्वाचार्यांनी केली, तो देश आपले स्वत्व गमावून बसला तरी काय म्हणून? का हे दीनवाणें जीवन त्याच्या नशिबी आले?

पराई सैन्याच्या तडाखा वाजताक्षणी हे मूठ मूठ मिश्यांचे, परातीएवढ्या छात्यांचे काय म्हणून पळत सुटले? असे सैरभर का झाले?

त्यांच्या लेकी, यांच्या सुना यांस काय म्हणून सांभाळवेना झाल्या? काय हे लेकी जन्मताक्षणी कपाळावर हात मारु लागले? जेथे नारीची पूजा केली जाते, तेथे देवता वास करिताती, हे वचन या देशीचेच. स्मृतिकाराने उच्चारले होते ना? मग काय म्हणून स्त्रीचे जन्मणें यांस असे दुःखदायी झाले? यांच्या दैवतांची मंदिरे यास काय म्हणून राखवेना झाली? यांच्या पवित्र क्षेत्री काय म्हणून गाईचे मांस येऊन पडू लागले? यांचे मानबिंदू काय म्हणून हरवून बसले? यांचे

*सत्व, यांची अस्मिता, यांचा पूर्वगौरव या सर्वांस असे कोणते ग्रहण लागले?*

*हे सगळे कां? का? का?*

''निशिदिनी जनचिन्ता लागलीसें उदरा'' असे म्हणत लहानपणापासून 'चिंता करितो विश्वाची' असे आईला सांगणाऱ्या समर्थांचे चरित्र वर्णन करणारी आप्पांनी लिहिलेली संतचरित्रावरील ही कादंबरी 'दास डोंगरी राहतो.'

लहानपणीचा व्रात्य, खोडकर, नाना प्रश्नांनी आणि शंकांनी सांगणाऱ्याला भंडावून सोडणारा नारायण, लग्नाच्या बोहल्यावरून पळून नाशिकला पोचल्यावर टाकळीस पुरश्चरण सुरू करण्याआधी मनाशी एक निश्चय करतो. त्या तपश्चर्येच्या उग्र साधनेला सुरुवात करण्यापूर्वी तो मनाशी ठरवतो.

*त्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन. वावगा, वृथा एक क्षणही जाऊ देणार नाही. प्रत्येक क्षणाचा उपयोग करीन.*

*आयुष्य हे महाकालाचे खाजे. तो एकेक क्षण हिरावून घेतो आहे. त्यास थांबविणे आपल्या या सामर्थ्याबाहेरचे. ते तर देवादिकांसाही साध्य झालं नाही.*

*तर मग आपल्या हाती एक आहे. निश्चितच आहे. तो*

*प्रत्येक क्षण वाजवून पदरात घ्यायचा, काही हाती लागले नाही, असा एकही पळ असतां नये!*

*सगळी इंद्रीये घासायची, पुसायची, सजग सावध करायची. त्या सर्वेंद्रियांनी परमात्मा आकळायचा. असे होता नये, की अमुक एक इंद्रीय देवाने दिले होते आणि त्याचा उपयोग म्या केला नाही. देवाचें ते दान वृथा गेले.*

स्वर दिला आहे, रामकथा गायची. पाय दिले आहेत, रामरंगी नाचायचे. हात दिले आहेत, विश्वात्मकाची सेवा करायची. डोळे दिले आहेत, त्याला चहू अंगांनी निरखायचे. अलिंगन द्यायचे, कुडी धन्य करून घ्यायची!

*असे कोणी म्हणतां कामा नये की, 'ठोसरांच्या या मुलाने आपला जन्म व्यर्थ दवडिला. त्याची ही वारी वृथा झाली. तो जन्मजन्मांचा भिकारीच राहिला!'*

अशा अनेक स्वगतांनी विचारांनी, चिंतनांनी ही कादंबरी ठासून भरली आहे. ज्या सामाजिक स्थितीमध्ये समर्थांनी ही क्रांती महाराष्ट्रात घडवून आणली, आपल्या परंपरेतून समाजकारणाशी आणि राजकारणाशी जे संबंध समर्थांनी स्थापित केले तो काळ, ती समाजस्थिती स्वर्गीय आप्पांनी या कादंबरीत

अतिशय परिणामकारकरित्या व तपशीलवार मांडली आहे. आध्यात्माचा आणि राजकारणाचा समर्थांनी निर्माण केलेला संबंध हा त्यावेळच्या सामाजिक स्थितीत केवळ अभूतपूर्व, आश्चर्यकारक, क्रांतिकारक आणि त्यावेळच्या प्रचलित आध्यात्मिक संकल्पनांना तडा देणारा होता.

*मुख्य ते हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण ।।*
*तिसरे ते सावधपण । सर्वांविषयी ।।*

असे सांगणारे समर्थ,

*राजकारण उदंड करावे । परंतु ते कळोचि नेदावे ।।*

असे सांगणारे समर्थ हे त्यावेळच्या धर्मकल्पनांना धक्का देणारेच होते. अशा सर्व समर्थांच्या रचनांचा आणि चळवळींचा मागोवा घेणारी कादंबरी म्हणूनच एका ऐतिहासिक कादंबरीचा दर्जा प्राप्त करते.

सगळ्यात महत्त्वाचा आणि उल्लेखनीय भाग जो आहे तो छत्रपति शिवाजी महाराज आणि समर्थ यामधील संबंधाचा भाग. याबाबतीत इतिहासकार व समर्थांचे अनुयायी यांच्यामध्ये थोडेफार तपशीलाबाबत मतभेदही आहेत. परंतु ज्या एका ध्येयाने ही दोनही माणसे प्रेरित होऊन आपापल्या क्षेत्रात

स्वयंभू प्रज्ञेने काम करीत होती त्या एका ध्येयाबाबत, स्वराज्य स्थापनेच्या संकल्पाबाबत सुदैवाने कोणतेही मतभेद नाहीत. परंतु या दोघांमधल्या ऋणानुबंधनाचा नेमकेपणा, दोघांनी एकमेकांच्या स्वप्नपूर्तीसाठी घेतलेले कष्ट, त्यासाठी केलेल्या सामाजिक चळवळी याचा नीटसा मागोवा आजपर्यंत कोणी घेतला होता असे वाटत नाही. आणि जरी घेतला असला तरी सर्वसामान्यांपर्यंत ते ज्या सोप्या आणि सरळ भाषेत पोहोचवणे आवश्यक होते. ते काम स्व. आप्पांनी या कादंबरीतून अतिशय ताकतीने आणि समर्पकरीत्या केले आहे. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे,

*''सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयांचे*
*परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।''*

या उक्तीला धरून शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या चळवळीला समर्थांनी शक्तीच्या उपासनेद्वारे जे पुरुषार्थी आणि आध्यात्मिक अधिष्ठान मिळवून दिले त्याचा तपशील आपल्याला या कादंबरीत नेमकेपणाने प्रत्ययास येतो आणि मग शिवसमर्थ संबंधांबाबत अधिक काही जाणून घ्यायची गरज शिल्लक राहात नाही.

परिस्थितीने गांजून गेलेल्या, हताश झालेल्या समाजमनाला प्रयत्नवादाची कास धरायला लावून त्याला शक्तीची उपासना करायला लावून, प्रसंगी युक्तीचे महत्त्व पटवून देऊन सन्मार्गी लावण्याचा प्रयत्न करणारे समर्थ इतर संतांपेक्षा वेगळे वाटतात ते याच कारणामुळे.

बहुधा सर्वच संतांनी प्रापंचिक सुखांकडे आणि दुःखांकडेही पाठच फिरविली. प्रपंचाचा त्याग केल्याशिवाय परमार्थ साध्य होणार नाही असे आग्रही प्रतिपादन केले. परंतु समर्थांनी मात्र

'प्रपंच करावा नेटका मग घ्यावे परमार्थविवेका'

असे सांगून प्रपंचातही परमार्थ करता येतो हे पटवून दिले. त्यापेक्षाही प्रपंचातल्या परमार्थाचे स्वरूप स्पष्ट करून दाखवत.

'प्रपंच सांडून परमार्थ केला । तेथे अवघाचि कार्यभाग बुडाला ।।'

असा रोखठोक उपदेश केला.

'ज्यासी प्रपंच जमेना, तो परमार्थी खोटा'


असा उपदेश करणारे समर्थ समाजधारणेसाठी प्रपंचाचे, गृहस्थाश्रमाचे महत्त्व जाणून होते. अशा कित्येक प्रसंगांनी व

उपदेशांनी ही कादंबरी ठासून भरली आहे. जो या ग्रंथगंगेत न्हाऊन निघेल तो सुदैवी अन्यथा समर्थांनीच म्हटल्याप्रमाणे,

'लोह परिसावरी रुसले, तेणे सोनेपणासी मुकले ।

येथ कोणाचे काय गेले?'

दुर्दैवाने या साऱ्या तपशीलांचा अभ्यास न करता, त्यातील मतितार्थ जाणून न घेता, त्यावेळची सामाजिक, धार्मिक, राजकीय पार्श्वभूमी विचारात न घेता आज केवळ एका विशिष्ट भूमिकेतून शिवसमर्थ संबंधांवर विनाकारण आक्षेप घेतले जात आहेत. हे आक्षेप क्षुद्र राजकीय स्वार्थासाठी त्यांना सोयीस्कर वाटत असले, तरी अंतिमतः ते समर्थ आणि शिवाजी महाराज यांच्या समान ध्येयाचा आणि सामाजिक व राजकीय कार्याचा उपमर्द करणारे आहेत हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.



# मोगरा फुलला

*“मावशी, तूं काय चिंतित्ये आहेस?”*

*उसासोन म्यां म्हटलें,*

*“बाळांनो, किती दिसांवेरी तुम्ही अशी विजनांत राहणार?”*

*ज्ञानोबाने आम्हांकडे येतां येतां तें आइकले, आणि हसत म्हणाला,*

*“मावशी, येथील आनंदापेक्षा आनंद तुझ्या चौखणी घरामध्ये तरी आहे काय? ते सांग बघू,”*

*“हे पहा, उषःकाल फुटण्यापूर्वी आम्हास जाग येते. तोंवरी येथील असंख्य वृक्षांवरी रातभरी बैसोन असलेले भाट आणि वैतालिक आम्हांसाठी गीते गावो लागताती. नाना त्यांच्या जाती, नाना त्यांची कूजिते. ऐसे मंगलगान तुझ्या चऱ्होलीमध्ये तरी तुज आइकता येते काय?”*

*सूर्योदय होताक्षणी त्या सहस्रकाराचे दयाळू हात आम्हास स्पर्शावयास आम्हापर्यंत येवोन पोचताती. वायूचे झोत चहू दिशांनी आम्हास अलिंगावयासी येताती. आकाशातून दवाचे थेंब धरतीवरी उतरताती. जणों धरित्रीने सर्वत्र पसरलेले ते*

*मोतीच!*

*तेजोनारायण उगवतो, ते अवघे सावडून घेवोन जातो हे कवतिक आम्हासमक्ष घडत असते.*

*देवाघरचे जीव-चिमण्या, काऊ, खारी, घारी या सर्वांचे आम्हाशी मैत्र तू पाहिले आहेस. मावशी, आमच्या कुटीच्या भंवताले ही अवघी देवसृष्टि कशी निश्चिंत मनें क्रीडा करीत असते. हे असंख्य मित्र तुझ्या घरी आम्हास भेटतील काय?*

*आणि मावशी, प्रतिदिवशी पूर्वेकडून येक सुवर्णाचा तेजोगोल क्षितिजरेखा भेदोन वरी येत असतो आणि सायंकाळी आपलं किरणजाल आपणासंवे गुंडाळोन घेवोन जात असतो. आम्ही हे निसर्गाचे कवतिक येथोन जैसे डोळेभरी न्याहाळितो, तैसे तुझ्या चौसोपी वाड्यातून पाहाता येते काय?*

*वर्षाकाळीचे मेघांचे येणे सर्वांआधी आम्हास कळते. ते येतांक्षणी आम्हास खुणावतात, कारण आम्ही आकाशमंडपी राहतो, त्यांची मिठी सर्वप्रथम आम्हाभोवती पडते. पश्चिमेस ते बरसो लागताती. मग धरित्रीशी पर्जन्यजळाची प्रथमभेटी घडताक्षणी जो मृद्‌गंध दरवळतो, तो आम्ही ऊर भरभरून घेतो, कारण आम्ही उघड्यावरी आहोत!*

*राती तस्करभये तुम्ही दारे बंद करोन या काळोखभरल्या रांजणात, त्या उकाड्यात आपल्या शरिरांची रायती घालिता, इकडे घामाने प्राण धावू पळूं करीत असतात. तुम्ही विंझण्याने ती आर्त शमवू पाहातां.*

*आणि आम्हास तस्करांचे काय भेव? तेच आमुच्या कुटीत पाऊल घालायचा दचका घेताती! येथ तर धुंद हरिरंग उसळत असतो. त्यांनी येथ प्रवेश केला रे केला, की त्यांची तस्करी विरघळोन जाईल. त्यांचे उपजीविकेचे साधनच गळोन पडेल. तेही आम्हासंवे हरिरंगणी गावों नाचों लागतील, हाच त्यांच्या मनी धाक असतो.*

ज्ञानदेवांचे चरित्र आणि त्यांचे साहित्य हा महाराष्ट्रातील प्रत्येक प्रतिभावंताच्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय. साडेसातशे वर्षांपूर्वी या बालयोग्याने जी क्रांती आध्यात्मिक क्षेत्रात, महाराष्ट्रात घडवली त्या क्रांतीच्या भगव्या पताका खांद्यावर घेत लाखो मंडळी आजही पंढरीची वारी करतात, मुखाने हरिनाम घेत स्वतःचे जीवन धन्य करून घेतात. अशा परिस्थितीत स्व. आप्पांना या चरित्राविषयी आकर्षण न वाटते तरच आश्चर्य. त्यातून आप्पांच्या सुरुवातीच्या भ्रमणकाळात

आप्पा ज्ञानेश्वरींच्या अभ्यासासाठी आळंदीस राहिलेले. त्यामुळे या कादंबरीच्या लेखनाला जी अनुभवाची जोड मिळाली त्याची परिणती या कादंबरीत पानोपानी दिसते. कादंबरीच्या प्रस्तावनेतच अप्पांनी लिहून ठेवलंय,

.....आळंदीस श्रींचे चरणापाशी राहून ज्ञानेश्वरीचे यथामति अध्ययन केले, त्याला आता तीन तपांहून अधिक काळ लोटला.

*या काळामध्ये जीवनात कितीएक बरेवाईट घडले. तरीही मनातील झिलमिल ज्योती मावळली नाही. या चिंतनाचा परिपाक ही कादंबरी. ही कथा एकट्या ज्ञानोबाची नव्हे; तर विठ्ठलपंत, मायरुक्मिणी आणि लेकुरे अशा कुटुंबाची कहाणी आहे. सातशे वर्षांपूर्वी आळंदी एक सुमार खेडे. तिथे विठ्ठलपंतांचा न्याय करण्याजोगे पंडित असतील, हे अगदी असंभाव्य. स्वत: विठ्ठलपंत शास्त्रवेत्ते. गार्हस्थ पुन: स्वीकारण्यापूर्वी त्यांनी शास्त्रोक्त प्रायश्चित्त, जे केवळ कुच्छे आणि चांद्रायणें इतकेच आहे, आचारिले असलेच पाहिजे.*

*ज्ञानेश्वरकालीन सामाजिक स्थिती वर्णावी, हे काही या कादंबरीचे प्रयोजन नव्हे. तरी आवश्यक तेवढा त्या काळाचा*

*मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. ही सेवा श्रीचरणी समर्पित!*

हेच सूत्र मनाशी धरून कावेरी व भट्टदेव ही दोन काल्पनिक पात्रे उभी करून त्यांच्या निवेदनामधून आप्पांनी ही कादंबरी उलगडत नेली आहे. ज्ञानेश्वरांच्या जन्मापूर्वीपासूनचा म्हणजे विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांच्या विवाहाआधीपासूनचा काळ आप्पांनी यात सविस्तर वर्णन केला आहे. विठ्ठल-रुक्मिणीची भेट, त्यांचा विवाह, विठ्ठलपंतांचे संन्यास घेणे, त्यांचा काशीक्षेत्राचा निवास, त्यांना प्राप्त झालेले ज्ञान, इकडे रुक्मिणीची झालेली विकल अवस्था, त्यातही न डगमगता तिने अंगिकारलेले व्रत यासंबंधीची माहिती विठ्ठलपंतांच्या गुरूंना कळाल्यावर त्यांच्या आज्ञेने पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारलेले विठ्ठलपंत, साऱ्या गावकऱ्यांचा रोष, हेटाळणी, अपमान, वाळीत टाकणे हे सारे स्वीकारून त्या दाम्पत्याचे सिद्धबेटी राहणे; निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई या चौघांचा जन्म. त्यावेळेस सहन केलेल्या यातना, त्या चौघांना घेऊन केलेली ती तीर्थयात्रा, त्यांच्या मुंजी व्हाव्यात म्हणून ग्रामसभेची देहदंडाची शिक्षा स्वीकारून या दोघांनी केलेले आत्मार्पण असे सारे तपशीलवार वर्णन करीत आप्पांनी ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीच्या प्रसंगाने

कादंबरीचा शेवट केलेला. या कादंबरीच्या लेखनासाठी आप्पांनी वापरलेली भाषाही थेट ज्ञानेश्वरकालीन. त्या भाषेतील गोडवा आणि आप्पांचे रसाळ निवेदन यातून काही काही प्रसंग तर अशा उंचीवर पोहोचले आहेत की त्याचे साहित्यिक मूल्य म्या पामराने काय वर्णावे? निवृत्तीनाथांना झालेला गहिनीनाथांचा साक्षात्कार व ज्ञानप्राप्ती, विठ्ठलपंत व रुक्मिणीचे या चौघांना सोडून आत्मार्पण करणे, पैठणच्या ब्रह्मवृंदासमोर ज्ञानेश्वरांचे निवेदन आणि सर्वांत कळस म्हणजे शेवटचा ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीचा प्रसंग. हे सारे प्रसंग आप्पांनी इतक्या उत्कटतेने लिहिले आहेत की, ते वाचताना त्या प्रसंगाने त्या क्षणाची अनुभूती आल्याशिवाय राहात नाही.

एकूणच ज्ञानदेवांचे जीवन अलौकिक. एवढ्या लहान वयात जीवनाचा मतितार्थ जाणून त्याचे प्रयोजन ओळखून त्यानुसार कर्म आचरित, प्राप्त कर्तव्य पार पाडल्यानंतर अनासक्त योग्यासारखे स्वत:ला कर्मबंधनातून मुक्त करून घेणे फार कमी जणांना जमते.

माऊली इतका समाजाचा रोष, ज्ञातिबांधवांचा छळ कोणाच्याही वाट्याला आला नाही. इतक्या लहान वयात


जीवनाचे इतके दु:खदायक अनुभव दुसऱ्या कुठल्याही संताच्या वाट्याला आले नाहीत. पण माऊलींचे मोठेपण असे की एवढे दु:ख वाट्याला येऊनही, एवढी अवहेलना, अपमान वाट्याला येऊनही माऊलीच्या लिखाणात कुठेही, कोणाहीबद्दल संतापाचा एक शब्दही उमटला नाही. भिक्षेच्या झोळीत माती टाकणाऱ्या समाजाला माऊलीने अमृतानुभवाचे अमृतच पाजले. माऊलीने मागितलेले पसायदान हे खरे तर वैश्विक स्तोत्र व्हावयास हवे.

*'जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो*
*भूतां परस्परे जडो । मैत्र जीवांचे ।*
*दूरितांचे तिमीर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो*
*जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात'*

एवढे मोठे मन केवळ संताचेच किंवा माऊलीचेच असू शकते. एवढे सारे सांगून आपले जीवितकार्य पार पडले हे लक्षात आल्यावर इथे क्षणभरही न रेंगाळता संजीवन समाधी घेऊन स्वत:ला परमात्म्याशी तदाकार करून टाकणारे ज्ञानेश्वर म्हणूनच आजही भागवत संप्रदायाचा पाया मानले जातात. हे सारं आप्पांच्या साक्षात्कारी लेखणीतून उतरतं तेव्हा आपण

केवळ आश्चर्यमुग्ध होऊन जातो.

या साऱ्याच वर्णनाची, संवादाची, भाषेची गोडी इतकी आहे की या कादंबरीच्या अभिवाचनाचा अभिनव प्रयोग आप्पांनी आपली कन्या सौ. वीणा देव आणि आपले जामात विजय देव यांच्यासोबतीने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी केला. आजही आप्पांच्या पश्चात देव कुटुंबीय हा कादंबरीवाचनाचा वसा अगदी व्रतस्थ भूमिकेतून पुढे चालवीत आहेत. परवाच विजय देवांशी बोलताना ते म्हणाले, 'मोगरा फुलला', 'तुका आकशाएवढा' आणि 'दास डोंगरी राहतो' या तीन कादंबऱ्यांना स्व. आप्पा 'प्रस्थानयत्री' म्हणत. या तीनही कादंबऱ्यांच्या अभिवाचनाचे तीन प्रयोग शनिवार, रविवार करावेत अशी आमची इच्छा आहे. ती त्यांची इच्छा लवकरात लवकर पूर्ण होवो. एवढेच मागणे माऊलीच्या पायाशी यानिमित्ताने मागतो.



# वादळातील दीपस्तंभ

*तो महन्मंगल क्षण एका राष्ट्रभक्ताचा, त्याच्यासाठी आपले सर्वस्व समर्पित करणाऱ्या समुहाचा जो जन्मदिन. ज्याची हा प्राचीन देश कित्येक वर्षे वाट पहात होता, तो क्षण. एका पागलांच्या (?) टोळीचा तो जन्मक्षण. 'मेरा रंग दे बसंती चोला । इसी रंग में रंगकर शिवाने अपनी माँ का बंधन खोला,' अशी गीते गात स्वतःचे अस्तित्व या समाजामध्ये बुडवून टाकणाऱ्यांचा तो स्फूर्तीक्षण. ज्याच्यासाठी अनेक उमद्या तरुणांनी आपली जीवितें समाजजीवनाच्या प्रवाहात बेभानपणे झोकून दिली, त्या संघाचा तो प्रारंभ क्षण.*

१९२५ चा विजयादशमीचा पवित्र दिवस उगवला. अनुकूल वारे वाहू लागले. सगळे नागपूर दसऱ्याच्या आनंदात निमग्न होते आणि इकडे डॉक्टरांनी आपल्या घरी भाऊजी कावरे, आण्णा सोहोनी, विश्वनाथराव केळकर, बालाजी हुद्दार, बापूराव भेदी इत्यादी मंडळींना एकत्र करून आज तुम्हा सर्वांच्या सहकार्याने आपण संघ सुरू करीत असल्याचे घोषित केले. या पहिल्याच बैठकीत या नव्या संस्थेचे नाव काय असावे,

*यावर चर्चा झाली. जरीपटका मंडळ, भारतोद्धारक मंडळ अशी दोन नावे सुचविण्यात आली. पण डॉक्टरांच्या मनी या संघाला 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' हे नाव द्यावे असे होते. तो निर्णय स्वीकारण्यास काही दिवस जावे लागले.*

*पुढे तेच नाव पक्के झाले. दि. १७ एप्रिलपासून ही संघटना 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या नावाने ओळखली जाऊ लागली. डॉक्टरांचे एक छोटेसे भाषण झाले. ते म्हणाले, 'हा देश आपलाच आहे. आम्ही याचे स्वामी आहोत, पण याची जाणीव नसल्याने प्रत्येकजण आपल्याला एकटा मानीत असल्याने आजही ही दुर्दशा प्राप्त झाली आहे. 'संघे शक्ती: कलौ युगे ।' हे ज्या क्षणी आम्ही विसरलो, त्या क्षणापासून आमच्या या अध:पतनाला प्रारंभ झाला. आपण ही जाणीव पुन: निर्माण करण्यासाठी एकत्र येत आहोत.'*

परमपूजनीय डॉक्टर हेडगेवारांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात १९८९ साली आप्पांनी डॉक्टरांच्या जीवनावर लिहिलेली ही कादंबरी प्रकाशित झाली. मला आठवतं की, या कादंबरीच्या प्रकाशनाला मी उपस्थित होतो. आप्पांनी स्वत:च्या तब्येतीकडे थोडेसे दुर्लक्ष करूनच वयाच्या सत्तरीच्या आसपास हे कादंबरीचे

काम हातावेगळे करून जन्मशताब्दीच्या त्या उत्सवपर्वात आपलीही साहित्यिक सुमनांजली अर्पण केली होती. माझ्या माहितीप्रमाणे आप्पांनी लिहिलेली ही शेवटची कादंबरी. आपल्या असामान्य साहित्यिक प्रतिभेचा, चतुरस्र लेखणीचा, रसाळ वाणीचा शेवटचा आविष्कार परमेश्वराच्या चरणाशी समर्पित करताना आप्पांनी डॉ. हेडगेवारांसारख्या महामानवाच्या चरित्राची निवड केली यातच त्यांचे वेगळेपण आणि एक स्वयंसेवक म्हणून डॉक्टरांविषयी वाटत असलेल्या भावनेचे हळुवारपण प्रकट होत होतं. खऱ्या अर्थाने एका ज्योतीने केलेली ती तेजाची आरती होती.

विसाव्या शतकाचा पूर्वार्ध. टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीयुगाला प्रारंभ झालेला. सशस्त्र क्रांती, अत्याचारांचा सूड वगैरे शब्द हळूहळू लोप पावून सत्याग्रह, असहकार, अहिंसा वगैरे शब्द राजकारणात रूढ होऊ लागले होते. अशा वेळेला या आत्मविस्मृत समाजाला त्याच्या खऱ्या स्वरूपाची जाण करून देणारं, समाजाच्या दुरवस्थेची, विस्कळीतपणाची नाडी लक्षात येऊन त्याच्यावर नेमका उपाय शोधणारं व्यक्तिमत्त्व डॉक्टर हेडगेवारांच्या रूपानं उभं राहिलं आणि एका वटवृक्षाचं

बीज या भारतात, या महाराष्ट्रात विजयादशमीच्या पवित्र दिवशी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या' रूपानं रोवलं गेलं. या बीजारोपणामागं होती. डॉक्टरांना समाजाविषयी वाटणारी तळमळ, धर्माविषयी वाटणारा प्रखर अभिमान, या मातृभूमिविषयी असणारी ज्वलंत निष्ठा. काँग्रेससह सर्व सामाजिक आणि राजकीय संस्थांशी डॉक्टर संबंधित होते. पण यापैकी कोणतीही संघटना ही विशुद्धपणे देशाचा आणि धर्माचा विचार करू शकेल असे डॉक्टरांना स्वानुभवाने वाटले नाही. म्हणून राजकरणापासून पूर्णपणे अलिप्त असणारी अशी स्वयंपूर्ण व स्वयंसेवी संघटना डॉक्टरांनी संघाच्या रूपाने उभी केली. संघाची रचना, कार्यपद्धती व दैनंदिन कार्यक्रम हे पूजनीय डॉक्टरांच्या संघस्थापनेपूर्वीच्या स्वानुभवाच्या विचारमंथनातून निघालेले नवनीत होते. हिंदू समाजाच्या सर्व सामाजिक समस्यांवरचा तो एक रामबाण उपाय होता. संघस्थापनेपूर्वीचा आणि नंतरचाही कालखंड स्वर्गीय आप्पांनी इतक्या तपशीलाने वर्णन केला आहे की, वाचताना आपण जणू त्या कालखंडाचे साक्षीदार आहोत की काय असे वाटते.

संघाचा आजचा विस्तार पाहात असताना इतिहासातल्या

एका घटनेची प्रकर्षाने आठवण होते. वाराणशीला एक प्रचंड वटवृक्ष होता. हिंदूधर्मीयांची श्रद्धा आहे की, तो अक्षयवटवृक्ष आहे. ही बातमी पूर्वी मोगल कारकीर्दीत जहांगीराच्या कानावर गेली. त्याने तो वटवृक्ष मुळापासून खणून काढण्याची आज्ञा दिली. काही दिवसांनी पुन्हा त्या जागी नवीन वटवृक्ष उगवून आला. आपल्या आजोबांच्या पावलावर पाऊल टाकून औरंगजेबाने पुन्हा तो वटवृक्ष तोडून त्या जागी प्रचंड लोखंडी तवे टाकून त्यावर लाकडे पेटवत ठेवली. पाऊस सुरू झाल्यावर या राखेच्या ढिगातून पुन्हा एक लवलवता कोंब बाहेर पडला. संघाच्या स्थापनेनंतरही दोनतीन वेळा आलेल्या बंदीच्या रूपाने हा संघाचा वटवृक्ष उखडून काढण्याचे अनेक प्रयत्न झाले. पण आजही तो वटवृक्ष त्या वाराणशीच्या अक्षयवटाप्रमाणे वाढतो आहे, विस्तारतो आहे. याच वटवृक्षाच्या सावलीत आणि संस्कारांत वाढलेला एक स्वयंसेवक आपल्या देशाचे पंतप्रधानपद भूषवून आपली कारकीर्द प्रचंड यशस्वी करून गेला. त्या क्रांतदर्शी केशवांनी पाहिलेल्या दिव्य स्वप्नांना त्याने मूर्तरूप दिले आहे. भारतभूचे तेज दशदिशांना व्यापून टाकील अशा स्वरूपाचा पुरुषार्थ त्याने गाजविला आहे.

आपल्या कुळपुरुषांविषयी लिहिताना त्यांच्या कवित्वाचा गंगौघ उफाळून आला. त्यांनी लिहिले,

*केशव के आजीवन तप की यह पवित्रतम धारा ।*
*साठ सहस ही नहीं, तरेगा इससे भारत सारा ।*
*यह नवगंगा तोड चली है बाधाओं की कारा ।*
*एक जन्हु क्या? यहाँ पूर्ण पशुबल ने सिर दे मारा ।*
*सन पचीस का वर्ष । पंथ पर राही एक चला था ।*
*अन्धकार का वक्ष चीरकर दीपक एक जला था ।*
*पथ पर चलते-चलते ही वह राह बन गया*
*तिलतिल कर जलते-जलते ही दाह बन गया ।*
*वह कैसा था भक्त, स्वयं भगवान बन गया*
*कुम्भकार की कृति होकर, निर्माण बन गया ।*
*आज नही वह, किन्तु पथ पर चरण चिन्ह अंकित है*
*मनु के वंशज प्रलयकाल से क्यों शंकित है?*
*कोटी पुष्प चढ रहे देव के शुभ चरणों पर*
*कोटी चरण बढ रहे ध्येय की ओर निरन्तर ।।*

(मेरी इक्यावन कविताएँ-अटलजी)

पण या साऱ्या संकल्पनांच्या मुळाशी प.पू.डॉक्टरांची

दुर्दम्य महत्त्वाकांक्षा, पराकोटिचे परिश्रम, अविरत कार्यमग्नता, अफाट लोकसंग्रह आणि अतिशय हळुवार असे मातृहृदय होते. हे सारे गुण नेमके कशा स्वरूपात प्रकट होत होते ते आप्पांनी या कादंबरीत आपल्या प्रत्ययाला आणून दिले आहे. परमपूजनीय डॉक्टरांच्या आणि महात्मा गांधींच्या भेटीच्या वेळेस संघाच्या स्थापनेसंबंधी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना डॉक्टर उद्गारतात,

*'काँग्रेसमध्येही स्वयंसेवकाची गरज आहे, पण ती केवळ अधिवेशनांच्या वेळी मंडप उभे करायला, सतरंज्या अंथरायला, अधिवेशनाचा आटोप सांभाळण्यापुरतीच आहे. त्या पलिकडे स्वयंसेवकाकडे लक्ष देण्याइतका काँग्रेसमध्ये कुणापाशी वेळ आहे?'*

*''आमची स्वयंसेवकाची व्याख्या वेगळी आहे. आमचा स्वयंसेवक हा सदैव सावध, दक्ष, अनुशासनशील, शुद्ध आचरणाचा, या मातृभूमीवर निरतिशय प्रेम करणारा, देशभक्त, स्वतः विचार करू शकणारा, केवळ सांगकाम्या नव्हे, असा असला पाहिजे. त्यासाठी त्यावर नित्य संस्कार करण्याची गरज आहे. आमच्या दैनंदिन शाखांवरून आम्ही त्यावर हे*

*संस्कार करीत असतो. आम्ही सर्वच स्वयंसेवक आहोत.''*

डॉक्टरांनी सांगितलेली ही स्वयंसेवकाची व्याख्या संघाबाहेरच्या लोकांना संघाविषयी स्पष्ट कल्पना देणारी तर आहेच, पण स्वतःस स्वयंसेवक म्हणवून घेणाऱ्यांनीही डॉक्टरांच्या या कसोटीवर घासून घेऊन स्वतःचे खरे-खोटेपण सिद्ध करून घेण्यास हरकत नाही.

भिन्न भिन्न विचारांचा, भिन्न आचारांचा, भिन्न भाषांचा, भिन्न वेषपरिधानांचा समाज ज्या भूमिवर गेली अनेक वर्षे एकत्र नांदतो आहे, तेथे वादळे तर उठणारच. पूर्वीही उठली होती, आताही उठताहेत आणि पुढेही उठणारच. पण त्या वादळातही सर्वांना आपल्या सर्व मतभिन्नता विसरायला लावून, त्या सर्वांना एकत्र आणून त्यांना राष्ट्रोद्धाराची दिशा दाखवणारा दीपस्तंभ मात्र परमपूजनीय डॉक्टरांच्या रूपाने एकच असणार आहे. म्हणूनच त्या चिरपरिचित ओळी पुन्हा म्हणाव्याशा वाटतात.

*लो श्रद्धांजली राष्ट्रपुरुष शतकोटी हृदय के कंज खिले है ।*
*आज तुम्हारी पूजा करने सेतु हिमालय संग मिले है ।।*
*तुमने किया व्यतीत कठिणतम, लोकप्रसिद्धीपराङ्मुख जीवन ।*

*भीष्म समान रहे तुम अविचल, हिंदूराष्ट्रके हित आजीवन*
*देव तुम्हारी घोर तपस्या के ही तो ये सुफल मिले है ।*
*आज तुम्हारी पूजा करने सेतु हिमालय संग मिले है ।*



# तुका आकाशाएवढा

'आम्ही बसलो, तुकोबांनी डोईचें पागोटे हाती घेतले, माथ्यावरील घाम पुसला. मग संथपणे बोलू लागले.'

पहा की नरदेह लाभणे ही काही सहज गोष्ट नव्हे. शास्त्रात म्हटले नाही काय? की मनुष्यत्व, मुमुक्षुत्व आणि महापुरुषांची कृपा या तीन गोष्टी अतिदुर्लभ म्हणून? तो मजला मनुष्य देह लाभला. पूर्वजन्मी कोणते पुण्य केले होते ठावकी नाही, पण त्या पुण्याचे फळ म्हणून हे नरदेहाचे पेणें हाती आले.

तो तर अनेकांना लाभतो. तो मिळून देखील त्याची माती करणारी किती बापुडी आपण चहू दिशांस पाहतो, त्याची काही गणती नाही. कुठे तरी कुण्या दुर्दैवी कुळीत जन्मतात आणि बापड्यांचे काही तरी होते.

माझे तसे झाले नाही. बहु पवित्र कुळ मजला लाभले. आम्हा घरी सताठ पिढ्या पंढरीची वारी, स्वत: श्रीपांडुरंगाची मूर्त आम्हा घरी राहायास आलेली. मायबापांनी मजवर भले संस्कार केले.

उत्तम वर्तावे, कोणास अकारण पीडा देऊ नये, सर्वांभूती

*दया असावी, व्यवहार चोख असावा, न्यायनीतीची संगत सोडू नये, हरिस्मरण जागे असावे, हे वडिलांनी मजला शिकविले. म्यांही मजकडून घडली तितकी त्या वर्ताव्याची पाळणूक केली, भले वागत गेलो. कुटुंबाशी, कुळाशी, गावकऱ्यांशी, शिवकऱ्यांशी. असे सर्व नेटके चालले होते, तो प्रापंचिक दु:खे उभी राहिली. बाप गेले, माय गेली. दुष्काळ सामोरा उभा ठाकला. दशादशा झाली. चहू हातांनी सावरायला प्रयत्न केला. पण साध्य झाली नाही. द्रव्य आटले. मान हारपला, एक पत्नी अन्न अन्न करीत मेली. लेकरु तिच्या पाठोपाठ आल्या वाटेने चालते झाले.*

*हा एका परीने ईश्वराचा अनुग्रहच म्हणायचा! या विविध तापातून भाजून पोळून मी पैल निघालो. जीव त्यागावा या हेतूने निश्चक्र उपोषणास बसलो, तो पूर्वजांच्या पुण्याईचे फळ अलगत हाती आले. वृत्ती स्थिरावल्या, माझ्या मनाच्या फाटक्या झोपडीत श्रीहरीने प्रवेश केला!*

*आणि मुखावाटे संकेताविना ईश्वरीय फुटू लागले. मीही चमत्कारलो. हे असे अद्भुत काय म्हणून घडते ते आरंभी ध्यानी येईना! पण मजला न जुमानता ते बाहेर येऊ लागले.*

*मग श्रीगुरूंची कृपा झाली. वाहत्या पाण्याला येक वळण लाभले.*

*त्या क्षणी मी ओळखिले, की आता या ईश्वरी प्रसादास हे दुर्बल शरीर वापरु दिले पाहिजे. ना म्हणता कामा नये. मी तो प्रवाह मुक्त मनाने वाहू दिला. मजला ठावकी होते, की ही रचना मी करीत नाही, तर ही अपौरुषेय आहे! जणू ही वेदवचनेच आहेत. मी केवळ त्यांचे वाहन आहे! आरे माझ्यांनो, तर हा ईश्वरीय प्रतिभेचा झोत सहन न होऊनच इंद्रिये विकल होऊ पाहताहेत. तुम्हास मी म्हातारा झालेलो पहावयास हवा आहे काय?*

*अरे, हे मृण्मय आहे, ते ज्याचे त्यास परत करावे लागणार. माती मातीला मिळेल, जळास जळ, आकाशी आकाश!*

*आणि मग सावधपणी, इंद्रिये सजग आहेत तोवरीच हे ज्याचे त्यास का सोपवू नये?*

*मोठे बळ करून म्या पुसले,*

*"तुम्ही देह त्याग करणार आहात काय?"*

*म्लानसें हसून तुकोबा बोलले,*

*'देह त्याग म्हणजे काय ते मला ठावकी नाही संतू! मात्र*

*आता संदेश येऊ लागले आहेत. कोणी एक देवदूत खुणावू लागला आहे, की मुहूर्तवेळा भरत आली आहे.''*

*तुकोबा उभे ठाकले. दोन्ही हात उभावून ते उंच स्वरात म्हणू लागले, यापरते काय मिळवायचे असते? की,*

*घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हाती ।*
*मुक्ता आत्मस्थिती सांडवीन ।।*
*ब्रह्मीभूत काया होतसे कीर्तनी ।*
*भाग्य तरी ऋणी देव ऐसा ।।*
*धन्य म्हणवीन इहलोकी लोकां ।*
*भाग्य आम्ही तुका देखियेला ।।*

*ही पूर्णस्थिती आहे, ही परमगति आहे, तापसे यासाठी श्रमत असतात. जन्ममृत्यूचे दारवंटे वलांडित असतात. तो हा ठेवा माझे हाती आला आहे.*

*कृतकृत्य झालो । इच्छा केली ते पावलों ।*
*आता विनाकारण मी येथे रेंगाळू कशासाठी?*

स्वर्गीय आप्पा आपल्या ज्या तीन कादंबऱ्यांना 'प्रस्थानयत्री' म्हणत त्यातील ती तिसरी कादंबरी 'तुका आकाशाएवढा'. महाराष्ट्राच्या भक्तिसंप्रदायातले श्रीसंत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास

आणि सद्‌गुरू तुकाराम महाराज हे तीन गरुडखांबच. त्यांच्या जोडीला संत एकनाथांचा एक खांब धरला तर या चौखांबीवरच महाराष्ट्राच्या भक्तिसंप्रदायाचे मंदिर उभे राहिलेले. म्हणून तर 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' असे वर्णन केले गेले. या चारही संतांच्या कार्याचा, त्यांच्या अभंगाचा आणि ज्या काळात त्यांनी साहित्यनिर्मिती केली त्या काळाचा परामर्श घेतल्याशिवाय महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा अभ्यास पूर्ण होत नाही. त्यातही ज्ञानेश्वर आणि तुकाराम या दोन महानुभावांनी केलेले आध्यात्मिक कार्य आणि समर्थ रामदास आणि संत एकनाथ यांनी केलेली सामाजिक क्रांती हे महाराष्ट्राच्या इतिहासातलं एक निखळ सोन्याचं पान आहे.

जगद्‌गुरु तुकाराम महाराजांच्या कौटुंबिक जीवनाविषयी, त्यांच्या व्यवसायाविषयी सर्वसामान्य माणसाला माहिती असत नाही. ज्या काळात तुकाराम महाराजांनी अभंगरचना केली त्या काळच्या सामाजिक स्थितीविषयीसुद्धा आपल्याला नेमकी माहिती असत नाही. हा सर्व तपशील स्व. आप्पांनी या कादंबरीत सविस्तर व अतिशय परिणामकारकरीत्या वर्णन केले आहे. चांगल्या खात्यापित्या घरातले तुकोबा, आई

वडिलांच्या मृत्यूनंतर अकाली मोठेपण आलेले, घरचा व्यवसाय नेकीने सांभाळणारे तुकोबा. पुढे आलेल्या दुष्काळामुळे झालेली घराची अन्नान्न दशा, पहिली बायको व तिचा मुलगा यांचे उपासमारीने झालेले मृत्यू पाहणारे तुकोबा, पुढे आत्मसाक्षात्कार झाल्यावर अभंगांची निर्मिती करणारे तुकोबा, अभंगांच्या वह्या इंद्रायणीच्या डोहातून तरल्यानंतरचे तुकोबा असे त्यांच्या आयुष्यातले नाना प्रसंग स्व. आप्पांनी तुकाराम महाराजांच्या मनातील उठणाऱ्या वादळांसह इतक्या समर्थपणे लिहिले आहेत की, क्षणभर वाटावे त्यावेळच्या एखाद्या वारकऱ्यांच्या स्वरूपात आप्पा तिथे हजर होते की काय?

या सर्व संतांच्या अवतारकार्याचा समाप्तीनंतर आज शेकडो वर्षांचा कालखंड उलटूनही त्यांनी निर्माण केलेल्या भक्तिसंप्रदायाची परंपरा, त्यांनी निर्मिलेले साहित्य हे आजही प्रचलित, उपयुक्त आणि मार्गदर्शकही आहे. आपल्या सांस्कृतिक इतिहासातील तो एक अमूल्य ठेवा आहे. ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकाराम गाथा आणि एकनाथी भागवत या ग्रंथांचा अभ्यास आणि पारायणे ही आजही नित्य व नैमित्तिक स्वरूपात केली जात आहेत. पण दुर्दैवाने त्यांच्या या अक्षर वाङ्मयाकडे

हेतूपूर्वक डोळेझाक करून त्यांच्या क्षर देहाचे काय झाले याचाच शोध घेण्यात आजही काही तथाकथित प्रज्ञावंत मंडळी गुंतली आहेत.

या कादंबरीच्या यशस्वितेचे एक रहस्य स्व. आप्पांच्या जीवनातच सापडते. ज्या भामचंद्राच्या डोंगरावरील गुहेत तुकाराम महाराज ध्यानासाठी जाऊन बसत त्याच भंडाऱ्या डोंगरावर काही महिने वास्तव्य करून स्व. आप्पांनी तुकाराम गाथेचा अभ्यास केला होता. त्यामुळे त्या ठिकाणची, त्या परिसराची आप्पांनी केलेली वर्णने ही त्यांच्या अनुभूतीतून आलेली आहेत आणि तो अनुभव जसाच्या तसा आप्पांनी आपल्यापर्यंत आणून पोचवला आहे. तो आत्मसाक्षात्काराच्या अनुभूतीचा आनंद आपण सर्वांनी या कादंबरीच्या माध्यमातून मनसोक्त लुटावा असे वाटते.

खरा ज्ञानी विनम्रच असतो. फळांनी लगडलेले झाड नेहमी वाकलेलेच असते.

'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदू' ऐसे म्हणणारे तुकोबा

'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनी वहावा भार माथा'

म्हणणारे तुकोबा

‘दया तिचे नाव । भूतांचे पालन । आणि निर्दालन कंटकांचे’

म्हणणारे तुकोबा

‘भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठळाचे माथा हाणू काठी!’

म्हणणारे तुकोबा

‘विंचू आला देव्हाऱ्याशी । देवपूजा नावडे त्यासी

तेथे पैजाराचे काम । व्हावे अधमासी अधम ।’

म्हणणारे तुकोबा हळुवार होतात तेव्हा मात्र

‘शेवटची विनवणी । संतजनी परिसावी

विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हासी


आता फार बोलो कायी । अवघे पायी विदित

तुका म्हणे पडतो पाया । करा छाया कृपेची ।’

म्हणतात तेव्हा मात्र

‘अणुरेणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा’

म्हटल्यावाचून राहवत नाही.



# बया दार उघड

*पंधरवड्यापूर्वीच भीमा अन् भामा यांच्या तीरावरचं जीवन उद्धवस्त करीत, त्यांच्या चिंधुट्या गगनांतरी उडवीत दिल्लीकर पाच्छाचं सैन्य बागलाणातून विजापूराकडे निघून गेलं होतं. मागं उभ्या होत्या त्याच्या वाटचालीच्या खुणा. शेतांमधून ज्वारीची केवळ सरमाडं उरली होती. उंटांनी खाऊन खाऊन सगळ्या झाडांचे नुसते खराटे करून टाकले होते. बाभळी, येकळी, सौंदडी, हिवर, शमी झाडून सगळं काटेरी झुडूप त्यांनी संपवलं होतं. वड पिंपळावर एक पान उरलं नव्हतं. हत्तींना खाण्यासाठी त्या महारुखाचे शेंडे अवघे खंडून टाकले होते. रानांना अवकळा आली होती. ओझी वाहणारे बैल मेले, त्यांच्यावर गिधाडं फेऱ्या घालीत होती. भरीला खाटकांनी सैन्यासाठी कापलेल्या गुरांचे सांगाडे रानभर पसरले होते. सापडेल ते जनावर खाटकांनी सुरीखाली धरण्यास सुरुवात केली. गाय, वासरू, गोऱ्हा, बैल, शेळी, मेंढी काही काही पाहिलं नव्हतं. त्या सगळ्या सांगाड्यांची दुर्गंधी रानभर पसरली होती.*

आई भिवरेच्या तीरावर छोटी छोटी गावे वसलेली, कधीकाळीची. पाणवठ्यावर बांधलेले सुबक लहानुले घाट, त्यांच्या शेजारी मराठमोळी ठेंगणी रावळे, समोर पिंपळाचे पार. गावाशेजारी आंबराया. येत्याजात्यावर पालवीच्या चवऱ्या ढाळीत उभे असलेले निंब, असं सगळं शांत, स्वस्थ जीवन. पण आता तिथं महामारी येऊन गेली होती. घरं मोडली होती, भिंतीतून लपवून ठेवलेलं सोनं नाणं हुडकण्यासाठी कौलारं उसकटून भिंती पाडल्या होत्या. खळी लुटली होती. मोठमोठ्या जागी उरले होते राखेचे अन् कोळशांचे ढिगारे.

भल्याभल्या आबरू सांभाळून राहिलेल्या घराण्यांची धूळधाण झाली होती. लेकी, सुना चव्हाट्यावर ओढल्या होत्या. त्यांच्या किंकाळ्या हवेत विरल्या होत्या. बऱ्या दिसल्या त्या अफगाणांनी बरोबर नेल्या होत्या. बाकी काळ्यासावळ्याचं शरीर भोगून झाल्यावर त्यांना कुत्र्यावाणी ओढून वाटेच्या कडेला टाकून दिलं होतं. त्यातल्या कितीकींनी जिभा हासडून प्राण दिले होते, कितींनी आई भिवरेच्या डोहात आश्रय घेतला होता.

गडी आडवे आले ते कापून काढले होते. कितीक बरोबर वागवले होते. तोफांच्या गाड्या ओढण्यासाठी पायी साखळदंड

*अडकवले होते. म्हातारी कोतारी पेटल्या घरांमधून टाकून दिली होती. पोरं चेंडूसारखी बावीविहिरीतून भिरकावली होती. किती मावळ्यांचे मुडदे रानातल्या झाडावरून लटकत होते. स्मशानानं मान खाली घालावी, अशी अवकळा चहूकडे उधळवीत पातशाही सैन्य दक्षिणेकडे निघून गेलं होतं. अन् खेडजवळ भिवरेच्या तीरी उदासवाणा सिद्धेश्वर अजून महासमाधीतून उठला नव्हता. त्याचा तिसरा डोळा अजून उघडला नव्हता, त्याचं आत्मलिंग यवनांनी फोडलं असूनदेखील!*

शिवजन्मापूर्वीचा साडेतीनशे वर्षांचा इतिहास हा महाराष्ट्रातील अभ्यासकांचा विषय असला तरी सर्वसामान्यांना या इतिहासाचा गंधही नव्हता. त्या काळातील भयाण कालखंडाचा, भाऊबंदकीचा, वतनांसाठीच्या कापाकापीचा अस्मानी आणि सुलतानी संकटांचा, लाचारीचा, मुजोरीचा परीचय करून देणारं, त्या साऱ्या कालखंडाचं यथार्थ दर्शन घडवणारं, त्यावेळच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक उलथापालथीचं दर्शन घडविणारं लेखन कुणीतरी तितक्याच समर्थपणानं करणं आवश्यक होतं. कारण त्याशिवाय शिवजन्माला आणि त्यांनी केलेल्या कार्याला तत्कालीन इतिहासात काय मोल आहे हे

समजलंच नसतं, म्हणूनच पावनखिंडीसारख्या पवित्र ऐतिहासिक ठिकाणी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांनी स्व. आप्पांकडे या कालखंडावर आधारित पाच कादंबऱ्या लिहायचं वचन घेतलं. त्या वचनाच्या पूर्ततेतलं आप्पांनी टाकलेलं पहिलं पाऊल 'बया दार उघड.'

बाबासाहेब पुरंदऱ्यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे शिवकालीन इतिहास हा या कादंबऱ्यांचा नायक आणि शिवकालीन समाजस्थिती ही या कादंबऱ्यांची नायिका. त्या काळातील वतनप्रियता, सुलतानी राजवट, सामाजिक संकेत ही सारी कादंबऱ्यातील इतर पात्रं. निजामशाहीचा अस्तकाल ते शिवसूर्याचा उदय हा या पहिल्या कादंबरीचा कालखंड. राणोजी देशमुख हे या कादंबरीतील मध्यवर्ती पात्र. तो जिजाऊसाहेबांचा दौलतबंकी. त्याच्या घरच्या झालेल्या दुर्दशेतून तत्कालीन सारा इतिहास व समाजस्थिती आप्पांनी या कादंबरीत रेखाटली आहे.

*बिबेवाडीलाच हंसायचं काही कारण नव्हतं. भल्याभल्याच्या आबरूची ही अशीच धुळधाण झाली होती. थोर थोरांच्या मिश्यांचे आकडे खाली वळले होते. भवतालची किती नामवंत*

घराणी, तोलामोलाची. आपल्या कुळीची परंपरा पार रामकृष्णापर्यंत नेऊन भिडवणारी. पण त्यांच्या इज्जतीच्या अक्षरश: चिंध्या होऊन गगनांतरी उडत होत्या.

कुणाघरची देखणी तरणीताठी सून गर्भाधानाच्याच रात्री उचलून सुभ्याकडे रवाना झाली होती. कुणाच्या गोठ्यातले नामांकित बैल कसायाच्या सुरीखालून जाऊन मियाँबीबीच्या पोटात पोचले होते. कुणाच्या उत्तम फळबागा लुटून झाडांचा सत्यानाश केला होता. कुणाचा वाडाहुडा पार धुळीला मिळाला होता. कुठं कुणी जरासा प्रतिकार करायचं मनी आणताच पेटत्या चुडींनी ते गाव फुंकून टाकलं गेलं होतं.

कारण अगदी साधं होतं. उत्तरेतून दिल्लीच्या पातशहाच्या सैन्याच्या शहाजणांचे आवाज वारंवार कानी पडत होते. आपली सद्दी आहे तोवर हाती लागेल ते भोगून घ्या. उद्याचं कुणी पाहिलं आहे. पळवा, लुटा, जबरदस्तीनं हिरावून घ्या. बळजबरी करा, शेवटी न मिळालं तर पेटवून द्या. असा साधा सरळ हिशेब निजामशाही फौजेच्या मनी वागत होता. अशा अकाळअभ्रांच्या सावलीत ही बारा मावळं नांदत होती. खिन्न मनानं काय करावं ते न आकळून.

वर वर्णन केलेली अवस्था ही साऱ्या महाराष्ट्राचीच अवस्था होती. याला कंटाळून दुसऱ्या वेळेस गर्भवती असलेल्या जिजाऊसाहेब जेव्हा शिवनेरीवर शिवाईच्या दर्शनाला आल्या, त्यावेळचे त्यांचे मनोगत आप्पांनी आपल्या समर्थ भाषेत रेखाटताना लिहिलं,

*'फार प्रयत्नांनी आईसाहेबांनी स्वतःला सावरलं, त्या हळूहळू माता शिवाईच्या रावळासमोर पोहोचल्या. जुती त्यांनी बाहेर काढून ठेवली. पटकन् राणोजीनं ती उचलली अन् उराशी धरून बाहेर उभा राहिला. आईसाहेब रावळात शिरल्या. गुरवानं फुलांची परडी पुढं केली. त्यातली चार कन्हेरीची फुलं उचलून त्यांनी आईच्या मूर्तीवर वाहिली, अन् मग दाराला टेकून आईकडे पाहात अलगद खाली बसल्या. मनोमनी म्हणू लागल्या...*

*'वारंवार तुला काय सांगावे गे माते!*
*आता बहु झाले,*
*येकच मागणे आहे की, या खेपेस देशील तो पुत्र दे*
*मज लेकीच्या मनीचे तर अवघेच तुजला ठावे आहे.*
*ते कोड पुरवील, असा पुत्र दे!*

*धरित्रीमंडळास झालेला भार दूर करील असा पुत्र दे!*

*अभिमन्यूसारखे समर गाजवील, असा पुत्र दे!*

*तुझ्या यशाचा डंका त्रिखंडी वाजवील, असा पुत्र दे!*

*दैत्यकुळीचा संहार करील असा,*

*त्यांच्या छात्यांवर आपल्या हातींच्या खड्गाचे वार करील असा पुत्र दे!*

*अन् हे माझ्या मनीचे गुज तुला पुरवणे नसेल,*

*तर, आई गे! जिरून जावो हा गर्भ!*

*उदरी करंटा जन्मण्याऐवजी मुसळ जन्मलें तें पुरवले!*

*आईसाहेबांनी शिवाईच्या उंबरठ्यावर आपला पदर अंथरला, त्यावर मस्तक टेकलं, त्यांच्या डोळ्यांतून धावलेल्या ऊन ऊन आसवांनी उंबरठा ओला गच्च झाला.*

*आईसाहेबांइतकाच समाजातला प्रत्येक घटक या घडीसाठी आतुर झाला आहे.*

*एक्या झापाजवळ पोतराजानं बारदाना उघडला आहे. कोरड्याचा फटका अंगावर वाजवून तो किंचाळतो, ''बया दार उघड, बया दार उघड । मरीमाता बया दार उघड, लक्ष्मी आई, बया दार उघड ।'' तरी बाईला काही देव्हाऱ्याचा*

दरवाजा उघडत नाही. देवीसमोरचा नित्याचा चौघडा झणाणून थांबला. चहुकडे दिवे पाजळले. खोलीतील दासींची धावपळ वाढली. एकदोन वैद्यबुवा आत गेले, अन् पुन्हा बाहेर आले. किल्लेदार स्वत: डोकावले. किल्लेदारीण बाईंनी दाराशी येऊन सांगितलं.. ''चिंता करणें न लगे !''


अशी उत्सुकता कळसास पोहोचली, तो एक दासी अंगी पिसं भरल्यावाणी आतून बाहेर धावत सुटली. बावरा झालेला राणोजी तिला आडवा होऊन विचारू लागला, पण त्याला झटका देत ती पळतच किल्लेदारांपाशी पोचली, आणि धापांना आवर घालीत कशीबशी बोलली, ''मुलगा! धनी मुलगा!!''

आनंदलेल्या किल्लेदारांनी इशारा करताक्षणी शहाजणं, नगारे, सूर, बंबाळ असा सगळा गड गर्जू लागला. तटातटावरून भरून ठेवलेल्या तोफा धडाडू लागल्या.

मोहरलेल्या राणोजीनं थरथरत बाळंतखोलीकडे मोहरा वळवून मुजरा केला अन् तो हरिणाच्या गतीने रावळाकडे धावत सुटला.

त्या क्षणी गुरवानं गाभाऱ्याचं दार उघडलं. आत उभी असलेली मातेची मूर्ती समयांच्या प्रकाशानं झळाळत होती.

*राणोजीला जाणवून गेलं की, शेवटी बयानं दार उघडलं आहे! तिच्या मुद्रेवरचा गंभीर भाव मावळला आहे. जणू आता ती प्रसन्न आहे. कृपाळूपणे लेकराकडे पाहते आहे.*



# हर हर महादेव

*मध्येच दादोजींचं वाक्य तोडून आईसाहेब बोलल्या, 'पण शिवबा, सगळे असले आणि नैतिक अधिष्ठान नसले, तर करायचे काय ते राज्य! शृंगारलेले मढे!''*

*चकित होऊन धाकल्या राजांनी आऊसाहेबांना पुसलं, 'मग राज्य कशाने पूर्ण होते आऊसाहेब?' आऊसाहेब गर्वभराने म्हणाल्या,*

*''आयाबायांचे मनी भरवसा असला पाहिजे शिवबा, की हे तो आमचे राज्य. आम्ही मुक्त मनाने वृक्षास दोर बांधून, त्यावर झोके घेऊ, गाणी गाऊ, देवासमोर फेर धरू! डोक्यावर हंडे घेऊन दो चौघीजणी मिळून पाणी आणावयास जाऊ. नद्यांच्या घाटावर मोकळेपणी बसू. अंगे धुऊ, एकमेकींच्या अंगावर पाणी उडवू, थट्टा करू, कुणी वडिलधारे दिसताक्षणी मर्यादे करून मस्तकावरचे पदर सरसे करू. अशा निर्भय मने चहूं दिशांस वावरू, तर कुणाचे दिलांत असे साहस उपजों नये, की आम्हाकडे वाकडी दिठी उचलून बघे!''*

*यास परिपूर्ण राज्य म्हणावे शिवबा! आणि परिपूर्ण राज्य*

*त्यास म्हणावे की, जेथील तीर्थक्षेत्रे श्रद्धावंतासाठी सदैव मोकळी आहेत. जेथे रंजल्यागांजल्यास अभय आहे. जेथे दासदासींवर तेवढीच दया, जेवढी स्वकीय स्वजनांवर! एकास एक आणि दुसऱ्यास दुसरे, असा आपपरभाव जेथे नाही. तेथे रानी राहणाऱ्या ठाकराचे मनी अन् रामोश्याचेही मनी हा भाव जागतो, का हे तो आमचे राज्य! हे राखले पाहिजे. यासाठी प्राण तृणप्राय मानले पाहिजे! हे राज्य यावश्चन्द्रदिवाकर नांदावे. या कामी आपली जीविते याच्या तळी आंथरली पाहिजेत!*

*''हे भाव मनी जागले नाहीत आणि प्रजेला वाटत राहिले की, निजामशाही, अदिलशाही तशी ही भोसलेशाही! अणुमात्राचा फरक नाही, तर मग व्यर्थच आयांची कुस शिणवली! गढूळ पाणी वाहतेच आहे. त्यात हाही सांडपाण्याचा आणीक एक प्रवाह जावोन मिळाला. यापरते काहीच नाही!*

शिवकालीन इतिहासावरची स्व. आप्पांची ही दुसरी कादंबरी, हर हर महादेव. पहिल्या कादंबरीत, 'बया दार उघड' मध्ये शिवजन्मापूर्वीपासून ते शिवजन्मापर्यंतचा कालखंड स्व. आप्पांनी सविस्तर रेखाटलेला. 'हर हर महादेव' मध्ये शिवाजी महाराज

व आऊसाहेब यांच्या पुणे मुक्कामापासून ते तोरण्याच्या विजयापर्यंतचा कालखंड तपशीलवार मांडला आहे.

खऱ्या अर्थाने स्वराज्याचे बीजारोपण कसे झाले? ही स्वराज्याची संकल्पना शिवबाच्या मनी जिजाऊसाहेबांनी व शहाजीराजांनी कशी निर्माण केली? रुजवली? त्याला संस्काराचे कसे खतपाणी घातले? सह्याद्रीने या उद्योगात शिवबांना व आऊसाहेबांना कसे सहाय केले? या जहागिरीतल्या खेड्यापाड्यातील जनता या उद्योगाच्या पाठी कशी येऊन उभी राहिली? त्या जनतेच्या मनात ही स्वराज्याची संकल्पना शिवबांनी कशी निर्माण केली? या सर्व घटनांचे तपशीलवार वर्णन या कादंबरीत आप्पांनी केले आहे.

*आपलं एखाद्या होडीसारखं आकाशात फैललेलं शिखर उंचावून मुरुंबदेवाचा डोंगर अगदी समोर उभा होता. अन् त्याच सोंडेवर मावळत्या अंगाला बेलाग तोरणा!*

*सूर्य त्याच्या पलिकडे उतरत होता, त्यामुळे तोरण्याची भव्य आकृति आकाशात उंच चढलेली दिसत होती. क्षीरसमुद्रातून मंदराचलानं डोकं वर काढावं तशी. जी काय त्याची ऐट! जो काय त्याचा दिमाख!*

*त्याचा वरचा भाग दोन्ही हात क्षितिजावेरी पसरून ऐसपैस उभा होता. मावळत्या अंगाला उंचच्या उंच बुधला मधेच डोकं काढीत होता. मावळतीच्या प्रकाशात तोरण्याची तटबंदी अस्पष्ट दिसत होती. पण त्या तटबंदीविनाही त्याची मजबुती लक्ष वेधून घेत होती.*

*तोरणा जणू हिंमतबाजांना आव्हान देत होता. आव्हान कुजबुजत तोरणा उभा होता. कुजबुजत अशासाठी होता की, त्याच्या छाताडावर गुलामीचं निदर्शक निशाण फरारत होतं. ते त्याला तोंड उघडू देत नव्हतं. तोरण्याची मुस्कुटदाबी चालविली होती त्यानं. त्याचा श्वास रुकत नव्हता. त्यात अडथळा येत होता. त्यामुळे तो अस्वस्थ होता. एवढा थोरला बलदंड दुर्ग असूनही त्या एक्या निशाणानं त्याची अशी दुर्दशा करून टाकली होती.*

*ते साधं निशाण नव्हतं. त्यामागं सुलेमानी अन् खुरासानी तेगीची अधिसत्ता होती. आरबी घोड्यांच्या उन्मत्त टापांबरोबर तिचे बी इये देशी पेरलं गेलं होतं. या देशाच्या निरपराध वतनदारांच्या रक्तापाण्यानं ते वाढत होतं. भावबंदकीचं अन् आपसी दुफळीचं खतपाणी लाभून ते चहू अंगांनी पुष्ट होत*

*होत असे ते विषारी पीक तोरण्याच्या दाही बाजूंनी कोंदाटलं असल्यामुळे त्याचा कोंडमारा झाला होता. त्याचा बुलंद आवाज कोमाइला होता. तो अस्वस्थ झाला होता.*

*अन् ह्या सोनेरी संध्याकाळी, जेव्हा प्रकाशाचा कुंचला सर्वत्र जादू करून गेला होता. तेव्हा तो कुणी एक येऊन पैलच्या भुलेश्वर रांगेच्या माथ्यावर उभा ठाकला होता. तोरण्याचं मनोगत त्याला आकळलं होतं.*

कोंढणपूरच्या देवीच्या जत्रेला स्वत: राजे जातीने हजर राहतात. त्यामुळे त्या जत्रेत एक चैतन्य निर्माण होते. जत्रा उधळायला आलेला शाही अंमलदार अपमानित होऊन परततो. आजपर्यंत कधीही न घडलेले आक्रित घडून येते. जे घडलं त्यावर भाष्य करण्यासाठी त्या जमलेल्या लोकांना उद्देशून लहानगे शिवाजी महाराज म्हणतात,

*''बारा मावळातले वतनकरी मावळे हो*

*काय झाले ते अवघ्यांनी निरखलेच आहे. झाले काय, तर तुमच्या आमच्या माताभवानीचा उत्सव बंद पाडावयास आलेल्या अंमलदारास परतावे लागले. तुम्ही दुसरे काहीच केले नाहीत. येक मेळ करून, येक निश्चय हृदयी धरून, माना उंचावून*

*उभे ठाकलेत!''*

*''मावळेहो, दु:ख फार दिवसांचे! हे आम्हा सर्वांचे वतन, आमची शेती-पोती, आमच्या मातामाऊली, आमच्या आऊतबारदाना, आमची देवळेरावळे हे अवघेच तर आमचे आहे. दुसऱ्यास बोट शिरकावयास निमित्यच काय?''*

*''पण गेली कित्येक वर्षे हा अन्याय सहन करीत आलो! आज उजाडले, आम्हास कळो आले की, धर्मन्याये करून वर्तत असता कोणही आडवायास धजत नाही. आलाच तर फजीत पाऊन परत जातो. केवळ येकजुटीने, येका मुठीने आमच्या इभ्रतीचे रक्षण करावयास सामोरे झाले पाहिजे!''*

*''इतकी वर्षे एकमेकांशी झुंजत होतो, एकमेकांच्या नरडीवर पाय देण्यात मश्गुल होतो. आता बरे कळो आले, की क्षेम एकमेकांचे शत्रुत्व करण्यात नाही, तर अन्यायाविरुद्ध एकमेकाने एकगोट करून उभे ठाकण्यात आहे.''*

*''आम्ही तो आजून मूल. आम्हास अधिक उमगत नाही. पण आपणास एवढा एतबार देणे आम्ही आमचा फर्ज मानतो, का असा गोट बांधून एल्गार बांधायचा मौका आला आणि आपण आम्हास कोण्या पोरासोराहाती नुसता सांगावा धाडलात,*

*तर आमचे बळ आपल्या पाठीशी उभे ठाकेल!''*

*''हे डोंगरडांगर तुमचे आमचे वतन, येथील देवळेरावळे आम्ही जीवापाड जपावयाजोगी. या देशी आमचे आम्ही पिकवू, आमचे आम्ही खाऊ. या काळीशी इमान राखून आमचे आम्ही जगू. हिच्यापायी आम्ही मरु.''*

*''या परते आणखी सांगावे ते किती? आपण सारे तर सूज्ञच असा!''*

*श्वास रोखून अवघे मावळे राजाचं बोलणं ऐकत होते. राजे थांबताच अवघ्या मुखातून गर्जना फुटली, ''अंबाबाईचा उदे... उदे!''*


खरोखरच शिवकालाचा आणि शिवचरित्राचा आवाका लक्षात घेता तो सारा कालखंड, ती सारी समाजस्थिती, ती वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे एका सूत्रात गुंफून, इतिहासाशी इमान राखून कादंबरीचे लेखन करणे हे खरोखरच एक मोठे आव्हान होते. वाङ्मयीन प्रतिभेच्या जोरावर स्वतःच्या कल्पनाविलासाला वाव देऊन कणभरही अनुभव नसलेल्या लोकांनी लिहिलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे उदो उदो भरपूर झाले. त्यांनी केलेल्या इतिहासातील घटनांच्या मोडतोडीलाही आख्यानांचे स्वरूप

प्राप्त झाले. पण खऱ्या इतिहासाला सामोरे जात, त्यातील कागदपत्रांशी झटा्या घेत सारा मुलुख, किल्ला न् किल्ला, मावळ न् मावळ पायाखाली तुडवत, अनुभवांचे गाठोडे पाठीवर बांधून इतिहासाशी इमान राखत ज्या कादंबऱ्या आप्पांनी लिहिल्या त्याची समाजाला जाणही असू नये याला आपण काय म्हणणार? मुळात अस्सल शिवकालीन कागदपत्रांची संख्या अगदीच कमी. त्यातून तर्कसंगत पद्धतीने त्या सगळ्या कागदपत्रांचा अर्थ लावून त्यानुसार ललितलेखन करणे हे मोठे अवघड काम. म्हणूनच या कादंबरीच्या प्रस्तावनेत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांनी लिहिलं आहे...

*इतिहास व ऐतिहासिक कादंबरी यात फरक असणारच. इतिहास बराचसा अबोल असतो. तो फार थोडे बोलतो. अधूनमधून बोलतो. त्यामुळे गतकालाचे सलग, अखंड, सुसंबद्ध व सुस्पष्ट असे चित्र आपल्याला इतिहासातून, विशेषतः शिवकालीन इतिहासातून लाभत नाही. हे अस्पष्ट रंग व रेषा अभ्यासातून व सुसंगत तर्कातून भरायचे व गतकालाची ओळख पटविणारे चित्र रंगवायचे काम ललित लेखकाचे असते. लालित्य सांभाळून ही तारेवरची कसरत त्याला करायची*

*असते. आप्पासाहेब दांडेकर यांनी ही कसरत सफाईने केली आहे. त्यांना चढतीवाढती पदवी पावली असे!*

आजच्या घडीला शिवकालीन इतिहास कसा प्रेरक, मार्गदर्शक आणि अनुकरणीय आहे हे समजावून सांगण्याची जी गरज आहे ती गरज अतिशय सोप्या शब्दांतून, तो इतिहास वर्णन करणाऱ्या आप्पांच्या या कादंबऱ्यांनी भागवली आहे यात तिळमात्र शंका नाही. तो सारा कालखंड आपल्या डोळ्यांसमोर एखाद्या विस्तृत नकाशासारखा उलगडून दावून आपल्याला नेमके कुठे व कसे जायचे आहे हे अचूक मार्गदर्शन करणाऱ्या स्व. आप्पांच्या प्रतिभेला, अभ्यासाला, कष्टाला, त्यांच्या इतिहासाविषयीच्या प्रेमाला मानाचा त्रिवार मुजरा, त्रिवार वंदन!!



# दर्याभवानी

राजांनी पुनः मायनकाकडे वळून पुसलं,

*‘मायनाक, दरिया बहुत भला मित्र, हे खरं काय?’*

*‘अगदी बरुबर महाराज. दर्यावानी दोस्तदार मिलियाचा नाय. न्हानन्हान होडगी घेउन मासली पागायला मच्छिमार खोल दरियात जातात. ते कुनाचा भरवसा धरुन? वरती आस्मान खाली पानी, या परता काय दिष्टिस पडायचा नाय. त्यात आस्मानांत खार आसली म्हंजी तो दरिवजा पर बंद. निस्ता कुंद! सास पर घोटाया लागतो. अशा अवेली दिखिल दरियाच्या मांडीवर डोका टेकवून मच्छिमार निचिंत असतात.’*

*‘आता जौलांचा पुसाल तर जौला काय जिमिनीवर होत न्हाईत?’*

*राजे हरखून म्हणाले,*

*‘बोला मायनाक! बोलत राहा! बहुत भले बोलताहात!’*

*मुजरा करून मायनाक बोलू लागला.*

*‘आमची न्हाननन्हान पोरां-त्येला लंगुटी लावायचा पर कलत न्हाई, तवापासून ती पान्याशी खेलतात. त्यांचा उनाडना,*

*धिंगामस्ती सगली दरियावर. आयशी मारायला धावली, तर पोरटा होडी काढून दरियांत पलून जानार! लगीन झालां, का दोगा मिलून दरियाला नारल द्यायला दरियांत जानार. परपंचात काय पर दुकलासुकला, तर येकलाच होडगा घेउन दरियांत निंगनार. सगला सुकदुख त्यालाच सांगनार. वर आस्मानांत तारेगिरे चमकत असनार, दरयांत मासलीचा चमचमाट. बाकी मंग सगला कसा शांत. आनी मरना? जो जिमिनीवर मेला, तो खारवी फुटक्या नशिबाचा. मरायचा आसल तवा दरियावर असावा. आस्मनाचा पांगरुन. दरियाचा हातरुन. मतलयाचा एक झोका येनार नी आपल्याबरुबर परान घेउन जानार! यापरीस दुसरा भाग्ये आमाला ठावा नाय म्हाराज!' कांही क्षण मायनाक गप्प बसला अन् मग एकदम उसळून बोलू लागला,*

*'पर या चाच्यांनी मेल्यांनी असा सुखाचा मरना पर मुश्कील करून टाकला! कसा निचिंत होता दरिया, पर आता काय भरवसा उरला नाय! कवा हे भूत येताल उगवतील आन कवा खारव्यांचे मुरदे दरियांत माशांना खायला टाकून लुटमार करून निंगून जातील, तो काय सांगता येत नाय! येरवी*

*दरिया मंजी म्हाएराची वाट हुती. पर या मेल्यांनी निस्ता वाटुला केला त्या वाटेचा. सगलाच मसनवटा झाला. वल्हा पान्यांत बुडवायला निंगाला, का चहू अंगानी भेव जसा खायला येतोय!'*

*एवढं बोलला, अन् मायनाक वारंवार डोकं टेकीत म्हणाला, 'महाराज, गाऱ्हाना माजा येकल्याचा नाय. हा सगल्या कोकनपट्टीचा दुखना हाय! बाराबंदर कोकन तुमच्या दाराशी उभा हाय असा समजा, काय पर करा! कोकनाच्या लेकीबाळींची कनव हाय ही म्हाराज! त्येंची येतीजाती वाट सुकाची करुन द्या!'*

*राजे गंभीरपणे बोलले,*

*''एवढी कणव भाकायची गरज नाही, मायनाक! आमचा फर्जच आहे तो. त्या लेकीसुनांच्या साहाय्यास आम्ही न धावलो, तर मग वृथाच आऊसाहेबांचे पोटी जन्म घेतला! त्यांची कूस उगाच शिणविली.''*

आरमार हे स्वराज्याचे एक प्रमुख अंग आहे हे ओळखून त्याची निर्मिती व विकास शिवाजी महाराजांनी कसा घडवून आणला हे विशद करणारी आप्पांची ही शिवकालावरची

तिसरी कादंबरी ‘दर्याभवानी’.

बाराव्या शतकातील अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिणेवरील स्वारीनंतरही टिकून असलेल्या कोकणातील लहान लहान सत्ता नंतरच्या काळात एकेक करून पराभूत होत गेल्या आणि आदिलशाही, विदेशी पर्यटकांच्या रूपाने आलेले डच, पोर्तुगीज आणि इंग्रज, जंजिरेकर सिद्दी हे सगळे पापग्रह एकवटून कोकणच्या कुंडलीत शिरले आणि बेबंद सत्तांनी कोकणची पार वाट लावून टाकली. या सत्ता कोकणात स्थिर होण्यापूर्वी कोकण कसं वैभवशाली होतं. नंतरच्या कालखंडात कोकणचं स्मशान झाल्यावर त्याच्या आणि आरमारच्या विकासासाठी महाराजांनी केलेले प्रयत्न आपल्या माणसांकरवी कोकणची केलेली पाहणी, त्यानंतर योजनापूर्वक केलेली कोकणवरची स्वारी, कल्याण-भिवंडी जिंकून तिथे उभे केलेले जहाज बांधायचे कारखाने, समुद्रावरील चाच्यांचा महाराजांच्या आरमाराने केलेला बंदोबस्त असं सारं या कादंबरीत आप्पांनी रेखाटलं आहे.

महाराजांच्या जावळीवरील स्वारीपासून म्हणजे इ.स. १६५६ पासून ते अफजलखान वधापर्यंतचा कालखंड, म्हणजे इ.स.

१६५९ पर्यंत आप्पांनी या कादंबरीसाठी निवडला आहे. या कादंबरीची प्रस्तावना लिहित असताना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांनी एक महत्त्वाचा विचार मांडला आहे. ते लिहितात,

*'शिवकालावरची राजेश्री गोपाल नीलकंठ दांडेकर यांची ही तिसरी कादंबरी - दर्याभवानी.'*

*विशेष म्हणजे ही कादंबरी उभी आहे कोकणकिनाऱ्यावर. कोकणपट्टीचं जीवन सांगणाऱ्या सामाजिक कथा-कादंबऱ्या मराठीत अनेक आहेत. पण शिवकालीन कोकण उभं करणाऱ्या ऐतिहासिक कादंबऱ्या एका हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याही नाहीत. वास्तविक कोकणपट्टीत आणि कोकण सागरात इतक्या रोमांचकारी आणि हृदयाला भिडणाऱ्या घटना घडलेल्या आहेत की, हाच इतिहास जर युरोप-अमेरिकेत घडला असता तर त्यावर तेथील कथाकार, कादंबरीकार, कवी, चित्रपट निर्माते, नाटककार आणि चित्रकार तुटून पडले असते. पण 'इतिहास' हे एक अपरंपार मोलाचं राष्ट्रीय धन आहे हे अजून आम्हाला कळायचं आहे.*

*ऐतिहासिक अस्सल कागदपत्रांतून आणि अन्य साधनांतून ओळखीच्या होणाऱ्या ऐतिहासिक व्यक्ती कित्येकदा अगदी*

सुस्पष्ट दिसत नाहीत. पारा उडालेल्या आरशातील प्रतिबिंबासारख्या त्या दिसतात. त्यांच्या हालचाली, हसणं, बोलणं, स्वभाव आणि त्यांच्या मुद्रेवरच्या सूक्ष्म छटा रसिकांना अभ्यासाच्या कुंचल्यानं आणि कलेच्या रंगानं दाखविणं हे कलावंताचं काम.

प्रत्यक्ष शिवाजी महाराजांचं चित्र तर त्यांनी अत्यंत वास्तवपूर्ण रंगवलं आहे. त्यात भडक रंग नाहीत. इतकेच नव्हे, तर या कादंबरीचं नायकत्वही त्यांनी महाराजांना बहाल केलेलं नाही. तसं पाहिलं तर 'महाराज' ही व्यक्तिरेखा दर्याभवानीमध्ये दुय्यमच आहे. पण तरीही शिवाजी महाराजांचं या कादंबरीत घडणारं दर्शन अत्यंत विलोभनीय आहे. समर्थांनी म्हटलं,

'शिवरायांचे आठवावे रूप । शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥'

पण ललितकलेच्या क्षेत्रात असं दर्शन अत्यंत प्रभावानं कुणी घडविलं काय? अनेकांनी शिवरायांचं 'रूप' पटवलं, पण आजपर्यंत महाराजांचा 'साक्षेप' प्रभावानं कुणीच सांगितला नव्हता.

महाराजांचा तो 'साक्षेप' राजश्री गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

*यांनी आपल्या कादंबऱ्यांतून अतिशय नेटकेपणं सांगितला आहे. महाराजांचं लोकांशी बोलणं कसं, हत्यारांशी वागणं कसं, गडकोटांशी जवळीक कशी, घोडीपाडी, प्रजानन आणि गलबत यांच्याविषयी माया कशी, गुणावगुणांची निरखपारख कशी, मुलुखाची टेहेळणी कशी, दऱ्यादर्यांची जपणूक कशी हा साक्षेप इथं दिसेल. यातूनच उभी राहणारी महाराजांची जिवंत मूर्ती आपल्या अंतःकरणात कायम राहते.*

शिवाजी महाराजांचं या कादंबरीत आप्पांनी रेखाटलेलं व्यक्तिमत्त्व तर खरोखरच वेड लावणारं आहे. कोकणवर करावयाच्या स्वारीपूर्वी स्वतः महाराज बैराग्याचा वेष घेऊन कोकणची पाहणी करण्यासाठी येतात तेव्हाचं प्रसंगवर्णन करताना आप्पांनी लिहिलं आहे -

*''श्री हरेश्वराच्या मंदिरापलिकडे समुद्रतीरावर महन्त उभे होते. नुकती भरती संपली होती. तिचा वेग स्थिरावला होता. आता पाणी तिथल्या तिथं कल्लोळत होतं. तीरावरती काही खडक होते. त्यावर कालवांची असंख्य घरं होती. त्यांनी व्यापून टाकलेल्या त्या खडकांवर लाटा आदळत, तेव्हा बुडबुडे फुटत, पुनः पाणी माघार परते, तेव्हा त्या खडकांतील*

*खळग्यांमधील वाळू हळुहळू खाली बसे. दुसरी लाट येऊन खडकांवर आपटे तेव्हा पाण्याचे असंख्य तुषार उडत. उलटेसुलटे.''*


*त्या तुषारांनी महंताचं अंग भिजून जाई. पण त्यांना त्याची जाणीव नव्हती. त्या असीम अमर्याद सागराच्या दर्शनानं त्याचं भान जणू हारपलं होतं. त्याच्या मागं जमीन होती. चिरपरिचित जमीन, नेहमी विश्वासानं आस्था देणारी, कुशीत घेऊन स्वस्थ झोपविणारी. तिच्यावर टाकल्या विश्वासास नेहमीच जागणारी आणि समोर पसरला होता अज्ञात सागर. त्याचं पाणी किती याचं काही मोजमाप नव्हतं. ते किती खोल आहे, याचंही ज्ञान नव्हतं. वरती दिसत होतं निरुपद्रवी पाणी. निळसर, हिरव्या रंगाचं हेलावत असणारं. उंच उठून स्वत:च्याच अंगावर कोसळत असणारं. पण त्याच्या उदरी काय काय होतं?*

*किती राजवटी यानं पाहिल्या असतील? किती परदेशीयांच्या नौका छातीवर वाहिल्या असतील? याच्या अंगी किती किती जळयुद्धं झाली असतील? किती यौद्धे आणि वीराग्रणी उलथून सागरजळांत कोसळले असतील? किती किती नौका जळत्या*

*बाणांनी पेटल्या असतील? ती प्रकाशित अग्निमंदिरं कुठं तरी भरकटत शेवटी बुडाली असतील? अचानक राजांना स्फुरलं, का हा सागरपुरुष नव्हे, दर्याभवानी आहे. क्रोधानं आपले नेत्र विस्फारून अहीमहींना गिळंकृत करीत असलेली आणि पुरुषच असेल, तर मग प्रलयंकर शंकर! हा केवढा केवढा केवढा! असीम असीम! असीम!*

*अशा या असीम अमर्यादाची ओळख आजवेरी करून घेतली नाही, याची महन्तांना खंत वाटली. पण त्याचा परिचय इथं असा, श्री हरेश्वराच्या साक्षीनं झाला, याबद्दलही त्यांना फार फार बरं वाटलं.*

*त्यांनी त्याचंच तीन आंजुळी पाणी उचललं, अन् ते त्याच्यातच सोडून दिले. म्हणाले, ''दर्या रे! तुझ्या ठायी जडलेल्या प्रीतीची ही खूण!''*



# झुंजारमाची

*‘‘हीरोजीनं हातींची पत्राची सुरळी गोविंद विश्वनाथाकडे दिली. त्यानं दिवली खाली काढली, अन् काजळी झाडून कागद उलगडला. मजकूर होता–*

*‘‘अखंडितलक्ष्मीअलंकृत हिरोजी इंदूलकर हवालदार कारखाने इमारतबांधणी प्रति शिवाजीराजेकृत अनेक आसीर्वाद उपरि आम्ही तेथोन इकडील प्रांती आलो, निरनिराळ्या राजकारणी गुंतलो, तरी आमचे लक्ष सिंधुदुर्गी स्थिरावले असे हे बरे जाणणे. अवघे काम चखोट करवोन घेणे. कारणे माणसे नवी आहेती त्यास सांभाळोन हरयेकाचा योग्य तो उपयोग करोन घेणे. कामाचा बितपसील येणेप्रमाणे -*

*कलम येक-पाया बहुत भला रुंद घेणे. खाली अवघा कातळ, तरी वरी थोर इमारत. तस्मात् दो बाजूस वीतहात जागा सोडोन तट उभारता ये, इतकी रुंद घेणे. तट कोठे रुंद तर कोठे जागजागा अरुंद येणेप्रमाणे धरावा लागतो. अनुकूल दिसेल त्याप्रमाणे करणे. जाणकार आहात, बहुत सांगणे नलगे. कलम दोन-पाया भरताखेपी चुन्याचे काम बहुत काळावेरी*

*न टिकें हे वज्रपाय. हे येविषयी बोलणे झालेच आहे. पायात ओतण्यापायी शिसे धाडायची वेवस्था केली असे. नीट पाहोन, मोजोन माल ताब्यात घेणे. टोपीकार साहुकार लबाड जात. डोळियांतील काजळ चोरून नेतील. पत्ता लागो देणार नाहीत. पुन:वरतोन त्या कामाचा रोजमुरा मागतील. सावध असणे, हिसेब ठेवीत जाणे.*

कलम तीन-घाण्या लावाल त्यासाठी बैल थोराड बांध्याचे घाटावरोन धाडीत आहोत. त्यांच्या चंदीचाऱ्याची वेवस्था नीट ठेवणे. नाहीपेक्षा काये कराल की त्यांस उपास घडवाल. येकदा फासळ्या बाहेर पडल्या की मग त्यांच्या गर्दना मारल्या तरी ते येक पाऊल काही उचलणार नाहीत. याकरिता गवत चाऱ्याची सोय बहुत नेटकी करणे. सूज्ञच आहात. परंतु सूज्ञाचीही बुद्धी भ्रमित होते. या कारणे तपशीले तुम्हास लिहिले असे. शेष पुढील पत्री. मर्यादेयं विराजते.''

*पत्र वाचून संपलं, गोविंद विश्वनाथानं ते तसंच उचलून मस्तकी धरलं. गहिवरून बोलला, ''यापरती आईस काय पोटच्या लेकरांची चिंता वाहील?'' गौरवानं हिरोजीनं म्हटलं -*

*''आवं गोविंदराव, असा धनी लाभला, म्हून तर लगीनाची*

*हळद न धुता, बांधली मुंडावळ तशीच येक्या अंगाला टाकून मानसं या धन्याच्या पायी परान अंथरायला तयार असत्यात. त्येंना ठाव असतं, का डोंगराएवढ्या दिलाचा धनी पाठीशी उभा हाये!''*

स्वराज्यासाठी, त्यातल्या एकेक किल्ल्यासाठी खर्चलेला एकेक मोहरा. त्या प्रत्येकाचं चटका लावून जाणं. असंच एक बलिदान तान्हाजीरावाचं सिंहगडाच्या मोहिमेत तान्हाजी मारले गेल्यावर त्या प्रसंगाचं वर्णन करताना आप्पांनी लिहिलं,

*'दशमी, एकादशी आणि द्वादशी'*

*तीन दिवस अवघं लागी लावण्यात गेले.*

*आला दिवस उगवला, माध्यान्ही चटला, मावळला. आपापल्या खुणा ठेवून गेला.*

*माणसं जन्मली. प्रकाशात आली. चमकली. शेवटी जुझं गाजवून गेली. आपापली स्मरणं ठेवून.*

*आठवावं तरी कितीक!*

*तो आसुदान नाहालेला बाजीप्रभू देशपांडा आठवावा? की दो हाती दोन तरवारी घेऊन जुझांत उतरलेला मुरारबाजी आठवावा? की आधारवटासारखा बाजी पासलकर आठवावा?*

की तान्हाजी मालुसरा आठवावा?

हे सगळे देशाच्या कारणी लागले. धर्माच्या कारणी लागले. हे मेले, धर्म जगला, वाढीस लागला.

असचं असतं! 'रयतेचं भलं' हे असलंच अवलक्षणी पोर आहे. ते कुणा ना कुणाच्या मुळावर जन्म घेतं. कुणाला तरी उदरी गिळून मग ते आकारास येतं.

पण रयेत सुखी व्हावी असं ज्याला वाटत असेल त्यानं हे एवढं दिलंच पाहिजे. येवढं हे त्यागलंच पाहिजे. त्याविना सतगत नाही.

लोक सुखात नांदायला हवे आहेत? गाईगुजींसवे मजेत जगायला हवे आहेत, यात्रा-उत्सवातून आनंदकल्लोळ करायला हवे आहेत. सणासमारंभामध्ये उल्हासानं मिरवायला हवे आहेत.

तर मग सख्यासोयऱ्याचं हे असं पंगतीतून उठून जाणं सोसलंच पाहिजे. गेला तो कारणी लागला. देहुला तुकारामबावाच्या कीर्तनी बसलो होतो. ते येक अभंग गाईले होते -

तुका म्हणे येका मरणेचि सरे ।
उत्तमचि उरे किर्ती मागे ।।

तान्हाजीरावाचं मरण खरं. येरा जीवन सत्कारणी न लावता

*मरणारांची मरणं खोटी!*

*दुःख करायचं नाही. मनी सल तर टुपणारच. पण तो तसाच गिळून टाकायचा. वरी दिसू द्यायचा नाही. गेले त्यांची खंत करीत बसायचं नाही. उरलंय त्याचा विचार करायचा. ते प्रकाशात कसं येईल, तिकडे बघायचं.*

कल्याण-भिवंडीपासून मालवणपर्यंतचा प्रदेश महाराजांनी कोकण स्वारीत काबीज केल्यानंतर या कोकणपट्टीच्या सुरक्षेसाठी महाराजांनी काही नवीन जलदुर्ग बांधले, काही जुन्या दुर्गांची दुरुस्ती केली आणि सारा कोकणकिनारा या जलदुर्गांच्या आश्रयाने निर्धास्त केला. अशाच एका बुलंद जलदुर्गाच्या, एका शिवलंकेच्या बांधकामाची, सिंधुदुर्गाची तपशीलवार माहिती देणारी आप्पांची शिवकालावरची ही चौथी कादंबरी 'झुंजारमाची'. बांधकामशास्त्रातलं महाराजाचं ज्ञान काय तोडीचं होतं याचा पुसटसा उल्लेख वरच्या पत्रातून येतोच, पण या सर्व किल्ल्यांच्या बांधकामाकडे अभ्यासपूर्वक पाहिलं तर महाराजांच्या बांधकाम कौशल्याविषयी केवळ आश्चर्य आणि कौतुकच वाटत राहतं.

या साऱ्या निर्मितीच्या स्वप्नांना पंख लाभले महाराजांच्या सवंगड्यांच्या रूपाने! महाराजांच्या साऱ्या दुर्गविषयक बांधणीच्या

कल्पना प्रत्यक्षात उतरवल्या त्यांच्या बांधकामखात्याच्या सुभेदाराने 'हिरोजी इंदुलकराने'. हा माणूस खरोखर विश्वकर्म्याच्या तोडीचा वास्तुशास्त्रस्थापत्य विशारद होता.

हा एवढा कसबी माणूस महाराजांना कुठे, कसा मिळाला व पुढे त्याचे काय झाले हे इतिहासालाच ठाऊक. पण त्याने उभी केलेली बांधकामे मात्र आज साडेतीनशे वर्षांनंतरही आपल्याला तोंडात बोटे घालायला लावत आहेत. आजही रायगडावरचा शिलालेख त्याने रायगडावर केलेल्या बांधकामाची साक्ष देतोय आणि जगदीश्वर मंदिराच्या पायरीवर कोरलेला शिलालेख या माणसाच्या मनाच्या मोठेपणाची आणि विनम्रतेची साक्ष देतो आहे. त्याने या पायरीवर कोरलं आहे, 'सेवेचे ठायी तत्पर, हिरोजी इंदूलकर.' हा हरहुन्नरी माणूसच या कादंबरीचा नायक आहे आणि सिंधुदुर्गाचं बांधकाम ही आहे या कादंबरीची पार्श्वभूमी.

कोकणाचं भौगोलिक स्वरूप, तिथली बंदरं, खाड्या, खाजणं, तिथली माणसं, त्यांच्या चित्रविचित्र मनोवृत्ती या साऱ्या गोष्टींचं इतकं तपशीलवार वर्णन आप्पांनी झुंजारमाचीमध्ये केलं आहे की क्षणभर वाटावं, आप्पा स्वतः त्या बांधकामाच्या

वेळेस तेथे हजर होते की काय?

सिंधुदुर्गाच्या बांधकामापूर्वी महाराज या कुरटेबेटाची पाहणी करत असताना एक स्थानिक भंडारी माणूस महाराजांना सांगतो की दर अमोशा-पौर्णिमेला तेथे भुतांचा नाच होतो, मिरवणुका निघतात, त्याला महाराज विचारतात,

*"ही कवटी काय त्या भुतांच्या नाचातली?"*

*"बरुबर! महाराजांनी बरुबर ओलकला. ही घरी नेऊन त्यांचा प्रसाद म्हणोन जपोन ठेवा." किंचित हसत राजे बोलले, "इथोन पुढे तुम्हास हा नाच दिसणार नाही. त्या भुतांना सांगा की येथे येक मराठी राजा नि त्याचे सवंगडी किल्ला बांधू म्हणतात." तोंडावर हात धरून तातू कसाबसा पुटपुटला "किल्ला?"*

*राजांच्या मुद्रेवरील हासू लोपलं. काहीसा उग्र गंभीर भाव तिथं उमटला. ते जणू स्वतःशीच बोलू लागले, "बहुत काळापर्यंत या भुतांचा जाच सोसला. अवघा देश उध्वस्त झाला. जिवंत भुते आणि मेलेली भुते. आजपावेतो त्यांच्या अमंगळ हिडीस छायेने अवघा अंतराळ झाकोळला होता. पण ही धरित्री आम्हा माणसांसाठीही आहे. आम्हीही जगले*

*पाहिजे. काही येका प्रतिष्ठेने. काही एका जिद्दीनं, काही येका विश्वासाने, आजपर्यंत अवघे नदीकाठ याच भुतांच्या पायाखाली काळजले होते. कुणी आईमाई सांजच्या पाहारी पाणी आणू जाईल, तर तिचा भरोसा नव्हता. आता हे बहुत झाले म्हणावे. आम्ही ऐसे कर्तुक करूच करू की अवघे पाणवठे निर्भय होतील. कोठल्याही भयाने कोणाचे मन बावरून जाणार नाही हा या देशास दिलेला आमचा शब्द आहे.''*

साऱ्या शिवचरित्राचं मर्म, शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापनेसंबंधीचे विचार, त्यांच्या सवंगड्यांना झालेल्या त्या विचाराचं आकलन, त्यांच्या साध्या भोळ्या बोलीतून डोकावणारा तो विचार आणि त्यानुसार होणारं त्याचं आचरण हे सारं प्रसंगा-प्रसंगानुरूप आप्पांनी आपल्या अफाट कल्पनाशक्तीच्या जोरावर, पण ऐतिहासिक वस्तुस्थितीच्या आधारावर इतक्या नेटकेपणाने लिहिलं आहे की वाचताना आपण केवळ थक्क होऊन जातो. केवळ पस्तीस वर्षांच्या अखंड परिश्रमातून हे स्वराज्य महाराजांनी कसं निर्माण केलं असेल! या प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास या कादंबऱ्या मन:पूर्वक अभ्यासल्या पाहिजेत.

यथावकाश सिंधुदुर्गाचं बांधकाम पूर्ण झाल्यावर महाराज किल्ला पहायला येतात. ज्यांनी ज्यांनी त्याच्या उभारणीसाठी कष्ट घेतले त्या सर्वांचा आदरसत्कार करून झाल्यावर जमलेल्या साऱ्यांना उद्देशून तो म्हणतात,

*"आज येका बुलंद दुर्गामध्ये प्रवेश करीत आहोत, जो कालपरवा रचून पुरा झाला."*

*"आताच आम्ही चावी चालवून दुर्गाचे महाद्वार उघडिले."*


*"हे काय केवळ येका दुर्गाचे द्वार होते?"*

*"नव्हे, या मऱ्हाटदेशाच्या स्वराज्याचे द्वार, समृद्धीचे द्वार. गडे हो, हे आनंदवनभुवनाचे द्वार!"*

*"अडचणी येतील, तमा नाही. संकटे येतील, चिंता नाही."*

*"कालाच्या अखंड प्रवाहामध्ये मानव काही मोठी वस्तू नव्हे. माणसे येतात जातात. कार्य चिरंतन राहते."*

*"या समारंभाच्या निमित्ते आम्ही या भूमीस येक शब्द देतो - तुम्हा सर्वांच्या वतीने! ये देशी फडकत असलेली गैरांची निशाणे उपटून टाकून त्या स्थळी आम्ही पुन: एकदा त्यागाचा आणि तेजाचा निदर्शक जो भगवा - तो फडकवूच फडकवू!"*



# हे तो श्रींची इच्छा

*घटिकापात्र बुडालं -*

*आणि तो धन्यतेचा क्षण येऊन उभा ठाकला -*

*ज्याची हा दगडधोंड्याचा देश गेली अनेक शतकं वाट पहात होता.*

*मायबोली मराठी भाषा,*

*मराठी आचार-विचार,*

*मराठी संस्कृती,*

*आणि महाराष्ट्रधर्म,*

*ही अवघी बापुडवाणी होऊन*

*पापण्यांच्या दारवंट्यात उत्सुकतेच्या दिवल्या तेववून ज्यासाठी ताटकळत होती,*

*किती शांमुखी जाहजी फाकविल्या.*

*किती सुंदरा हाल होवोनि मेल्या*

*त्या सर्वांचे पुण्यलोकी जाऊ न पावलेले अतृप्त आत्मे - किती किती संत - महंतांनी आपापल्या तपश्चर्या ज्यासाठी अर्पिल्या होत्या,*

*कित्येक आईच्या पुत्रांनी आपापली तुच्छ शरीरं ज्या एका मुहूर्ताच्या उगवण्यासाठी स्वखुषीने या स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात समर्पण केली होती.*

*अनेकानेक स्वातंत्र्ययोद्धयांची कबंध तळहाती शिर घेऊन झुंजत झुंजत ज्यासाठी समरभूमीवर खर्ची पडली होती, रंजल्यागांजलेल्यांचे आक्रोश, त्यांच्या दबलेल्या कंठातून न फुटता ज्यासाठी इतकी वर्षं घुसमटले होते.*

*ज्यासाठी व्रतं-वैकल्यं-तीर्थाटनं-तपश्चर्या-किंबहुना अवघ्या उत्सुकता ज्यासाठी ताणल्या गेल्या होत्या, अवघे सत्यसंकल्प ज्यासाठी समर्पित केले गेले होते -*

*तो शुभमुहूर्ताचा मुकुटमणि,*

*तो स्वातंत्र्यसूर्याचा उदयकाल,*

*स्वर्गीय देवतांच्या अन् यक्षगंधर्वांच्या साक्षीनं तो दैदीप्यमान क्षणार्ध उलटला - आणि कृतज्ञतेच्या भारानं भारावलेली पावलं टाकीत तो मराठ्यांचा अतिशय आवडता राजा सिंहासनाजवळ पोचला. त्या क्षणी त्याच्या मनी लक्ष लक्ष वादळं उठली आणि विझली. त्या सर्वांवर ताबा मिळवून त्या धीरगंभीरानं कृतज्ञतेच्या भारानं मस्तक पळभर लववलं. त्या*

*सर्व जिवलगांचं स्मरण केलं, की जे या पवित्र क्षणी उपस्थित नव्हते. त्या सर्व स्वातंत्र्ययोध्द्यांना वंदन केलं, की ज्यांच्या बलिदानामुळं ही अमृतवेल स्वप्नातून प्रत्यक्षात अवतरली होती.*

*आणि मग जिथून आवडता राजगड स्पष्ट दिसत होता, त्या सिंहासनास पाय न लावता त्यावर तो आरुढ झाला!*

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या विनंतीला मान देऊन स्वतः आप्पांनी लिहिलेल्या शिवकालावरील पाच कादंबऱ्यांतील ही शेवटची कादंबरी 'हे तो श्रींची इच्छा.' शिवजन्मापूर्वीपासूनच्या सामाजिक स्मृतींचा धांडोळा घेत घेत या कादंबरीच्या विषयापर्यंत येऊन पोहोचलेलं या देशाच्या इतिहासातलं एक महत्त्वाचं पर्व, शिवराज्याभिषेक. या पाचही कादंबऱ्या या काही 'शिवाजी महाराज' या व्यक्तीभोवती केंद्रित नसल्यामुळे त्यावेळच्या सामाजिक स्थितीचा जो सुवर्णकाल म्हणजेच 'शिवराज्याभिषेक.' येथेच स्व. आप्पांनी या लेखनाला पूर्णविराम दिला.

शिवराज्याभिषेकाचं ऐतिहासिक महत्त्व अनेकांनी वर्णन केलं, लिहून ठेवलं आणि सांगितलंसुद्धा. परंतु शिवराज्याभिषेकाचं सामाजिक महत्त्व, सर्वसामान्य प्रजेच्या

त्या घटनेविषयीच्या भूमिका, हा सोहळा करवून घेण्यासाठी मान्यता देण्यापूर्वीचा शिवाजी महाराजांचा उदात्त दृष्टिकोन हे सारं अत्यंत सोप्या भाषेत, सर्वांना समजेल असं, उदाहरणं आणि दाखले देत तपशीलवार लोकांसमोर मांडणं अत्यावश्यक होतं आणि नेमकं तेच कार्य स्व. आप्पांनी या पाचव्या कादंबरीच्या माध्यमातून पार पाडलं आहे. महाराजांचा राज्याभिषेक होऊन ३३५ वर्षे पूर्ण होत आहेत. पण आजही या घटनेबद्दल समाजामध्ये असणारं अज्ञान आणि गैरसमज आश्चर्यकारक आहे. यासंबंधी परवा कुणाशी तरी बोलत असताना त्यांनी अचानक विचारलं, ''पण महाराष्ट्रातले ब्राह्मण शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करायला तयार नव्हते. म्हणून शिवाजी महाराजांनी काशीवरून गागाभट्टांना बोलावून आणून स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला ना?'' असे काहीतरी गैरसमज आज सव्वातीनशे वर्षांनंतरही समाजाच्या मनात घर करून आहेत. त्याचं निराकरण होणं आवश्यक आहे. महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांचा या राज्याभिषेकाला विरोध असायचं काय कारण होतं? गागाभट्टांना काही महाराजांनी निमंत्रण पाठवून बोलावून आणलं नव्हतं. मूलत: स्वत:स राज्याभिषेक करून घ्यावा या

विचारासच महाराजांचा पूर्ण विरोध होता. ‘हे प्रजाजनांचे जगदंबेच्या आशीर्वादाने उभे राहिलेले राज्य आहे. मी केवळ एक निमित्त आहे.’ अशीच त्यांची भूमिका होती. ती बदलून त्यांना राज्याभिषेक करून घेण्यास तयार करण्यासाठी गागाभट्टांना खूप प्रयत्न करावे लागले. हे असे इतर अनेक तपशील आपल्याला माहित नसतात. ते जाणून घ्यायचा आपण कधी प्रयत्नही करीत नाही.

मात्र त्या संबंधात असणाऱ्या गैरसमजांना आपल्या विचारांत मानाचं स्थान असतं. ते गैरसमज मनात पक्के करत असताना आपण कधीही वस्तुस्थिती विचारात घेतलेली नसते, तपशील पाहिलेले नसतात, पुरावे अभ्यासलेले नसतात. मात्र जर कोणी या गैरसमजांना धक्का देऊ लागला, तर मात्र आपण लगेच पुरावे मागतो. तपशील विचारतो. तारतम्य, सद्सद्विवेकबुद्धी, आस्था आणि भावना खुंटीवर टांगून कधी इतिहासाचा अभ्यास करायचा नसतो आणि तसा तो केला तर त्या कोरड्या अभ्यासाला फारतर इतिहासाचे ‘पोस्टमार्टेम’ म्हणावे लागेल, त्याला इतिहासाचा आत्मा जाणून घ्यायचा प्रयत्न म्हणता येणार नाही.

आपल्या राष्ट्रपुरुषांविषयी आदराची भावना बाळगून, तत्कालीन वस्तुस्थितीचा तारतम्याने आणि सद्सद्विवेकबुद्धीने अभ्यास करून आस्थेने इतिहासाकडे पाहिले तरच त्यातून भविष्यासाठी काही संदेश मिळू शकतील, प्रेरणा मिळेल व आपल्या आणि देशाच्या निजसत्वाची जाणीव होईल. अन्यथा एका पद्यात म्हटल्याप्रमाणे -

'निजसत्वाची जाणीव नसता, राष्ट्रजीवनी अर्थ नसे ।
परंपरा, इतिहास, पराक्रम, आठव नुसता व्यर्थ असे!'

ही जाणीव करून देण्यासाठीच स्व. आप्पांनी या पाच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. वर उल्लेख केलेल्या सर्व गोष्टींचा अतिशय सुरेख मेळ आप्पांनी या कादंबऱ्यांमध्ये घातला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊसाहेब या दोन लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांमधील एकमेकांविषयीच्या भावनांचा उल्लेख करत स्व. आप्पांनी या कादंबरीचा शेवट केला आहे. त्यांनी लिहिलं आहे,

*''अवघ्या देवतांची दर्शने घेऊन जययात्रा बालेकिल्ल्यात परतली. विसर्जित झाली.''*

*आता उरलं होतं. एक दैवत-मातृदैवत.*

*छत्रपती राणीवशात, काशीबाईसाहेबांच्या वाड्यात शिरले. दासीबटकींची एकच धावपळ. आऊसाहेबांपर्यंत वार्ता पोचली. एकी दोघीजणींच्या आसऱ्यानं त्या थरथरत उभ्या राहिल्या. उंबरठा वलांडित छत्रपती आत आले.*

*ते पुढे झाले. जवळ पोचले तो आश्चर्यानं त्यांचं मन तुडुंबलं. केळीसारख्या कापत आऊसाहेब वाकून मुजरा करीत होत्या. त्यांचे दोन्ही बाव्हटे धरून छत्रपतींनी त्यांस पुसले,*

*''हे आपण काय करीत आहात आऊसाहेब?''*

*हलक्या क्षीण स्वरांत अस्पष्टपणे त्यांनी म्हटलं,*

*''राजे, आता आपण सिऊबा राहिला नाहींत, छत्रपती झाला आहांत. शेष सर्व आपली प्रजा. तेव्हा प्रजेने जे करायास हवे ते आम्हास करूं द्या-''*

*नवलानं छत्रपतीनीं पुसलं,*

*''छत्रपतीस आई नसत्ये काय?''*


*''आम्हास मालूम नाही. कारण आम्ही छत्रपती नाही. मात्र आम्हास येवढें ठावे आहे, की पुत्र छत्रपती झाला, की त्याचे लेकपण संपते. तो केवळ छत्रपतीरूपाने उरतो-''*

*''आऊसाहेब-''*

*“राजे, आम्हास येक गोमटे मूल होते, नवसासायासांचें. त्यावेगळे आम्हास कोण्ही नव्हतें. ते आम्हास बहुत बहुत हवे होते. पण आम्हापेक्षा धरतीला त्याची अधिक गरज होती. तिने ते आम्हापाशी मागितले. आम्ही दिले. रित्या झालो. आता हे रितेपण आम्हास मुक्तमनाने अनुभवूं द्या. त्याच्या आड येवों नका.”*

*आऊसाहेब पुन: खाली वाकणार, तो छत्रपतींनी त्यांना घट्ट मिठी मारली. पुटपुटले.*

*“आऊसाहेब - आऊसाहेब!”*



# शितू

*“आप्पांनी कसंबसं भाताचं तपेलं उतरलं. अळवाच्या भाजीत आज त्यांनी मीठच टाकलं नाही. हातावर पाणी पडताच सुपारी अडकित्ता घेऊन काठीचा आसरा घेत ते भर दुपारी वेळेश्वरी पोहचले.”*

*काय उत्तर द्यायचं शितूला?*

*तिला कोणत्या नवऱ्यासाठी वटपौर्णिमेचं व्रत करायला सांगायचं? गौरीनं जन्मोजन्मी शंकर हाच पती मिळावा म्हणून हरितालिकेचं व्रत केलं होतं. शितूनं कोणता पती जन्मोजन्मी लाभावा म्हणून व्रत करायचं? पहिला की दुसरा? शितूवर आजवर ते संस्कार करीत आले. त्यांनी फुंकर घालून तिच्यातली भारतीय नारी जागी केली. आता ती पुढं पाऊल टाकण्यास उत्सुक होऊन त्यांना वाट विचारत्येय.*

*कोणती वाट दाखवायची त्यांनी तिला?*

*सगळे मार्ग तिच्यासाठी बंद आहेत. सगळ्या वाटा तिच्याकरिता निरुपयोगी आहेत. सगळी धर्मशास्त्रं तिच्याकडून तोंड फिरवून आहेत. सगळे ऋषी तिचा प्रश्न निघताच मौन धरून बसताहेत!*

काही सुचत नाही. काही कळत नाही. काही दिसत नाही. सुयोग्य पतीसाठी मंगल कामना करणं, हे जणू भारतीय नारीच्या जीवींचं गुज!

शितूनं कोणत्या पतींची मंगल कामना करायची? काहीही कळत नव्हतं. अशा वेळी बापानं तिला दोनदा लग्नाच्या मांडवाखाली काढलंन.

आज तिच्या हाती काही राहिलं नाही! ती निसर्ग आहे- एकटी आहे. अन् आज तिची बुद्धिमत्ता जागी झाली आहे! आप्पांनी केली आहे!

का त्यांनी ही चूक केली?

- चूक?

हो! चूकच! एखाद्या आंधळ्याला दृष्टिलाभ करून द्यावा, अन् नेमकं त्यावेळी त्याला कळावं की आता या कड्यावरून उडी मारल्याशिवाय दुसरं गत्यंतर नाही. अशावेळी त्याला दृष्टिदान करणारा वैद्य चुकलाच नाही का? नजर फिरवून टाकणारी कड्याची खोली, खालचं भयाण अरण्य, अगतिक होऊन उडी टाकावी लागणाऱ्या अवकाशीची भयकारी विस्तीर्णता, हे सगळं त्या आंधळ्याला अगदी उडी टाकावी

*लागता क्षणी दाखवावं ही चूक नव्हे तर काय?*

*- का केलं हे आप्पांनी?*

*त्यांना काही उपाय सापडत नाही. एरवी सगळ्या गावाला पुरून उरणारं त्यांचं सौजन्य याबाबतीत पांगुळलं आहे. काही सुचत नाही. काही कळत नाही. काही दिसत नाही.*

शितू ही अप्पांची पहिली मानसकन्या. मृण्मयी वगैरे नंतरच्या. तेव्हा आप्पांच्या या लाडक्या मानसकन्येनं लहानपणापासून खूप खूप सोसलं आहे. लहानपणी लग्न काय असतं हे कळायच्या आत दोन वेळा तिचं लग्न होऊन दोन्ही नवरे मरून गेले. हिच्या वाट्याला आलं बालविधवेचं लाजिरवाणं जीणं. 'घोखाई' म्हणून सासरच्यांनी यथेच्छ मारून ठोकून तिला बापाकडे आणून टाकलं. बापानं पुन्हा मारून तिला विहिरीत ढकलून देण्यासाठी विहिरीकडं चालवलं. त्या विसूमुळं तिला जीवदान मिळालं. आप्पासारख्या देवमाणसाचा आश्रय मिळाला. बाप जोग घेऊन, संन्यास घेऊन निघून गेला. माय तर कधीच मेली होती. आप्पांची माया आणि विसूसारखा सवंगडी मिळाल्यानं तिचं उरलंसुरलं बालपण तरी समाधानात गेलं. उमलत्या वयात आप्पांच्या मायेचं आणि घराचं कुंपण

तिच्याभोवती नसतं तर देवाघरचं हे देखणं फूल कुणीतरी आडदांडानं कुस्करून टाकलं असतं. तिच्या नशिबानं या फुलाला आप्पांसारख्या देवमाणसाच्या पायाशी आणि विसूच्या हृदयात स्थान मिळालं. ती हरखून गेली. तिच्या जीवनाचं सार्थक होण्याची वेळ आली तर तांबडा नाग चावून आप्पा वारले. तो धक्का सहन न होऊन विसूला वेड लागलं. त्याला सांभाळून शहाणं करता करता आणि घराची आणि बागांची उस्तवार करता करता ती स्वत:ला विसरून गेली. सगळं काही व्यवस्थित होणार असं वाटत होतं तोच गावातल्या गावकीनं या जोडीवर फणा उगारून त्यांना नकोसं करून सोडलं. त्यांचा निकाल लावून विसू तिला आपलंसं करून घेणार तोच हा सगळा प्रकार सहन न होऊन त्याच्यावरच्या प्रेमापोटी ती त्याला सोडून गेली. नुकताच भ्रमिष्टपणापासून बाहेर आलेला आणि तिच्या वियोगाची सवय नसलेला विसू या दु:खाने परत कोलमडून पडणार, त्याच्या आयुष्याचे तारू वादळात भरकटणार हे ओळखून खाडी पोहून विसूकडे यायला निघालेली शितू ओहोटीच्या लाटांनी ओढून समुद्रात नेली. किनाऱ्यावर रात्रभर ओरडत फिरणाऱ्या विसूला सकाळी सकाळी

भरतीच्या लाटेबरोबर आलेलं शितूचं प्रेतच मिळालं. अशी तिची सगळी चित्तरकथा स्व. गो. नी. दांडेकरांसारखा लोकोत्तर लेखक पिता तिला लाभला म्हणून तुम्हा आम्हाला ही कथा कळू तरी शकली. अन्यथा ती पण कोकणच्या मातीत आणि समुद्राच्या पाण्यात शितूप्रमाणे दबून किंवा बुडून गेली असती.

या मानसकन्येनं आप्पांना खूप प्रसिद्धी मिळवून दिली. कोकणच्या निसर्गाचं एक वेगळं दर्शन तिथल्या माणसांच्या स्वभाववैचित्र्यासह 'शितूनं' आपल्याला घडवलं.

आप्पांच्या कादंबऱ्यांपैकी बहुतेक कादंबऱ्यांची पार्श्वभूमी कोकण. त्या जोडीला मावळ, वऱ्हाड अशा वेगवेगळ्या प्रादेशिक पार्श्वभूमी लाभलेल्या कादंबऱ्या तेथील माणसांच्या स्वभाववैशिष्ट्यांसह आप्पांनी चितारल्या, त्याबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना ते लिहितात,

*'प्रादेशिक कादंबरीचे एक वैशिष्ट्य आहे. तिच्यातील इतर पात्रांबरोबरच कथा ज्या प्रदेशात घडते, तो प्रदेश वाचकांच्या मनात घर करतो. काही दिवसांनी कादंबरीतील पात्रे अंधुक होऊ लागतात. प्रदेश मात्र दशांगुळे उरतो.*

*अर्थातच इतर पात्रांबरोबरच प्रदेश या पात्राचेही नकसकाम*

*अतिशय तपशीलाने करावे लागते. त्यासाठी त्या प्रदेशात उगवणारे आणि मावळणारे उन्हाळे-पावसाळे सजग मनाने टिपावे लागतात. तिथल्या थंडीत कांकडावे लागते. नद्यांच्या पात्रात पाय पाण्यात सोडून बसावे लागते. शेतांच्या बांधावरून पांखरांची घरटी न्याहाळीत हिंडावे लागते. उन्ह तापू लागले म्हणजे हाय हाय करीत कुण्या झाडाच्या सावलीत बसावे लागते. मृगजळाच्या लाटा अंगावर घ्याव्या लागतात.*

*असे बरेचसे करता-करता एके दिवशी कुण्या सुमुहर्तावर त्या त्या देशींचा प्रदेशपुरुष लेखकाच्या अंतर्मनासमोर उभा राहतो. तो आशीर्वाद देऊन म्हणतो,*

*'मुला, खूप हिंडलास! दमलास, बस जरासा. आता तुला हिंडायचे कारण नाही. तू जेव्हा जेव्हा माझे चिंतन करशील तेव्हा तेव्हा मी तुझ्यासमोर हा असाच साराच्या सारा लीलाविग्रह घेऊन उभा राहत जाईन!'*

स्व. आप्पा त्यावेळी तळेगांवी राहात असत. एका साहित्यिकानं लिहिलं. ''तळेगांवहून जाताना रेल्वेसुद्धा 'शितूऽऽऽ' अशी शिट्टी मारत जाते.'' स्व. आप्पांनी सुद्धा या मानसकन्येवर खूप खूप प्रेम केलं म्हणून तर तिच्या प्रस्तावनेत त्यांनी

लिहून ठेवलंय,

*'सहृदय वाचकवृंद!'*

*'मी माझी मानसकन्या 'शितू' आपणाहाती सोपवीत आहे. आज माझे गेल्या अडीच वर्षांचे स्वप्न साकार झाले आहे. एवढा काल मी माझ्या शितूला मनाच्या उरीपोटी वागविले आहे. शितू हे एक प्रेमकाव्य आहे. चहु दिशांनी कोंडमारा झालेली प्रेमभावना कुण्यातरी मार्गाने बाहेर निसटून कोणा एकाचे हाती आपले सर्वस्व सोपविण्यासाठी धडपडत असते. ईश्वरीय प्रेमाचे हे देणे परिस्थितीमुळे कितीही काळंजले तरी कुण्या कुण्या रूपाने आविष्कृत होणे हा त्याचा धर्म आहे. प्राणिमात्रांत व्याप्त असलेल्या अग्नीसारखे प्रेम हे व्यापक आहे. कुठेही त्याचा अभाव नाही. वरवर पाहता वज्राप्रमाणे कठोर भासणारा लोहपुरुष त्याच्या अंतराच्या लहानशा कोपऱ्यावर का होईना, पण प्रेमाची पदचिन्हे उमटलेली असतातच.'*

*मात्र प्रत्येक ठिकाणी ते प्रकर्षाने प्रकट होते असेही नव्हे. आणि जिथे ते प्रकट होईल तिथे कोणता आकार धरून त्याची अभिव्यक्ति होईल, याविषयीही पुर्वसुरींनी एखादे सूत्र लिहून ठेवले नाही. कुठे वासनेचा फाटका झगा घालून, कुठे भक्तीच्या*


पुष्पमाळा लेवून, कुठे लज्जेची वसने नेसून, कुठे मुग्धतेचा बुरखा पांघरुन, असे नाना रूपांनी आणि नाना आकारांनी प्रकट होऊन प्रेम आपले अस्तित्व धन्य करून घेत असते.

शुद्ध प्रेम फलस्वरूप असे - जशी चंदनाची झाडे. त्यांना फळे न येताही त्याचं जीवन कृतार्थ झालं. प्रेमाचे तसे आहे. त्याला काहीही मिळावयाचे नाही, काही लब्धव्य, प्राप्तव्य नाही. नारदांनी प्रेमाचे वर्णन 'फलरूपत्वात्' असे केले आहे. ही प्रेमभावना मानवी मनात षोडषकलांनी उदय पावली की ते अमृतस्वरूप तृप्त आणि मत्त होते. द्वेष मागे थांबतो, असुयेचा संबंध संपतो.

शितूच्या निर्मल मनी या ईश्वरीय प्रेमाचा उदय झाला. त्याला आप्पांच्या संस्काराचे खत मिळाले. विसूची देवभावाने पूजा करून ते धन्य झाले.

ही गाथा गाऊन माझे जीवन धन्य झाले, असे मी मानतो. नव्हे, तो धन्यतेचा आनंद मी मनसोक्त अनुभवला आहे. अनेकदा शितूचे चिंतन करीत असता माझ्या नेत्रांतून वेदनाशून्य आसवे वाहिली आहेत.

मला वाटते, इतके पुरे.



# मर्यादेयं विराजते

स्वर्गीय अप्पा,

१ जून, २००९ ला तुम्ही जाऊन ११ वर्षं झाली. तुम्ही असताना, तुमची भ्रमंती सुरू असताना आमच्या पिढीला जेवढा तुमचा परिचय होणं आवश्यक होतं, जेवढा तुमचा सहवास मिळणं आवश्यक होतं, तो या ना त्या कारणांमुळे मिळू शकला नाही. त्याबाबतीत आमची पिढी थोडी दुर्दैवीच. शिवचरित्राचं महत्त्व समजून, किल्ल्यांची ओढ लागून आमच्या पिढीने जेव्हा किल्ले हिंडायला सुरुवात केली तोपर्यंत तुमची भटकंती जवळ जवळ थांबली होती. त्यामुळे जो भावनिक संबंध आमचा गड-कोटांशी निर्माण होणं आवश्यक होतं, तो निर्माण होण्यात खूप अडचणी आल्या. यावेळी मदतीला धावून आली तुमची पुस्तकं. तुमच्या भटकंतीची वर्णनं, तुमचे अनुभव आम्हाला या कालावधीत खूप मोलाचे ठरले. ते वाचून आम्ही जी भटकंती केली त्या भटकण्याला एक दिशा, एक प्रयोजन, एक दृष्टी मिळून या सर्वांचं एक भावविश्व निर्माण झालं. मग वाटायला लागलं की, हे अनुभव, हा

आनंद सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे. ज्यांनी कधी किल्ला पाहिला नाही, ज्यांनी कधी त्यावरील सूर्योदय-सूर्यास्त अनुभवले नाहीत त्यांनाही हाताशी धरून किल्ल्यापर्यंत तरी आग्रहाने नेलं पाहिजे. परंतु हे करण्यासाठी आमची शक्ती अपुरी होती. सामर्थ्य तोकडं होतं. म्हणून मग एक युक्ती करायची ठरवली. तुमचे अनुभव, तुमच्याच शब्दांत त्या सर्व लोकांसमोर ठेवायचे व तुमच्या परिपूर्ण, अनुभवसंपन्न व साक्षात्कारी साहित्याचा प्रत्यय त्यांना आणून द्यायचा असं मनाशी योजलं. या साऱ्या धडपडीतून आकाराला आली एक लेखमालिका, निवडक गो.नी.दां.!

या संकल्पनेला आकार देण्यासाठी लिहायला तर बसलो. पहिला लेख होता तुमच्या आवडत्या राजगडावरचा. तुम्ही लिहिलेल्या 'वाघरु'चा परिचय करून देणारा. तुम्ही केलेलं सुवेळामाचीचं नितांत सुंदर वर्णन लेखाच्या सुरुवातीला घेतलं आणि मला पुढं काही लिहायचा धीरच होईना. तुमच्या साहित्याच्या भरजरी पैठणीला माझ्या लिखाणाची फाटकी ठिगळं जोडायला माझं मन धजावेना. तरीही कसंबसं धाडस करीत मी तो लेख पुरा केला. पुढं मग प्रत्येक लेख लिहित

असताना अशीच ठिगळं माझ्या हातून लागत गेली. त्यातून निर्माण झालेली ही वाकळ, घोंगडी म्हणजे 'निवडक गोनीदां!' ज्याचं आज पुस्तक होत आहे 'पुनर्भेट' या नावानं. पण, हे माझं धाडस तुम्हाला आणि जनता जनार्दनाला आवडेल असा माझा विश्वास आहे. कारण, वर्षभर अंगा-खांद्यावर भरजरी शेले उपरणी मिरवणाऱ्या आपल्या विठू माऊलींच्या खांद्यावरही एक दिवस घोंगडी असते. तुम्ही गेल्यानंतर लिहिलेल्या श्रद्धांजलीपर लेखात मी तुम्हाला आम्हा शिवभक्तांची माऊली म्हटलं होतं. त्या उल्लेखाप्रमाणे तुम्ही एकदा जरी या घोंगडीकडे नजर टाकलीत तरी ते मला पुरेसं आहे.

किती हिंडलो त्या वर्षभरात. वऱ्हाड, खानदेश, कोकण पार अगदी साडेतीनशे वर्षांपूर्वीच्या काळात, शिवकालातसुद्धा नेऊन आणलंत. किती जणांच्या ओळखी करून दिल्यात. भाकड्याच्या जीवनरामजींपासून वऱ्हाडच्या बयिरामभौपर्यंत आणि राजगडावरच्या बाबुदापासून शिवकालातल्या राणोजीपर्यंत. किती प्रकारची, किती विचारांची, कशा आचारांची ही माणसं! मनुष्य स्वभावातले कित्येक कंगोरे या तुमच्या ओळखीच्या पात्रांनी भारून टाकलेले. या साऱ्यांनी मिळून माझं भावविश्व

समृद्ध केलं. मला विचारांची श्रीमंती दिली. परिपक्व अनुभवांची शिदोरी दिली आणि जिला धरून मी माझं आयुष्य पार करून जाऊ शकेन अशा उदात्त विचारांची शिदोरी दिली.


तुमचा देह पंचत्वात विलीन झालेला असला तरी तुमचे साहित्यरूपी अस्तित्व हे कायमचं प्रेरणादायी आणि मार्गदर्शक राहणार. इथल्या वास्तव्यात तुम्ही लिहिलेल्या 'स्मरणगाथा' आणि 'दुर्गभ्रमणगाथेनंतर' आता तुमची 'स्वर्गभ्रमणगाथेच्या' लिखाणाची तयारी सुरू असणार. पाठीवर कंदमुळांची पिशवी घेऊन जोडीला बाबुदाला घेऊन, वहिनीच्या अन् साऊच्या हातची अमृतांची मडकी चाटूनपुसून खात तुम्ही तिथेही नवनवे डोंगर चढत-उतरत असणार. कारण, 'चरैवेति चरैवेति' हा तुमचा मूलमंत्र आहे. असो.

तुमच्या असंख्य साहित्यकृतींपैकी काही निवडक साहित्यकृतींचा परिचय करून देण्याचा प्रयत्न मी करून पाहिला. कसाबसा, थकत, भागत, घाम गाळत या तुमच्या साहित्यदुर्गाच्या शेवटच्या टप्प्यावर येऊन पोहोचलो आहे. एखादीच कादंबरी वाचून तुमच्या साहित्याविषयी मतप्रदर्शन करून रोपवेने गडावर टपकन् उतरण्याच्या आनंदापेक्षा, तुमच्या

अनेक साहित्यकृतींचा पायरीपायरीनं अभ्यास करत, त्यातील निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत, त्यातील पात्रांच्या बरोबरीने गप्पा मारत, गाणी गात आपल्या पायांनी गडावर चढून येण्याचा आनंद मला लाभला. यापरते भाग्य कोणते?

हे माझ्या हातून घडवलं गेलं, मी केवळ निमित्तमात्र होतो, याची मला पूर्ण जाणीव आहे. म्हणून याविषयीची माझी भावना तुम्ही 'स्मरणगाथेच्या' सुरुवातीला व्यक्त केलेल्या तुकाराम महाराजांच्या अभंगासारखीच आहे -

*'करविली तैशी केली कटकट,*
*वाकुडी का नीट, देव जाणे ।*
*कोणाकारणे हे झालेसे निर्माण*
*देवाचे कारण देव जाणे ।*
*तुका म्हणे मी तो अभिमानावेगळा*
*घालुनी 'गोपाळा' भार असे ।।*
*बहुत काय लिहिणे । मर्यादेयं विराजते ।'*



## लेखक परिचय

### ॲड. आनंद रामचंद्र देशपांडे

- **शिक्षण :** बी. कॉम. एल.एल.बी. एम. ए. (इतिहास)
- **माजी सदस्य :** गडसंवर्धन समिती महाराष्ट्र शासन
- **माजी सदस्य :** महाराष्ट्र राज्य नाट्य परिनिरीक्षण मंडळ
- महाराजा शिव-छत्रपती प्रतिष्ठाननिर्मित व श्रीमंत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे दिग्दर्शित **'जाणता राजा'** या महानाट्यात १९८८ पासून सहभाग.
- आत्तापर्यंत २७५ प्रयोगातून मध्यमवयीन शिवाजीमहाराज, सूत्रधार, शाहीर या भूमिका सादर.
- या प्रयोगांच्या निमित्ताने १९९७ साली अमेरिका व २०१५ साली इंग्लंडचा दौरा.
- पुण्यातील आंबेगाव येथे महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने साकारल्या जाणाऱ्या **'शिवसृष्टी'** या भव्य प्रकल्पाचा सल्लागार म्हणून जबाबदारी.
- दुर्गमहर्षी गोपाल नीलकंठ दांडेकर यांच्या साहित्यावर

आधारित **‘पुनर्भेट-गोनीदांच्या साहित्यकृतींची’** हे पुस्तक प्रकाशित.

- दुर्गभ्रमंतीतील अनुभवांवर आधारित **‘कातळ मनीचा ठाव’** हे ललित लेखांचे पुस्तक प्रकाशित.
- गेल्यावर्षी विविध विषयांवरील स्फुट लेखांचा संग्रह असलेला **‘काही जनातलं काही मनातलं’** हा लेखसंग्रह पुस्तकरुपाने प्रकाशित.
- गोनीदा दुर्गप्रेमी मंडळाच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या दुर्ग साहित्य संमेलनांचा संस्थापक सदस्य.
- विनय धुमाळे निर्मित व दिग्दर्शित लोकमान्य टिळकांच्या जीवनावर आधारित ‘लोकमान्य’ या हिंदी दूरदर्शन मालिकेत आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची भूमिका सादर केली.
- मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित ‘रमा माधव’ व दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित ‘फर्जंद’ आणि ‘फत्तेशिकस्त’ या ऐतिहासिक मराठी चित्रपटातून भूमिका.
- इसवी सन १९९० पासून गेली तीस वर्षे, तीन राष्ट्रीयकृत बँका, सात सहकारी बँका, तीन खासगी वित्त कंपन्या आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन या राष्ट्रीय संस्थांचा कायदेशीर सल्लागार (विधी सल्लागार) म्हणून कार्यरत.

आजच्या बदललेल्या वातावरणात या साऱ्या कादंबऱ्या, चरित्रे यांचं साहित्यिक मूल्य नि:संशय मोठं आहे, पण त्यापेक्षाही या साहित्यकृतीचं संस्कारमूल्य फार महत्वाचं आहे. दूरदर्शनवर जे दाखवतील ते डोळे उघडे ठेवून आणि मेंदू बंद ठेवून पहायच्या आजच्या काळात आपला वैभवशाली इतिहास, निसर्गसंपन्न भूगोल, उच्चतम नैतिक मूल्ये, समाधानी जीवनविषयक दृष्टिकोन वर्णन करणाऱ्या व त्या अनुषंगाने मार्गदर्शन करणाऱ्या या कादंबऱ्या व चरित्रे म्हणजे भविष्यकाळाचे पाथेय आहे. ते तुम्हा-आम्हांला व तुमच्या आमच्या पुढच्या पिढ्यांना उपयोगी पडो व त्यातून चारित्र्यसंपन्न व सुसंस्कारित आचारविचारांचे राष्ट्र निर्माण होवो हीच शिवप्रभूंच्या चरणाशी प्रार्थना!!